।। श्रीरामसमर्थ ।।
।। जयजय रघुवीर समर्थ ।।
एकवीस समासी
अर्थात्
श्रीसमर्थांचा
जुना दासबोध
प्रस्तावना
समर्थहृदय नानासाहेब देव
भावार्थ निरुपण
समर्थभक्त श्रीदत्ताबुवा रामदासी
ज्येष्ठ शु.१३ शके १९२०,
दि. ७/६/१९९८

सत्कार्योत्तेजक सभा
रामवाडी, मालेगांव रस्ता, धुळे ४२४ ००१
दूरध्वनी : २३६२८७

श्रीराम समर्थ
भाग्यवंतांनी
एकांतात एकाग्रचित्ताने मननपूर्वक वाचावे.
कै. नानासाहेब देव
यांची प्रथमावृत्तीची प्रस्तावना.
श्रीसमर्थांचीं लघुकाव्यें
प्रस्तावना
श्रीसमर्थांच्या लघुकाव्याचे बाह्यस्वरुप
।। स्वामींचा कवितासमुद्र अवघा कल्याण लीहीतसे ।।

श्रीसमर्थांची कविता, प्रथम खंड, आम्ही प्रथम शके १८३० त, म्हणजे तीस वर्षांमागें प्रसिद्ध केला. त्यांत आरंभी रामायण, चौदा ओव्या शतकें (अभंगात्मक), स्फुट ओव्या (अभंग) असून नंतर षड्रिपु, पंचीकरणयोग, चतुर्थयोग, मानपंचक व पंचमान, ही पांच लघुकाव्यें आली आहेत. त्यानंतर त्यांत ६९ लहान लहान स्फुट प्रकरणें व स्फुट श्लोक म्हणून ६१ प्रकरणे देऊन तो खंड पुरा करण्यांत आला. ही सारी कविता व शिवाय मनाचे श्लोक व करुणाष्टकें मिळून डोमगांव मठांतील कल्याणस्वामींच्या हातचें ५१ वें बाडांक होय. यावरून ते बाड किती प्रचंड आहे, याची वाचकांना कल्पना होईल.

आतां प्रस्तुतच्या दुसऱ्या खंडांत आणखी अकरा प्रकरणें देण्यांत येत आहेत. ही प्रकरणें श्रीकल्याणांच्या हातचीं उपलब्ध झालेली नसल्यामुळें इतकीं वर्षे मागे राहिली. ती अनेक बाडांच्या आधारें पाठांतरांसह या खंडांत आलीं आहेत.

पहिल्या खंडांतील प्रकरणांत व या खंडांतील प्रकरणांत सहजच ध्यानांत येणारा एक ठळक फरक असा आहे की, त्या खंडांतील रामायण, शतकें आणि अभंग सोडून बाकीची सारी कविता अष्टाक्षरी आहे व या खंडांतील अकरा हि प्रकरणे श्रीमंत ग्रंथराज दासबोधाप्रमाणे ओवीबद्ध आहेत. पहिल्या खंडांत शेवटी जे स्फुट श्लोक आहेत ते ही अष्टाक्षरीच आहेत. त्यांचे वृत्त प्रमाणिका होय, असें आम्ही तेव्हा टीपेंत म्हटलें होतें, पण तें वृत्त प्रमाणिका नसून घनाक्षरी होय, असें आम्हांस फार वर्षांपूर्वी बडोद्याहून कोणी कळविले होते. वृत्त कोणतें हि असले तरी ते अष्टाक्षरी आहे, एवढे खरे. त्या खंडांतील प्रकरणे अष्टाक्षरी व या खंडांतील प्रकरणें ओवीबद्ध आहेत, म्हणूनच ही प्रकरणे श्रीकल्याणांनी ५१ व्या बाडांकांत उतरली नसून त्याचें त्यांच्या हातचें निराळें बाड असले पाहिजे, असे आम्हांस वाटतें. पण ते आह्मास उपलब्ध झालें नाही। त्यांच्या वेळी ते असलें च पाहिजे, मग आज ते, कोठे कां होईना, सुरक्षित आहे का नाही, सांगतां येत नाही. पण त्या बाडावरून डोमगांव मठांतील १५८ चा प्रचंड पोथा उतरला गेला असावा, असे आम्हांस वाटतें. या पोथ्यांत श्रीसमर्थांची बहुतेक सारी च कविता आहे. त्यांत श्रीमत् दासबोध आहे, मनाचे श्लोक आहेत, ५१ व्या बाडांतील बहुतेक कविता, ही अकरा प्रकरणें, आणखी उरली सुरलेली कविता, सारी च आहे. तो लांब, रूंद आणि प्रचंड असल्यामुळे डोमगांवी पोथा या नांवाने च त्याची प्रख्याती होती. आज ते ५१ वे बाड आणि हा पोथा, अशी दोन्ही श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत विराजमान झालेली असून दर्शनीय वस्तूंच्या मेजांत (Show-Case) प्रेक्षकांना त्यांचे दर्शन घडते.

टीप : श्रीकल्याण पोथा श्रीसमर्थ मर्तिजवळ स्वतंत्र देव्हाऱ्यात आहे आणि हो मोठा पोथा (यास निंबराज बुवांचा पोथा म्हटले जाते.) कपाटात संरक्षित आहे.

या खंडात जी अकरा प्रकरणें आहेत, त्यांपैकी पहिल्या दहा प्रकरणांची ओवीसंख्या १२२४ आहे व शेवटच्या एकवीस समासीच्या १३४० ओव्या आहेत, मिळून २५६४ ओव्यांचा हा खंड आहे.

१५८ व्या पोथ्यांत ही लघु काव्यें ज्या क्रमांत उतरलेली आहेत, तोच क्रम आम्ही स्विकारला आहे. हा च क्रम मान्य करण्यास आणखी एक बलवत्तर आधार बीडमठपति गिरिधर यांच्या श्रीसमर्थप्रतापाचा मिळाला. प्रतापाच्या शेवटच्या समासांत श्रीसमर्थकृत ग्रन्थांचा उल्लेख करतांना गिरिधर म्हणतात :

प्रथम पूर्वारंभ मनासी आणिती ।
जुनाट पुरुषाचें स्वरुप पाहाती ।
अंतर्भाव आत्माराम लक्षिती ।

प्रतापांत आणि पोथ्यांत येथवरचा क्रमसारखा आहे, पुढचा प्रतापांत निराळा आहे.

श्रीसमर्थपूर्वोत्तरकालीन आणि समकालीन बहुतेक ग्रन्थकारांनीं आपआपल्या ग्रन्थांचा रचनाकाल शेवटी दिलेला आढळतो, पण आश्चर्य हें कीं, श्रीसमर्थांनीं आपल्या कोणत्या च प्रकरणाच्या रचनाकालाचा उल्लेख केलेला नाही. फक्त श्रीमत् दासबोधांत कालाचा उल्लेख आलेला आहे, पण ग्रन्थाचा रचनेंचा काल द्यावा म्हणून तो उल्लेख केलेला नसून, ग्रन्थाच्या शेवटी नव्हे च, मध्यें च साहव्या दशकाच्या चवथ्या समासांत ओघानें गतकलीचा काल त्यांनीं सांगितला आहे. पण तेवढ्यानें सबंध ग्रन्थाचा जरी नाहीं, तरी त्या समासापुरता रचनाकाल ठरविण्यास आपणांस अनायासें साधन झालें आहे. श्रीसमर्थांनीं कोणतें प्रकरण केव्हां रचलें व रचनाकालानुसार प्रकरणांचा क्रम कसा, हें ठरविण्यास कोणतें च निश्चित असें साधन नसावें, ह्याचें थोडेसें वाईट वाटतें !

श्रीमत् ग्रन्थराज दासबोधाच्या रचनाकालाविषयीं आम्ही आमची कल्पना ग्रन्थराजाच्या शके १८२७ च्या पहिल्या च आवृत्तीच्या वेळीं प्रस्तावनेंत नमूद केली होती व त्यानंतर तेहतीस वर्षांत झालेल्या संशोधनानें ती कल्पना बरोबर असल्याचें च सिद्ध होत गेलें आहे.

कोणत्या हि काव्याच्या रचनाकालाचा प्रत्यक्ष उल्लेख नसला तरी क्वचित् कोठें एकाद्या काव्यांत दुसऱ्या काव्याचा उल्लेख केलेला आढळतो व त्यावरून तें दुसरें काव्य पहिल्याच्या पूर्वीचें किंवा पहिलें काव्य दुसऱ्याच्या नंतरचें होय, असें म्हणण्यास आधार होतो. असे उल्लेख आज स्मरतात ते वाचकांच्या व आमच्या स्वत:च्या सोयीसाठी येथें टिपून ठेवतों.

दासबोधाचा उल्लेख इतर चार प्रकरणांत आढळतो :

१) पहिल्या खंडांतील पंचमान प्रकरणाचा शेवटचा श्लोक
येकसेबत्तिसा श्लोकीं । साधकें पाहाणें बरें ।

तोंडाकडे मुमुक्षूला आशाळभूतपणाने यावचंद्रदिवाकरौ पहावयास नको. महाराष्ट्राच्या राष्ट्रगुरूने महाराष्ट्रावर कायमचा मंत्रानुग्रह करून ठेवला आहे.

अशी ही कांही थोडी कारणे मला सुचतात, वाचकास आणखी कांही निराळी सुचतील. पण या सर्व कारणांमुळे या काव्यांचा वाचक वेडा बनतो, एवढे खरे,

**१०) एकवीससमासी म्हणजे च जुना दासबोध**

या काव्याचे मूळचे नांव काय, असा प्रश्न आहे. नवव्या समासाच्या पहिल्या तीन ओव्या अशा :

वंदीन सद्गुरूची पाउलें। मज आपणा ऐसें केलें।
उदारें नाम तें हि दिधलें। रामदास ऐसे।।१।।
रामदास ऐसे नांव। तरी मज कैचा ठाव।
मीपणाचा अभाव। सहज चि जाला।।२।।
आतां कर्ता अकर्ता रामदास। इच्छा उद्भवली तयास।
नांव दिधलें ग्रन्थास। आपण नांवरूपावेगळा।।३।।

या तीन ओव्यांच्या आधारे कोण कोणी असे प्रतिपादन करितात की, प्रकरणाला श्रीसमर्थांनी 'रामदास' हे च नांव दिले. ही कल्पना हि आजकालची नव्हे. शके १७१९ त बाडांक १५८ चा पोथा लिहिला गेला. त्यांत एका ठिकाणी या ग्रन्थाचे नांव 'श्री रामदास ग्रन्थ' असे दिलेले आढळते व त्या पोथ्यांत च या प्रकरणाचे शेवटी मर्ढेमठाचे एका काळचे अधिपति अमृतेश्वर यांनी ज्या पांच ओव्या जोडल्या आहेत त्यांत 'ग्रन्था नाम श्रीरामदास' असे च म्हटले आहे. अमृतेश्वरांचा समाधीशक १६९२. तेव्हा या प्रकरणाचे नांव च 'रामदास' होय, ही कल्पना बरी च जुनी आहे.

ही कल्पना करणारांनी वरील तीन ओव्यांचा जो अर्थ लावला, तो मला पटत नाही. मी त्यांचा अर्थ इतका च करतो की, रामानें माझे रामदास नांव ठेवले, तेव्हा मी आता निराळा उरलो च नाही. त्यांचा झालो, अशा मला ग्रन्थ करण्याची इच्छा होतां च मजकडे त्या ग्रन्थाचे कर्तृत्व येत नाही, हे दर्शविण्यासाठी 'रामदासाने केलेला बोध' असे या ग्रन्थाचे नांव ठेवून मी नामानिराळा होतो. मी रामदास झालो म्हणजे मी रामांत मिसळलो, तेव्हा रामदासबोध हा मी केलेला बोध नसून रामानें च केलेला बोध. होय, असा मी या तीन ओव्यांचा भावार्थ मानतो. दहाव्या समासाच्या पहिल्या ओवीतून हाच अर्थ निघतो.

रामदास येणे नामे। ग्रंथ केला आत्मयारामें।।

म्हणजे माझ्या नांवावर रामाने च हा ग्रंथ केला.

तेव्हा या ग्रंथाचे मूळचे नांव 'दासबोध' होय असे मी समजतो व तसा त्या नांवाचा उल्लेख श्रीसमर्थांनी आपल्या ''आत्माराम'' प्रकरणांत केलेला, आपण पाहिला च आहे. यावरून असे निष्पन्न होते की, श्रीसमर्थांच्या वेळी च त्यांनी दासबोध नांवाचे तीन ग्रन्थ केले. एक, ही एकवीससमासी, दुसरा, सात दशकांच्या अखेरपर्यंतचा ग्रन्थ आणि तिसरा, वीस दशक दोनशे समासांचा ग्रन्थ. वाचकांच्या लक्ष्यांत ही गोष्ट आलेली असावी की, पुष्कळदां स्फुट समासांचा शेवट हि श्रीसमर्थांनी 'इति श्री दासबोध' असा च करावा. याचा अर्थ असा की श्रीसमर्थांचे सर्व च ग्रन्थ म्हणजे दासबोध होत.

या अकरा लघुकाव्यांत हे प्रकरण सर्वात मोठे आहे. तो स्वतंत्र ग्रन्थ च आहे. त्याच्या १३४० ओव्या आहेत. त्यांतील मुख्य विषय आत्मज्ञानाचा आहे, परंतु तदनुरोधानें शिष्याची तयारी व्हावी म्हणून त्यांत इतर लहान मोठे अनेक स्वतंत्र विषय आले आहेत. आत्मज्ञान ही कांही सोपी गोष्ट नव्हे, की पूर्व तयारीवांचून, दीर्घ प्रयत्नावांचून, साधनावांचून ती सहज प्राप्त व्हावी. म्हणून या ग्रन्थाचा मुख्य विषय आत्मज्ञान असला तरी त्याच्या प्राप्तीसाठी तळमळणाऱ्या जीवाने कोणते गुण आपल्या आंगी आणावे, प्रयत्न कसकसा करावा, साधने कोणती अवलंबावी, इत्यादि शिकवण अवश्य असल्यामुळे या सर्व बाबींचा विचार श्रीसमर्थांनी या ग्रन्थांत केला आहे. नुसते ते व इतर आनुषंगिक विषय नमूद करावे असे म्हटले, तरी ते शेकडो निवडता येतील. तेव्हा उदाहरणार्थ म्हणून केवळ पंधरा वीस विषयांची नोंद येथे करावी, असे म्हणतो. ही इतकी सुभाषिते आहेत, म्हटले तरी चालेल. श्रीसमर्थांची वाणी सहज स्फूती;ची असल्यामुळे कित्येक ओव्यांत आणि ओव्यातील शब्दांत जादु भरलेली आहे, असे वाटते. हे इतके मंत्र च आहेत की काय, अशी भीति वाटते. त्यांत कानामात्रांचा हि कोणास फरक करतां येणार नाही.

**१) श्रीसमर्थ स्वत:स उद्देशून बोलतात :**

**(श्री) श्रीसमर्थांनी स्वत:स पिसाट किवा ब्रह्मपिसा म्हणावे :**

तेथे पिसाट रामदास। उभा असे दीनरूप।।२-१
तैसा मी हि येक पिसाट। उगी च करितों वटवट।।९-८
म्हणोनिया मी ब्रह्मपिसा। बडबड करितो भलतैसा।
मज बरें म्हणेल तो हि पिसा। माणुसकी त्यासी नाही।।९-१५

**(रा) श्रीसमर्थानी घर कां सोडले?**

रामचंद्रा तुझा वियोग। ऐसा नको रे प्रसंग।
तुजकारणे सर्व संग। त्यक्त केला।।२-२
रामा तुझिया स्वामीपणे। मी हे ब्रह्मांड मानी ठेंगणे।
स्वामी तुजविण कोण जाणे। अंतर आमुचें।।३
तुजविण मज माया। कांही नाही रे रामराया।
आम्हां अनाथा कासया। उपेक्षिसी।।४
तुज समुदाय दासांचा। परी आम्हांसी स्वामी आणिक कैचा।
तुजकारणे जिवलगांचा। संग सोडिला।।५
सगुण रघुनाथ मुद्ल। माझे इतुके चि भांडवल।
कास धरूनि टाकीन पैल-। पार या भवाचा।।६

**(म) राम आणि रामदास यांचे साम्य**

तूं राज्य सांडुनी जालासी उदास। तरी आम्ही हि तुझे चि दास।
तां काये बरे कले बापास। तैसे आम्ही हि तुज करूं।।१६-४
तुवां पाषाण तारिले। तरी आम्ही जड जीव उद्धरिले।
तुवां देव मुक्त केले। बंधनापासुनी।।५
तरी आम्ही हि भाविकांसी। सोडउनियां मोक्षपदासी।
पावविले तयांसी। मागुता जन्म नाही।।६
तुंवा जरामरण केले दुरी। ते मुळी च नाही आमुचा घरी।
तूं राजा अक्रा सहस्त्रवरी। तरी आम्हांसी संख्या चि नाही।।७
तुंवा पुरी नेली वैकुंटा। तरी आम्ही वैकुंठीच्या बारा वाटा।
करूनि मांडिला चोहटा। तया वैकुंठाचा।।८
ऐसें बोलती रामदास। निधडे सर्वस्वे उदास।
वैभव वाटे जयास। कसपट जैसे।।९

**(२) अभिमान अहंकार, देहबुद्धि जाळावी**

अरे आधी आपणासी जाळावे। मग रघुनाथी मिळावे।
आपणासी राखतां जीवे। राम कैचा जोडे।।१४-३९

**(३) अभेद भजन**

जो आठांसी सांडुनी नवमीस गेला।
आणि नवमीचा हि मस्तकी चढला।
तयासी च आत्माराम भेटला। येर ते भोवते भोवती।।१६-२२
म्हणोनी शिष्या अभेद भजन। तुवां करावे आत्मनिवेदन।
भिन्नत्व अर्पुनी अभिन्न। होउनी असावें।।२३

**जयांपासी पापांड मत। निरंतर वसे ।।३-८७**
**जे वैराग्यें कनिष्ट। जे शब्दज्ञानें वरिष्ट।**
**ऐसे श्रोते परम नष्ट। सर्वथा नको ।।८८**

(१३) वादविवादाचें लक्षण

**वादवेवादाचें लक्षण। तें तूं जाण अपूर्णपण।**
**अभिमानीं गुंतले खूण। स्वानंदाची नेणती ।।१७-४०**

(१४) देशासाठी या धर्मासाठी वैराग्य करावे असे पुष्कळ तरूणांच्या मनांत येऊन ते थोर कार्यकर्त्यांना विचारावयास जात असतात. विचारावयास जातात याचा च अर्थ त्यांचा विषय झालेला नसतो. अशांना श्रीसमर्थाचा सल्ला असा आहे :

**जयासी वाटे वैराग्य करावें। तेणें कांही च न विचारावें।**
**उठोनि वाटा चि लागावें। दिगांतराप्रती ।।१८-२४**

स्वत: जें केलें तेंच श्रीसमर्थ सांगत आहेत, नाहींत?

(१५) सगुणसाक्षात्कार केव्हां होतो?

**दैंहे पडे कां देव जोडे। ऐसी हांच आंगीं जडे।**
**तेणें गुणें वैराग्य चढे। माहा प्रवळ ।।७-१७**
**देहपांग नि:शेप भंगे। तेव्हां प्राप्तीसी वेळ न लगे।**
**देव भक्तां पाठीं लागे। नाभी नाभी म्हणोनी ।।१८**
**वाळक आपणासी रक्षूं नेणे । म्हणोनि मातेसी लागे रक्षणें ।**
**तें चि वाळक शाहाणें । होता माता विसंवे ।।१९**
**तैसा भक्त भगवंतीं प्रेमा । लाऊनि उलंघी देहसीमा ।**
**तयाचा सांभाळ आत्मयारामा । करणें घडे नेमस्त ।।२०**
**सर्वस्वाची आस सुटे । तरी च सगुणमूर्ति प्रगटे ।**
**सगुण लाभ होतां तुटे । दु:ख संसारीचें ।।२१**

इतकें निग्रहधारिष्ट पाहिजे.

**१६) संतमहिमा**

**संतासी गर्व नाहीं । संत निंदा न करिती कांहीं ।**
**संत निष्ठुर कधीं हि । प्राकृतासारिखें नव्हेती ।।१२-१५**
**संत वेदशास्त्रसंपन्न । तयांपुढे बोलतां अज्ञान ।**
**श्रवण होतां धरिती मौन्य । आदरें सादर ऐकती ।।१६**
**संत दोष आच्छादिती । आपण स्वयें न करिती ।**
**मर्यादा उलंघितां न येती । देहबुद्धीसी सर्वथा ।।१७**
**संत शांतीचे सागर । संत सर्वस्वें उदार ।**
**ज्ञानवरुपते जळधर । सर्वस्वावरी ।।१८**

**स. ल. प्र. ४**

**संत अभावाचे काळ । संत वैराग्याचे वडवानळ ।**
**संतासी हा भवमळ । स्वप्नीं हि लागों न शके ।।१९**

**१७) स्तुतिनिंदेची** किंमत किती ?

**स्तुति होतां आनंदेल । तो निंदा होतां रडेल ।**
**या दोहीमध्यें न संपडेल । तो चि धन्य जगीं ।। ११-६४**

**१८) स्वधर्म** टाकू नये

**स्वधर्मकर्म उडवणें । या नांव परमार्थ बुडवणें ।**
**म्हणोन स्वधर्म करणें । अगत्य आधीं ।।२० - ।१८**
**कर्म करी येथाविध । अंतर पडतां नुपजे खेद ।**
**तरी सोनें आणि सुगंध । निश्चयेंसीं ।।१९**
**आधारें कर्मं टाकणें । हें काये आपुलें मन नेणें ।**
**ज्याचा जो स्वधर्म तेणें । त्यागूं नये सर्वथा ।।२०**

**(३)**

**उपसंहार**

प्रस्तावना संपली. माझ्या प्रस्तावना माझ्या पुरत्या असतात. त्यांत क्वचित् उपदेशाचे शद्ब पडतात, परंतु तो उपदेश दुसऱ्यांना नसून माझा मला च असतो.

हीं प्रकरणें इतक्या शुद्ध रीतीनें प्रथम च छापून निघत आहेत. तथापि, हें प्रकाशनाचें कार्य आमच्या अगदी मनाजोगें झालें आहे, मात्र नव्हे. पण, याहून तें जास्त निर्दोषपणे करणें आम्हांस शक्य झालें नाही. अशुद्धें नव्हत, पण कांहीं हस्तदोष राहून गेल्याचें आम्हांस आढळले आहे. ते वाचकांच्या सहज लक्ष्यांत येण्यासारखे आहेत, म्हणून शुद्धिपत्र देण्याची आवश्यकता भासत नाहीं.

पूर्वप्रकाशकांनीं मात्र किती अनर्थावह व हास्यास्पद चुक्या करून ठेवल्या होत्या, त्यांचीं मनोरंजक उदाहरणें, मासिकांतून प्रकाशन चालूं असतां, मधून मधून देण्यांत येत च होतीं. कांहीं शद्ब लागले नाहीत तर हे पूर्वप्रकाशक आडून बसत नसत. एकादा शद्ब लागला नाहीं, तर त्याला साजेसा, त्याच्यासारखा - दिसणारा दुसरा शद्ब ते दडपून देत. आणि एकदा पहिला प्रकाशक जें दडपून देईल तें च पुढें परंपरेनें चालविण्याचें काम नंतरचे प्रकाशक करीत. 'आरंधे' शद्ब लागला नाही तर त्याच्याजवळ येणारा, त्याच्या सारखा दुसरा शद्ब कोणता, तर 'अंधारे'. द्या दडपून 'अंधारें' आणि पडूं द्या वाचकांना अंधारांत चांचपडत ! अशा मासल्याच्या हजारों चुक्या पूर्वप्रकाशकांनीं करून ठेवल्या होत्या. एकवीस समासींतील दोन चार हास्यास्पद चुक्या दाखवून आपण पुढें जाऊं :

| स्थळ | पूर्वप्रकाशन | प्रस्तुतचें प्रकाशन |
|---|---|---|
| १३ X ३१ | जैशी जलधरें धांव घेतली । | जैसी जाळांधरें धांव घेतली । |
| | आणि शर्करेचे युद्धाची हांव केली। | आणि शंकरासी युध्याची हावं केली । |
| | देह मी टाकितां मिळाली । | देहे मी टाकिता मिळाली । |
| | जाती जेथच्या तेथ ।। | जोती जेथीच्या तेथें ।। |
| १३ X ४० | पुरुषशद्ब हेचि प्रकृती । | पुरुष शद्ब हे चि प्रकृती । |
| | परी कला व्याकरणनाम असती ।। | परी कळाव्या कारणें नामें असती । |
| १५ X २ | अकारण पक्ष्म नयन । | आकर्ण पद्मनयन । |
| १८ X ५७ | दुसऱ्या च दिवशी । | दसऱ्याचे दिवसीं |

यांत पूर्वप्रकाशकांना नांवें ठेवण्याचा आमचां हेतू नसून शुद्ध प्रकाशनाचें महत्व किती आहे, हें दर्शविण्याचा आहे. पाऊणशें आयशी वर्षांमागचा काळ हा संशोधनाचा प्रात:काळ होता, हल्लींचा माध्यान्हकाळ होय. प्रात:काळी निभावलें, तें माध्यान्हकाळीं व यापुढें महाराष्ट्र सहन करणार नाहीं, हें उघड आहे.

हा भाग धरून आत्तापर्यंत सभेमार्फत श्रीसमर्थांचे ग्रंथ अधिकृतरित्या प्रकाशित झाले ते :

**१) श्रीमत् ग्रन्थराज दासबोध**
**२) श्री श्लोक मनाचे**
**३) करुणाष्टकें, धाट्या सवाया वगैरे**
**४) पदपदांतरें**
**५) श्रीसमर्थांची कविता – प्रथम खंड**
**६) श्रीसमर्थांची कविता –** द्वितीय खंड – **अकरा लघु काव्यें** आणखी दोन भाग निघावयाला पाहिजेत :

७) श्रीसमर्थांची **प्रासंगिक प्रकरणें**
**८) उरलेले अभंग, पदें, आरत्या वगैरे**

## अंतरंग प्रवेश

सद्गुरू कृपेचेनी हावे। विवेक मुळाकडे धावे।
तेणें ऐक्य सिंधु हेलावे। स्वानंद सुखे।।
तया सिंधूच्या आनंद लहरी। शब्दीं नि:शब्द भरोवरी।
तेणे प्रतापें वैखरी। वदोचि लागे।।

(एकवीस समासी)

श्रीसमर्थांची लघुकाव्ये जी प्रसिध्द आहेत त्या सर्वांत हे काव्य मोठे आहे. त्याचे समास एकवीस असून त्याला जुना दासबोध अशीही संज्ञा आहे. त्याच्या ओव्या १३४० आहेत. त्याचा मुख्य विषय आत्मज्ञान हाच आहे. आणि ते प्राप्त करून घेणेसाठी जी तयारी आवश्यक आहे त्या अनुरोधाने त्याला पोषक असे अनेक विषय साधक शिष्याकरिता प्रतिपादले आहेत. श्री समर्थांची वाणी परखड आहे. सद्गुरू कृपेची ही वचने आहेत. त्यांच्या कृपेच्या जोरावरच माझी (समर्थांची) विवेक शक्ति संपूर्णपणे मूळ स्वरुपाकडे जाऊन त्याच्याशी ऐक्य पावली. संपूर्ण स्वानंदसुख अनुभवास आले. त्या आनंदस्वरुपाच्या ठिकाणी संपूर्ण चित्तवृत्ती एकवटल्या – एकरुप बलाने शद्बात प्रगट झाली आणि तोच हा जुना दासबोध. इतकी पवित्र आणि निर्दोष ही कृति आहे. रामरायाच्या कृपेचेच हे बोल आहेत. त्यामध्ये शुद्ध परमार्थ आहे. साक्षात् परमात्म कृपेच्या लाभाची ही सामुग्री असे म्हटले तरी चालेल.

'येथे जो जीवेंचि मेला। तो कल्पकोटी ज्याला।
जो जीवित्वासी भ्याला। तो मरतचि गेला पुन:नुन्हा।।

ज्याने आपले जीवासकट सर्वस्व अर्पण केले तोच जन्म मृत्युपासून कायमचा सुटला, अमर झाला आणि जो जीवत्व त्यागण्यास भ्याला तो कायमचा जन्ममृत्युच्या फेऱ्यात अडकला. गुरूकृपेने त्याचा संपूर्णपणे अहंकार नष्ट झाल्याने तो आपल्या मूळ स्वरूपाशी कायमचा ऐक्य पावला.

श्रीसमर्थानी आपल्या साधन कालांत हा जुना दासबोध लिहिला आहे. त्यात त्यांच्या प्रखर वैराग्याची, उत्कट नि:संगतेची, रामाकरितां सर्वस्व अर्पण करण्याच्या वृत्तीची परिपूर्णतेने छाप पडलेली आहे. ते रामाला म्हणतात–

रामचंद्रा तुझा वियोग। ऐसा नकोरे प्रसंग।
तुजकारणे सर्वसंग। त्यक्त केला।।
रामा तुझिया स्वामीपणे। मी हे ब्रम्हांड मानी ठेंगणे।।
तुजविण मज माया। काही नाही रे रामराया।
आम्हा अनाथा कासया। उपेक्षसी।।

रामा तुझ्या वियोगाचा कदापि प्रसंग नको. तुझ्या करिता मी सर्व सोडले. तू माझा स्वामी आहेस – मला दुसऱ्या कशाची गरज नाही. माझी मात्र तू उपेक्षा करू नकोस. मी तुला सर्वस्वी शरण आहे. अशी समर्थांची अवस्था होती. त्या अवस्थेतील हे लिखाण आहे. देवाकरितां वाहिलेल्या साधकाकरिताच हा बोध आहे. ह्यांत व्यावहारिक भीड नाही. शुध्द अध्यात्म आणि त्याकडे नेणारे परखड साधन याचीच मीमांसा आहे.

वर म्हंटल्याप्रमाणे आत्मज्ञान प्राप्त करून घेणाऱ्या शिष्याची संपूर्ण तयारी व्हावी ह्याकरीता अनेक साधनांची पथ्ये पाळावी लागतात, अनुभवावी लागतात, माहिती असावी लागते आणि ग्रंथाच्या नियमाप्रमाणे ते आवश्यकही असते. अशा काही ग्रंथात ग्रथित असलेल्या साधनांचा आपण विचार करू. त्यायोगे ग्रंथांचा भावार्थ कळणेस सुशक होईल.

**१. श्रोता वक्त्याचे स्वरूप** जो विरक्त आहे भक्त आहे, प्रेमळ आहे, अंत:करणाचा शुध्द आहे, परोपकारी वृत्तीचा; कोणतीही क्रिया करतांना जो नि:शंक असतो, बोलण्याप्रमाणे क्रिया करणारा, वृत्तीने शंत, समाधानी, उदासीनता बाणलेला, श्रोत्याकडून कशाचीही अपेक्षा नसणारा–

वक्ता असावा अनुभवाचा। ज्ञाता नसावा पुस्तकीचा।।

कारण पुस्तक ज्ञानाने श्रोत्यांचा भ्रम नाहीसा होत नाही. श्रोता आदराने ऐकणारा, जिज्ञासु वृत्तीचा, संसारात जितके आपण दक्ष असतो तितक्या दक्षतेने ऐकणारा, मुमुक्षू, श्रवण करीत असताना निद्रेला बळी न पडणारा व निरभिमानी असावा.

**२. सद्गुरू व सच्छिष्य :**

जो ब्रम्हज्ञान उपदेशी। अज्ञान अंधकार निरसी।
जीवात्मया परमात्मयासी। ऐक्यता करी।।

ब्रम्हज्ञान संपन्न, जीवात्मा आणि परमात्मा यांचे ऐक्य घडवून आणणारा, साक्षात्कारी, परोपकार वृत्तीचा, अंतरीचा दयाळु, वैराग्य संपन्न, वृत्तीने उदास, तात्पर्य नाना साहित्येचे गुण असून अतरीचा दयाळु ही सद्गुरूची लक्षणे आहेत.

सद्गुरू वचनावर ज्याचा पूर्ण विश्वास आहे, जो गुरूना अनन्य शरण आहे त्यालाच सच्छिष्य म्हणतात. शिष्य सात्विक असावा, प्रज्ञावंत असावा, भजक आणि साधन करणारा, त्रिविध तापाने पोळलेला असावा – कारण तोच पुढे परमार्थाला अधिकारी होतो, ज्याला आपल्या सद्गुरूपदापुढे कोणीच श्रेष्ठ वाटत नाही असाच शिष्य परमार्थाला अधिकारी होय.

३. वैराग्य: श्रीसमर्थांचे धगधगित वैराग्य होते. वैराग्य हा परमार्थाचा गाभा आहे. सर्व विषयजात तुच्छ वाटुन परमेशपदी अनन्य निष्ठा असणे हे वैराग्याचे लक्षण आहे. 'ब्रम्हलोक तृणीकार: वैराग्यस्यावधिर्मत: ।। ब्रम्हलोक सुध्दा तुच्छ वाटणे हे वैराग्याचे प्रमुख लक्षण आहे. जितके वैराग्य जास्त तितकी परमार्थ साधना जास्त. श्रीसमर्थ स्पष्ट शब्दात सांगतात–

जयास वाटे वैराग्य करावे। तेणे काहींच न विचारावे।
उठोनि वाटाच लागावे। दिगंतराप्रती।।

आणि ज्याप्रमाणे श्रीसमर्थांनी पुरश्चरणे केली त्याप्रमाणे करावीत. तात्पर्य वैराग्य हे साधन जर नसेल तर परमार्थ नाही.

**४. सगुण पूजा, आत्मनिवेद :** गळ्यात वैजयंती माळा आहे, पीतांबर परिधान केलेला आहे. मस्तकावर मुकुट आहे. कुंडले शोभत आहेत, घननीळ सावळा, शंखचक्र गदा धारण केली आहे. क्षीरसागराचे ठिकाणी शेषावर ज्याचे शयन, लक्ष्मी सहित विराजमान असलेला अशा भगवंताचे ध्यान करावे, मानस पूजा करावी.

भावे घ्यावे हरीचे नाम। हृदयी धरूनिया प्रेम।
मानसपूजा नित्यनेम। केला पाहिजे।।

सगुण मूर्तीची चरित्रे श्रवण करावीत, अंतरी ध्यान धरावे. नित्यनेमाने हा अभ्यास केला असता प्राप्तीला वेळ लागत नाही. देह पडो पण देव जोडोअशी दृढ निष्ठा असावी त्याने वैराग्याला दार्ढ्यता येते, भगवंताठिकाणी प्रेम वाढते अशा भक्ताला परमात्मा विसरूच शकत नाही. निवेदन तीन प्रकारचे आहे–

जड आत्मनिवेदन, चंचळ आत्मनिवेदन व निश्चळ आत्मनिवेदन.

पदार्थ मने काया वाचा। मी हा अवघाचि देवाचा।।

हे जड आत्मनिवेदन होय. ह्या सर्व दिसणाऱ्या चंचळ विरूपाचे जगताचा कर्ता जगदीश आहे, प्राणीमात्र त्याचा अंश आहे – ह्या भावनेला चंचळ आत्मनिवेदन म्हणतात. दिसणारे हे सर्व दृश्य जगत् स्वप्नाकार असून परमात्मा निश्चळ विर्विकार आहे – त्याला निश्चळ आत्मनिवेदन म्हणतात. चंचळाला ठाव नाही तेथे आपण कोठुन असणार. आपण नाही म्हणजे मी पण नाही – सर्वत्र परमात्माच संचला आहे हे अनुभवणे हे निश्चळ निवेदनाचे लक्षण आहे आणि हेच खरे ज्ञान होय.

**५. विविध शिकवण : श्री समर्थ म्हणतात –** शिष्या मी सांगतो ते

बरे दिसते का? रामाची आणि आपली साम्यता श्री समर्थ वर्णन करतात. तू राज्य सांडून उदास झालास तर आम्हीही तुझेच दास आहोत. 'तू काय बरे केलेस बापासा तैसे आम्ही करू. तू पाषाण तारलेस तरी आम्हीही जड जीव उध्दरले. तू देवाना बंधापासून सोडविलेस तरी आम्हीही भाविकाना सोडवून मोक्षपदाला नेले. आणि जन्म मरण फेऱ्यातून कायमचे मुक्त केले. तू जन्म मरण दूर केलेस आम्हाला ते मुळींच नाही. तू अकरा हजार वर्षे राज्य केलेस तरी आम्हास संख्याच नाही. तू सर्व नगरी वैकुंठास नेलीस तरी आम्ही वैकुंठीच्या सर्व वाटा मोकळ्या करून ते सुलभ सर्वानाच केले आहे. या प्रमाणे दासाचे बोलणे प्रभूनी ऐकले. ज्याना वैभव कसपटा सारखे वाटते- सर्वार्थाने उदास झालेल्या या आपल्या लाडक्या भक्ताला पाहून रामानी मंदहास्य केले आणि धावत जाऊन हृदयाशी धरिले. असा दासाचा वेळाईत (कधीही धावत येणारा) भावार्थ पाहून भुलला स्वामी सेवक एक झाले-भेद-भाव संपला. नवविधा भक्ती याच कारणे करायची कीं आपण स्वर्ये रामचि व्हावयाचे- रामपणही विरून जावुन केवळ आनंदरूप होऊन जावयाचे नवमी भक्ति आत्मनिवेदन साधली म्हणजे सर्वानाच रामरूप प्राप्त होते आपल्या शरीराकडे पहावे तो शरीर समूळ पालटून गेलेचा अनुभव येतो म्हणून श्रीसमर्थ म्हणतात- अरे शिष्या तू हे अभेद भजन करावेसे- भिन्नत्व सर्व त्यजून अभिन्न रूपाने रहावेस. जितके जितके म्हणून रूप दिसते ते सर्व नाशिवंत आहे हे सर्व विश्व दृष्य असलेने नाश पावणारे आहे- जे जे म्हणून जाणीवीत येते ते ते मायेनेच ग्रासलेले आहे- आणि जे जे मायेने युक्त ते ते स्वरूपी रहातच नाही. माया दिसते परंतु खरी नसते दृष्टी बंधनाचा खेळ दाखवतात सोन्याचे ढीग पाडतात परंतु ते खरे असत नाहीत तसेच हे सर्व मायारूप असलेने- दिसते परंतु खरे नाही हे विचाराने पहावे आत्मस्वरूप स्थिती अनुभवाला आली म्हणजे हे दृष्य समूळ मिथ्या केवळ कल्पनेचा खेळ असे अनुभवाला येते. सर्वच दृश्य तितके मायारूप असलेने, पहाणाराही मायेतच येत असलेने ती खरी वाटते- अनुभवान्ती सर्व मिथ्या ठरते. जागृतीस आलेल्या माणसाला ज्या प्रमाणे स्वप्न मिथ्या असते त्याप्रमाणे ज्याला ब्रह्मस्वरूपाचे ज्ञान झाले म्हणजे जागृती आली त्याला स्वप्नाप्रमाणे सर्व दृष्यभासच असतो. तात्पय- 'तेथे दृश्य अदृश्य नुरे काही। लक्ष अलक्ष नि:शेष नाही।।

स्वरूपानुभवसर्वही। निवांत होईल।।
तेथे नवविधा भक्तीचा अंत। देवा भक्तारसि एकांत।।
विश्रांति पावती संत। संत महानुभाव जेथे।।

**१०. प्रपंचात राहून परमार्थ शक्य आहे का?**

स्वरूपानधे भेद नाही, ही सर्व माया आहे, सर्व कर्तृत्वही मायेमधे आले- ती तरी खोटी आहे- मग कोणतीही क्रिया जरी केली ती बाधक कशी होईल. श्रीसमर्थाचे सरळ उत्तर आहे की तू आपणास स्थूलधारी का म्हणतोस स्थूलधारी आहेस वाटते म्हणून ती मिथ्या असली तरी बाधक होते. तुझी कल्पनाच तुला बाधक आहे. स्थूल राहून ती कल्पनाच कशी नष्ट होणार? या प्रश्नाला श्रीसमर्थांचे परखड उत्तर आहे यात लौकीकाची भीड नाही. अनुभवाचे सार आहे. शिष्याच्या अंतिम हिताचा पूर्णपणे विचार आहे आणि स्वत:चे अनुभव आहेत. शुद्ध परमार्थ आहे. श्रीसमर्थ म्हणतात अरे शिष्या तुला साराचेही सार सांगतो हा भवसिंधु पार करण्याचा उपाय सांगतो- याला कोणत्याही शास्त्राचा आधार नाही- फक्त स्वानुभवाचे बोल आहेत खरोखरीच मनापासून ज्याला परमार्थ करायचा आहे- तो साध्य व्हावा असे वाटते त्याने प्रपंचाचा समूळ त्याग करावा प्रपंचात राहून परमार्थ कदापि होणे नाही. ह्या संसारांत नाना प्रकारचे धोके येतात. दु:ख होते. शोकाचे प्रसंग येतात. अशावेळी कसला परमार्थ होणार? प्रपंचात राहून मी अलिप्त आहे असे म्हणणे केवळ बाष्कळ आहे. नुसत्या आधाराचा उपयोग काय! प्रपंच म्हणजे उदास नागवणा। आणि परमार्थ म्हणजे प्रपंच बुडवणा

परस्परें या दोघा जणा। सर्वथा न पडे।।

प्रपंचात उदास वृत्ति मुळीच रहात नाही, परमार्थ म्हणजे उदास वृत्तीची साठवण असा परस्पर विरोध असलेने त्यांचे दोगाचे एकत्रीकरण कसे जमणार? अरे बाबा परमार्थ हा सोपा नाही नुसत्या ज्ञानाच्या गोष्टी व्यर्थ आहेत 'जरी होईल ईश्वरी कृपा। तरीच हा प्रपंच सुटे।। एरव्ही हे शक्य नाही.

ह्या प्रपंचात आपले कोणी नाही, कोणीही प्रसंगाला उपयोगी पडणारे नाही हे कळत असून जो यात गुंतून राहतो तो पढतमुर्ख होय. अरे ज्याला वाटते वैराग्य करावे, त्याने कांही विचार करू नये, 'उठून याटा लागावे दिगंतरा प्रति'।।

परमार्थ सदृढ जडे। मोहोजाळ समूळ उडे।
हे प्रपंची सहसा न घडे। वैराग्य वाचूनी।।

वैराग्याच्या आड दुष्ट शक्ती आहेत त्या ते घडू देत नाहीत उपजत वैराग्य असलेले पुरूष फारच थोडे. संसारात पत्नी कडे मन गुंतते थोडी मोकळीक झाली तरी मुलांत, घरात काही लोकेपणा, कुलाभिमान, लोक म्हणतात वडिलांचे नाव जाईल कोणी म्हणतात विवेक करावा- नाहीच तो कोठून आणावा. काही कालाने तो येतो तो, काळाने आयुष्य संपवलेले असते म्हणून श्रीसमर्थांचे सांगणे असे.

म्हणोन हे काहीच नसता। प्रपंच सांडून उदास होता।
मग तया साधकाची चिंता। ईश्वरासी आहे।।

कारण तो दयाळू आणि शरण आलेल्याचा वाली आहे. प्रतिष्ठा प्राप्त झाले नंतर जो लालुची धरीत नाही- तीच वैराग्याची सामुग्री जाणावी. आणि स्वधर्माचा सांभाळ करतो तो विवेक होय. तात्पर्य,

परमार्थ तोचि जो वैराग्य। वैराग्यापरते नाही भाग्य।
वैराग्य नाही ते अभाग्य। लुलु दरिद्री।।
म्हणुन तुवा वैराग्य करावे। लौकिक भय सोडून द्यावे
तारूण्य गेलिया खंगावे। लगेल पुढे।।

प्रपंचातील मोह सुटत नाहीत, लांबतच जातात म्हणून प्रपंचातील वासना परमार्थाकडे ओढावी हे होत नसेल तर 'प्रपंच त्यजावा हेचि आज्ञा पोटस्था।। असे श्रीसमर्थ ठामपणे सांगतात. संसारात सुख वाटते परंतु त्यातच फार मोठे दु:ख आहे हेच प्राण्याला कळत नाही. भेद वृत्ति संपली. तरच सुख आहे. भेद तुटल्याचे स्थळ म्हणजे निर्मळ निश्चल असे एक स्वरूपच आहे. ज्याला सार्थक रावेसे वाटते त्याने जाणीव, मीपणा सोडुन द्यावा आणि संतसंगतीने आनंद लुटावा. श्री समर्थ पुढे म्हणतात - जर हा संसार सुखमय असता 'तरी का टाकिती थोर थोर। होती दु:खाचे डोंगर। प्रपंच संगे।। प्रपंची आणि परमसुख। पावेन म्हणेल तो मूर्ख। जैसे परमात्री मिश्रित वीख। सेविता मृत्यु पावे।।

ह्या प्रपंचाच्या लोभाने प्राणी स्वहिताला मुकतो. मायेत तो गुंतून रहातो आणि ब्रम्हज्ञानाला पारखा होतो.

९. साधक शिष्याकरीता समर्थांची आर्तता

ग्रंथांचे सार- स्वरूपानुभव प्राप्ति

परमार्थ साधकाने स्वधर्म कर्म कटाक्षाने सांभाळावे. ज्याचा जो स्वधर्म आहे त्याचा त्याने त्याग कधीही करू नये. सत्क्रिया नसेल तर परमार्थ व्यर्थ होय. असत् क्रियेने अनर्थ होतो. ज्याची देहाशा सुटली त्याला परमार्थ शोभतो. मोठेपणा धरू नये. कोणताही अभिमान नसावा. साधकाला ब्रम्हज्ञानाला आड कोण असेल तर देहाभिमान होय. विवेकाने ब्रम्हज्ञानाचा अभ्यास करून निरभिमानी व्हावे, अनंत अडथळे आहेत. त्याकरिता सर्वकाळ साक्षेपी सावधान होवून सद्गुरूंचे अनन्य भजन करावे.

**मुक्त होतो.**

**आता श्रीसमर्थांनी मिठाच्या खड्याचा दाखला दिला आहे.**

**मी मीठ आहे असे वाटणे हेच सिंधूहून वेगळेपणाचे लक्षण होय. सिंधूहून वेगळे होणे हेच त्या सिंधूचाच अंश असणाऱ्या मिठाचे कठीणपण होय. तो मिठाचा खडा जोपर्यंत वेगळा राहील तोपर्यंत सिंधूशी एकरूप होणार नाही. वास्तविक सिंधूहून मीठ वेगळे नसताना वेगळेपणा मानला की कठीणपणा येतो. हा खड्याचा कठिपणा जाण्यासाठी सिंधूशिवाय त्याला दुसरा उपाय नाही. सिंधूमधेच असणारी जळचरे ज्याप्रमाणे सिंधूला ओळखत नाहीत– आपल्या आधाराला ओळखत नाहीत; त्याप्रमाणेच सिंधूहून वेगळे असणाऱ्या या मिठाच्या खड्यांना आपला आधार कळू शकत नाही. पण सद्गुरूकृपेने आपल्या मूळ रूपाचे ज्ञान झाले की सहजच वेगळेपणा नाहीसा होतो.**

**अशा रीतीने श्रीसद्गुरूंनी आपल्या बोधामृताने माझे वेगळे असणारे मीपण तोडून टाकले व आपल्या पादपद्मी मला एकरूप करून टाकले. असे त्या थोर सद्गुरूचे माहात्म्य आहे. येथपर्यंतच्या निरूपणाने श्रीसमर्थांना त्यांच्या श्रीसद्गुरूचे– प्रभु श्रीरामचंद्रांचे– नुसते स्मरण होताच त्यांची स्तुती करण्यासाठी समर्थांना धीर धरवत नाही. केवळ स्मरणानेच वृत्तीही त्यांच्याशी एकरूप होते. ध्यानमग्न होते.**

**अशी ही स्थिती होणे यालाच ध्यान असे म्हणतात. मानसपूजेचे हेच खरे मर्म, खरे हृद्गत आहे.**

## समास पहिला

**।।श्रीगणेशाय नम: ।।**

मन मीपणें निर्बुजले । स्वामीच्या पदी मिसळले ।
ऐक्यरूपे स्वये चि जाले । पद आपण ।।१
स्वामीसेवकपण वावो । जाणावा तो स्वामीरावो ।
ऐसिये निजपदी ठावो । भाग्यानुसार ।।२
शब्दी नि:शब्द जाले । उच्छिष्ट भ्रमणें खादले ।
ते अभ्यंतरी बैसलें । स्वयंभ बोधरूप ।।३
सुष्टु साराचें हि सार । फावले अक्षई अपार ।
तया सुखाचे उद्गार । येती स्वानुभवें ।।४
वायूचेनि बळें शब्दासी । सामर्थ्य होय निश्चयेंसी ।
तैसी सद्गुरूकृपा मानसी । उद्गार काढी ।।५
सद्गुरूकृपेचेनि हावें । विवेक मुळाकडे धांवे ।
तेणें ऐक्यसिंधु हेलावे । स्वानंदसुखें ।।६
तया सिंधूच्या आनंदलहरी । शब्दीं नि:शब्द भरोवरी ।
तेणे प्रतापें वैखरी । वदों चि लागे ।।७
वेष्टित शिष्यतारांगणी । सद्गुरू पूर्णचंद्र गगनी ।
प्रगट जाला निजकिरणी । दिशा धवळल्या ।।८
मिरवत जातां अंतराळी । प्रभा फांकली धृवमंडळी ।
तेणे सुखें निजकलोळी । सिंधु उचंबळो पाहे ।।९
भरितें दाटलें सागरीं । उचंबळोनि फुटल्या तरी ।
माहानदीसी माघारी । दाटी जाली ।।१०
उदक चढलें अळुमाळ । फुटले वाहाती खळाळ ।
तेणें बळें सरिताजळ । उफराटें वाहे ।।११
तैसी वृत्ति स्वरूपीं मिळाली । मिथ्यत्वें माघारी मुरडली ।
सिंधूचेनि लोटें आली । जेथील तेथें ।।१२
आनंदसिंधु उचंबळला । तेणें ब्रह्मगोळ बुडाला ।
उडगणेंसि मयंक जाला । सिंधु चि अवघा ।।१३
स्वर्ग मृत्य आणि पाताळ । अवघें भरलें अक्षोभजळ ।
मंगळमातेचें ढेकूळ । विरोनि गेलें ।।१४
कैचे देव कैचे दानव । कैचे जीवपणें मानव ।
आकार विरोनिया सर्व । निर्विकार जाला ।।१५
बुडविला सिंधूनें सागर । प्राणी पावले पैलपार ।
गुरूभक्तांसी उतार । पायेवाट जाली ।।१६
जे समूळ बुडाले । ते चि साचार तरले ।
जे बुडत बुडतां वाचले । ते बुडाले कल्पकोटी ।।१७
येथें जो जीवें चि मेला । तो कल्पकोटी ज्याला ।
जो जीवित्वासी भ्याला । तो मरत चि गेला । पुन्ह पुन्हां ।।१८
येथें जे सांकडी पडिले । ते चि निश्चितार्थे बुडाले ।
स्वानंदसिंधु बुडोनि मेले । तयासी च भये नाही ।।१९
मी सिंधु ऐसें जडलें । तेव्हां चि खडेपण आलें ।
सिंधु सांडूनि बाहेरी पडलें । कठिणपणें लवण ।।२०
सिंधूचा चि औंश लवण । परी येकदेशी पावे सीण ।
पुन्हां त्यासी सिंधुवीण । विश्रांती नाही ।।२१
सिंधुमाजी जळचरें । जीताती तेणें चि आधारे ।
परंतु बापुडीं अविचारें । सिंधु होऊं नेणती ।।२२
होतों खडेपणें फुटलों । सद्गुरूनें जीवन केलों ।
आलों गेलों आणि बोलिलों । तो मी नव्हे सर्वथा ।।२३
ऐसा माझा सद्गुरूस्वामी । तोडुनी टाकिली माझी मी मी ।
आपुलिया निजपदयुग्मीं । ऐक्यता केली ।।२४
आतां पुढील निरूपण । जो भास्करवौंशभूषण ।
तो सर्वात्मा सगुण । वंदीन कोदंडधारी ।।२५
स्तवन होतां न धरे धीर । आठवे रामचंद्र उदार ।
रघुनाथध्यानी तत्पर । श्रोते होत आतां ।।२६
इति श्रीरामदास राम । पुढे वर्णील पूर्णकाम ।
मानसपूजेचे वर्म । प्राप्त होय जेणें ।।२७।।

***

**।।श्रीरामसमर्थ ।।**

## समास दुसरा

**।।श्रीगणेशाय नम: ।।**

**अशा रीतीने मागील समासात वर्णिल्याप्रमाणे ध्यानमग्न असलेल्या सर्वांनाच सर्वात्मा राजाधिराज प्रभू रामचंद्राचे दर्शन होते. श्रीसमर्थ रामदासांना असे दर्शन होताच अन्य भावना विरून गेल्यामुळे श्रीरामाशिवाय कोणीही अन्य त्राता नाही अशी अवस्था झाली. श्रीसमर्थ श्रीरामाची मनोमन प्रार्थना करू लागले.**

**हे रामचंद्रा, आता तुझा वियोग कोणत्याहि प्रकारे न होवो. वेगळेपणाचा कधीही प्रसंग न येवो. तुझ्याकरता अन्य जिवलगांचा संग निर्भयपणे तोडून टाकला. आता हे प्रभो, तूच माझा स्वामी! अनाथांना सनाथ करणारा असा तूं– त्या तुझ्याकरता मला या ब्रह्मांडाचीहि क्षिती नाही.**

**तुझ्याविना मला कशाचीहि इच्छा नाही. तुझ्याशिवाय हे माझे अंत:करण कोण जाणू शकेल? तुझ्याशिवाय माझे खरे प्रेम कुठेहि गुंतलेले नाही. तूच प्रेममय मूर्ती– तूच प्रेमास्पद आधार– असतानां आम्हा अनाथांची उपेक्षा आता करू नकोस. हे प्रभो, तुझ्याभोवती हजारो दासांचा मेळावा आहे. हजारो दासांकडे तुझे लक्ष आहे. पण मला मात्र तुझ्याशिवाय दुसरा कोणी नाही. तूच माझा स्वामी! तुझ्याकरितांच मी जिवलगांचा त्याग केला. आतां**

**आता श्रोता कसा नसावा हेही श्रीसमर्थ सांगताहेत. ज्याच्या मनात संसाराविषयी अत्यंत मोह असतो, आसक्ती असते, त्याला निरूपणाची गोडी चाखता येत नाही. अज्ञान आणि अभिमान अतंरी वसत असल्याकारणाने तर्ककुतर्कानें तो निरूपणाचे मातेरे करून सोडतो. वक्त्याचेच गुणदोष पाहण्याकडे त्याची दृष्टी असल्यामुळे त्याच्या अंत:करणात निरूपण ठसत नाही. निरूपण ऐकतो आणि इतरांना तो गुणदोषच सांगत जातो. असा श्रोता दुराचारी असतो. अतंरात काळकूट भरलेले, अभिमानाने फुगलेले ते अंत:करण चांगल्या निरूपणाने निवळू लागले तरी तो अभिमान निवळू देत नाही. अशा श्रोत्याचे हित कसे होणार?**

**एकंदरीत जे विषयासक्त आहेत त्यांना हे निरूपण कधीही रूचणार नाही. पचणार नाही. ते कोरडेच राहतात. म्हणून श्रीसमर्थांनी, जो खरा निरभिमानी, आपले अवगुण टाकून देण्याचा प्रयत्न करणारा, सर्व निरुपणाचे मनन करुन साधनेकडे, प्रवृत्त होणारा, तोच खरा श्रोता होय, असे म्हटले आहे. निरूपणाप्रमाणेच आपली क्रिया करू लागला म्हणजे सहजच तो सद्गुरूंचा आवडता होतो. वरचेवर अंतर्मुख होऊन आपल्या ठिकाणी कोणतेही दोष नाहीत ना? त्या दोषामुळे सद्गुरूंना कमीपणा येणार नाही नां? असा पुन: पुन्हा विवेक करून सर्व दोष नाहीसे करण्याचा प्रयत्न करतो. अशा शिष्याचे अंत:करण सद्गुरूच्या वचनाने निवालेले असते. सद्गुरूकृपेने तो भारावून गेलेला असतो. निरूपणाने त्याचे अतं:करण उचंबळून येते. सद्गुरूविषयी त्याच्या ठिकाणी असलेला आदर सहज प्रकट होतो. सद्गुरूच्या कृपेनेच कृतांतकाळाचेही भय नाहीसे होऊन त्यास निर्भय स्थिती प्राप्त होते.**

**।।श्रीरामसमर्थ।।**

**एकवीससमासी**

**समास तिसरा**

**।।श्रीराम।।**

वंदीन सद्गुरू समर्थ। जो अर्थाचा हि अर्थ।
जयाचेनि हा परमार्थ। प्रगट जाला।।१
जयाचेनि स्वरूपप्राप्ती। होऊनि फिटे जीवित्वभ्रांती।
जयाचेनि पूर्ण होती। सर्व मनोरथ।।२
जो पूर्ण प्राप्तीचा दाता। जो भवसिंधूचा त्राता।
तयाचेनि प्रसादे आतां। करीन वक्तृत्व।।३
जे वक्तयाची लक्षणें। अतिं उत्तमें सुलक्षणे।
क्रिया पालटे निरूपणें। श्रोतयाची।।४
ऐसे सांगिजेती वक्ते। तेणें चि प्रसंगें श्रोते।
जे कासेसी लाउनी उतरिते। भाविक जनांसी।।५
भक्त विरक्त आणि प्रेमळ। शुध ज्ञाते दीन वच्छळ।
हृदये शुध गंगाजळ। निर्मळ जैसें।।६
परोपकारी धार्मिक। क्रिया न घडतां साशंक।
जयांचा सन्निध विवेक। सिध चि असे।।७
जैसें चि बोलणें तैसी च क्रिया। ऐसा वक्ता जोडलियां।
तात्काळ बाणे श्रोतयां। आंगी निरूपण।।८
वक्ता तो चि जो शांत। आणि असे पूर्णप्राप्त।
सर्वकाळ क्रोधें संतप्त। तो वक्ता नको।।९
वक्ता पाहिजे उदास। जयाचें बोलणें निराश।
जयाचे हृदई वसे आस। तो वक्ता नको।।१०
आशा धरूनि बोले जीवीं। तो तैसें चि निरूपण लावी।
सीधे उगविले गोवी। युक्तिजाळ टाकूनियां।।११
एकासी शिष्याची आस। शिष्याकारणें कासावीस।
होऊनिया सावकाश। पसारा सोडिती।।१२
ते समाधान बुडवणें। विकल्पें शिष्य चाळवणे।
शिष्यसमुदाये वणवणे। वरपडे जाले।।१३
ते लुलु बराडे बापुडी। शिष्याकारणें कुडकुडी।
सर्वकाळ होताती वेडी। त्यांचे वक्तृत्व नको।।१४
जो गुरू विश्वाचा। जेथे अंकुर नाही भेदाचा।
तो चि वक्ता अपाडांचा। सकळांसी बोधी।।१५
जो आशंका फेडूं जाणे। जाणपणे हुंबरों नेणे।
श्रोतयाचे शब्द उणे। साहे विवेकें।।१६
सर्वकाळ क्रोधे संतप्त। आशंका घेतां करी घात।
वकृत्वाचा अर्थ जात। भलतीचकडे।।१७
अयुक्त च प्रतिपाद्य करी। उछेद होतां चि गुर्गुरी।
बोलिला शब्द थावरी। बळे चि अप्रमाण।।१८
बोलतां बोलतां येती बळा। हातपाये कांपती चळचळा।
क्रोधे उकावती वेळोवेळा। सीघ्रकोपी जे।।१९
येका श्वासें बोलत चि राहे। नेत्र भोवंडुनी गरगरा पाहे।
दुसऱ्याचें वक्तृत्व न साहे। आपणांपुढे।।२०
होय नव्हे आरंभिली। क्रोधे देहेशुधी उडाली।
बहुसाल वृष्टी केली। सन्मुख मुख माधवें।।२१
क्रोधे काळवंडली मुखवटी। ऐक्यता पावल्या भृकुटी।
सीरा कंठी आणि लल्हाटी। प्रगट जाल्या बळें।।२२
बोलतां बोलतां नीच उत्तरें। ताडित उठिले परस्परे।
श्रोते आणि वक्ते रूधिरें। उभे न्हाले।।२३
कोल्हाळ उठिला येकसरा। केला पुस्तकाचा घुसमारा।
थोऱ्यां तंवकें राजद्वारा। माहापुरूष निघाले।।२४
ऐसीं क्रोधी अनावरें। देहबुधीचीं पामरें।
ऐसें वक्तृत्व चतुरें। वमनप्राय त्यजावें।।२५
आपण क्रियेसी अंतरले। आणि वक्तृत्वाचे भरीं भरले।
तया श्रवणें श्रोते जाले। वक्तया ऐसे।।२६
आशा धरूनि वक्ता बोले। तेथें श्रोते नागवले।
शृंघारिक वचने च्यवले। साधक जैसे।।२७
बहु श्रवणें घटेल जाला। ताडे तोडे शिकोनि आला।
तया वक्तृत्वें जो तयाला। स्वहित न घडे।।२८
वक्ता पाहिजे अनुभवाचा। ज्ञाता नसावा पुस्तकीचा।
पुस्तकज्ञानें श्रोतयाचा। भ्रम तुटेना सर्वथा।।२९
कां वक्ता वक्तृत्वाचे भरी। भरोनि श्रोता निरोध करी।
तेणें श्रोता धाक धरी। पुन्हा न ये श्रवणी।।३०
अति निरोधें उपजे त्रास। मोडे श्रोतयांचा हव्यास।
ऐसा वक्ता तो कर्कश। तो हि नको।।३१
कां जो वर्मे लक्षुनी बोले। तेणें श्रोते क्रोधासी आले।
आपण हि लक्षूं निघाले। वर्मे वक्तयाची।।३२
कां जें रूचेना श्रोतया मनी। ते दाटुनी लावी लावणी।
तेणें उपजे अत्यंत काणी। श्रोते उठोनि पळती।।३३
कां आपण वर्ते जयापरी। ते चि क्रिया प्रतिपाद्य करी।
आपणांपरती दुसरी। मांडों चि नेदी।।३४
वक्ता जाणिवेनें जिंकिला। उणीव येतां तगमगिला।
जाणिवे ताठा भरला। तो वक्ता नको।।३५
जो सकळ जाणोनि नेणता। जो श्रोतयांचा हि श्रोता।
जेथें अहंतेची वार्ता। नि:शेष नाही।।३६

जे अत्यंत विषयासक्त। जे कुटुंबाचे निजभक्त।
जयांपासी पाषांड मत। निरंतर वसे।।८७
जे वैराग्ये कनिष्ट। जे शब्दज्ञानें वरिष्ट।
ऐसे श्रोते परम नष्ट। सर्वथा नकों।।८८
जो संसारें तापला। जो स्वहितासी प्रवर्तला।
तो चि श्रोता लाधला। परम गुह्य।।८९
असो ऐसे श्रोते वक्ते। सादर सर्वांगे जाणते।
जाणीव आणि क्रोधातें। आवरू जाणती।।९०
निराभिमानी जो समर्थ। तयासी साजे हा परमार्थ।
अभिमान वाहे तो व्यर्थ। भूमिभार जाला।।९१
श्रोते ऐकती आदरें। तरी बोलेन बोबडीं उत्तरे।
स्वामी तुमचेनि आधारें। होईन निराभिमानी।।९२
जैसी मायेबापें वर्तती। तैसी च क्रिया लेंकुरें घेती।
म्हणोनियां श्रोती वक्तीं। निराभिमान व्हावें।।९३
तुम्ही स्वयें निराभिमान। परी माझा ठाईं अभिमान।
असेल म्हणोन साधन। पाये तुमचे।।९४
माझा आंगी अभिमान जडे। तरी गोष्टी येईल स्वामीकडे।
जैसा परिवार पळतां मोडे। महत्व नृपतीचें ।।९५।।
तुम्हा सज्जनांची कृपा मज। आणि उरेल अभिमानफुंज।
तरि हे माझी लाज। तुम्हास चि कीं ।।९६।।
स्वामी तुमचेनि प्रतापें। कृतांतकाळ तो हि कांपे।
तुमचेनि वचनमात्रें सोपें। होये परब्रह्म ।।९७।।
तुमची कृपा जेथें घडे। तयासी च परब्रह्म जोडे।
प्राणी सुटती रोकडे। दुखापासूनि सर्वदा ।।९८।।
तुम्हासी शरण अनन्य भावें। जीता लुटी आनंद फावे।
तया सुखाचे मिरवे। तेज शांती आंगी ।।९९।।
येका भावार्थासाठी। उघडे शब्दरत्नपेटी।
अनर्घ्य रत्नांची गोमटी। माळ बसे हृदई ।।१००।।
तुमचेनि उचिष्टलेशें। आणि गुरूशिष्याचेनि मिसें।
सांगिजेल जेणें पिसें। झडे जीवपणाचें ।।१०१।।
इति श्री रामीरामदास। विनवी संतसज्जनांस।
वित्पत्ति आणि पदप्रास। क्षमा केली पाहिजे ।।१०२।।

*******

**।।श्रीरामसमर्थ।।**

## समास चौथा

**।।श्रीगणेशाय नमः।।**

**खऱ्या श्रोता- वक्त्याची लक्षणे सांगतानां श्रीसमर्थांच्या दृष्टिपुढें आदर्श गुरूशिष्यांचीच लक्षणे होती. त्यातहि सद्‌गुरूपदीं विराजमान होणाऱ्या, होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तिवर श्रीसमर्थांचा रोख जास्त आहे. गुरूपदाकडे श्रेष्ठत्व, नेतृत्व हे सहजच येत असल्यामुळे, त्याच्या आचारविचाराचा प्रभाव मोठ्या प्रमाणात समाजमनावर पडणार असल्यामुळे ती व्यक्ति सर्व आदर्श गुणांनी, उत्तम लक्षणांनी मंडीत असावयासच पाहिजे. म्हणून सद्गुरूची यथार्थ पारख होण्यासाठी श्रीसमर्थ आता सद्गुरूची लक्षणे सांगत आहेत.**

**भौतिक, लौकीक ज्ञानामध्ये श्रेष्ठत्व असणे आणि मोक्षाचा अधिकार असणे या सर्वस्वी भिन्न गोष्टी आहेत. भौतिक गोष्टींवर प्रभुत्व गाजविणाऱ्या व्यक्तिंचा प्रभाव सामान्य जनांवर लगेच पडतो. पोट भरावयाच्या अनेक विद्या आहेत. आत्मरंजनाच्या अनेक कला आहेत. या विद्यांमध्ये, कलांमध्ये निपुण असणाऱ्याकडे अनेक जण कल्याणाच्या इच्छेने आकर्षित होतात. पण हा काही आत्मकल्याणाचा मार्ग नव्हे. ज्याला स्वत:ला आत्मज्ञान झालेले नाही, तो इतरांना पैलतीरास नेऊ शकणार नाही. अज्ञानाचा निरास करण्यासाठी परमश्रेष्ठ ज्ञानाचीच कास धरली पाहिजे. देहासक्तीने जखडलेल्या जीवाचे भगवंतावरील ममत्व क्षीण झालेले असते. ही देहासक्ती क्षीण करून भगवंताशी ऐक्य दृढ करणाराच खरा सद्गुरू होय. माया दुस्तर आहे. मायेच्या जंजाळांत अडकलेल्या जीवाला मुक्त करून, या संसार दु:खातून सोडवून आत्महिताची जाणीव करून देणारा, त्यासाठी शिष्याकडून खडतर साधन करून घेणाराच खरा सद्गुरू होय.**

**प्रापंचिक त्रिविध तापांचे चटके बसून संसाराची असारता, अपूर्णता जाणवली, त्यातून एका सद्गुरूशिवाय कोणी सोडविणारा त्राता नाही अशी दृढ भावना झाली की मुमुक्षू शिष्य सद्गुरू शोधू लागतो. या वेळी केवळ त्याच्या पूर्वपुण्याईने खऱ्या सद्गुरूचा लाभ झाला तरच त्याचे कल्याण होते.**

**आत्मज्ञानाची प्रमेये क्लिष्ट व दुस्तर असली तरी भाषा सोपी असते. शिष्याच्या परम कल्याणाची तळमळ नसणारे असद्गुरू या सोप्या मायावी भाषेने क्लिष्ट प्रमेयांच्या जंजाळात मुमुक्षूला गुंतवून टाकतात. यात दोघांचेहि अनहित होते.**

**प्रचीतीचे आत्मज्ञान, प्रखर वैराग्य, दृढ उपासना, स्वधर्मकर्माचा विचार, नित्य साधन, हरिकथा, निरूपण, श्रवण, मनन, नीति, न्याय मर्यादा आणि तेरावे महत्वाचे कृपाळूपण ही श्रीसद्गुरूची लक्षणे स्वभावत:च ज्याच्या अंगी बाणली आहेत अशा सद्गुरूच्या पदीं मुमुक्षू शिष्याने अनन्यभावे शरण जाऊन स्वत:चे हीत करून घेतले पाहिजे. तरच त्याला आत्मज्ञानाचा निश्चित मार्ग उमजेल, त्या मार्गावर वाटचाल करण्यासाठी अभ्यास, साधना तो निश्चयाने, निग्रहाने करू शकेल आणि अंती अखंड समाधानाचे ध्येय प्राप्त करू शकेल.**

*** समास चौथा ***

**।।श्रीराम।।**

जे करामती दाखविती। तेहि गुरू ह्मणिजेती।
परंतु सदगुरू नव्हेती। मोक्षदाते।।१ ।।
सभामोहन भुररी चेटकें। साबरमंत्र कौटालें अनेकें।
नाना चमत्कार कौतुकें। असंभाव्य सांगती।।२ ।।
सांगती औषधीप्रयोग । कां सुवर्णधातूचा मार्ग ।
दृष्टीबंधनें लागवेग । अभिळाषाचा ।।३ ।।
साहित संगीत रागज्ञान । गीत नृत्य तान मान ।
नाना वाद्यें सिकविती जन । तेहि येक गुरू ।।४ ।।
विद्या सिकविती पंचाक्षरी । तोडतोडे नानापरी ।
कां पोट भरे जयावरी । ते विद्या सिकविती ।।५ ।।
जे यातीचा जो व्यापार । सिकविती भरावया उदर ।
तेहि गुरू परी, साचार - । सद्‌गुरू नव्हेती ।।६ ।।
आपली माता आणी पिता । तेही गुरूचि तत्वतां ।
परी पैलपार पावविता । तो सद्‌गुरू वेगळा ।।७ ।।
गाईत्रीमंत्राचा उचारू । सांगे तो साचार कुळगुरू ।
परी ज्ञानेंविण पैलपारू । पाविजेत नाहीं ।।८ ।।
जो ब्रह्मज्ञान उपदेसी । अज्ञानअंधारे निरसी ।
जीवात्मयां परमात्मयांसी । ऐक्यता करी ।।९ ।।
विघडले देव आणी भक्त । जीवशिवपणें द्वैत ।
तया देवभक्तां येकांत - । करी, तो, सद्‌गुरू ।।१० ।।

गुरूची मर्यादा राखतां। ब्राह्मण क्षोभती तत्वतां।
तेथें ब्राह्मण्य रक्षु जातां। गुरूक्षोभ घडे ।।६१ ।।
ऐसी सांकडीं दोहीकडे। तेथे प्रस्तावा घडे।
नीच यातीस गुरूत्व न घडे। याकारणें ।।६२ ।।
तथापि आवडी घेतली जीवें। तरी आपणचि भ्रष्टावें।
बहुत जनांसी भ्रष्टवावे। हें तों दूषणचि कीं ।।६३ ।।
आतां असो हा विचारू। स्वयातीचा पाहिजे गुरू।
नाहीं तरी भ्रष्टाकारू। नेमस्त घडे ।।६४ ।।
जे जे कांही उत्तम गुण। तें तें सद्‌गुरूचें लक्षण।
तथापि सांगों वोळखण। होये जेणे ।।६५ ।।
येक गुरू येक मंत्रगुरू। येक यंत्रगुरू येक तांत्रगुरू।
येक वस्तादगुरू येक राजगुरू। म्हणती जनीं ।।६६ ।।
येक कुळगुरू येक मानिला गुरू। येक विद्यागुरू येक कुविद्यागुरू।
येक असदगुरू येक यातिगुरू। दंडकर्ते ।।६७ ।।
येक मातागुरू येक पितागुरू। येक राजागुरू येक देवगुरू।
येक बोलिजे जगद्‌गुरू।सकळकळा ।।६८ ।।
ऐसा हे सत्रा गुरू। याहिवेगळे आणीक गुरू।
ऐक तयांचा विचारू। सांगिजेल ।।६९ ।।
येक स्वप्नगुरू येक दीक्षागुरू। येक म्हणती प्रतिमागुरू।
येक म्हणती स्वयें गुरू। आपला आपण ।।७० ।।
जे जे यातीचा जो व्यापारू। ते ते त्याचे तितुके गुरू।
याचा पाहातां विचारू। उदंड आहे ।।७१ ।।
असो ऐसे उदंड गुरू। नाना मतांचा विचारू।
परी जो मोक्षदाता सद्‌गुरू। तो वेगळाचि असे ।।७२ ।।
नाना सद्विद्येचे गुण। याहिवरी कृपाळूपण।
हे सद्‌गुरूचें लक्षण। जाणिजे श्रोतीं ।।७३ ।।
इती श्री रामदास म्हणे। धन्य तयाचे महिमान।
या लक्षणे परिपूर्ण। तो सद्गुरू करावा ।।७४ ।।

**।।श्रीरामसमर्थ ।।**

***

**।।श्रीरामसमर्थ ।।**

**समास पाचवा**

**।।श्रीगणेशाय नमः ।।**

**मागील समासात श्रीसमर्थांनी आदर्श गुरूची लक्षणे साक्षेपाने सांगितली आहे. केवळ परम भाग्यानेच पूर्वसुकृताचे दृश्य फळ म्हणूनच अशा संतांचा लाभ होतो. लाभ झाला म्हणजे सर्व संपले असे नाही. शिष्याच्या भूमिकेतून साधन मार्गावरील प्रवास सुरू झाला इतकेच !**

**श्रीसमर्थांना अगदी बालवयात श्रीरामाचे दर्शन, कृपा, अनुग्रह या योगे सद्‌गुरूंचा अलभ्य लाभ घडला. तरीही सर्वसंगपरित्याग करून बारा वर्षांचे खडतर साधन, उपासना, तपश्चर्या आणि बारा वर्षांचे आसेतुहिमाचल तीर्थाटन याद्वारे त्यांनी उत्तम सच्छिष्यलक्षणांचा प्रत्यय दाखवून दिलेला आहे.**

**या समासात शिष्याने सच्छिष्य होण्यासाठी श्रीसमर्थ त्याची लक्षणे सांगत आहेत.**

**खरे तर गुरू आणि शिष्य दोघेही परमार्थ मार्गातील अधिकारी असलेच पाहिजेत. त्यांची भूमिका, त्यांचे व्यवहार, त्यांची साधना, त्यांचे आत्मज्ञान सर्व काही शुद्धच असले पाहिजे, असा श्रीसमर्थांचा आग्रह आहे. सकस भूमीत कसदार बियाणे, योग्य ऋतुकाली योग्य पद्धतीने पेरणी, वेळच्या वेळी पुरेसा पाऊस, जलसिंचन, मशागत आणि पीक हाती आल्यावरही त्याची उत्तम निगा – हा शेतीतील दृष्टांत अतिशय समर्पकतेने येथे श्रीसमर्थांनी वापरला आहे.**

**साधन, अभ्यास, सद्‌गुरू, सच्छिष्य, सच्छास्त्र, सत्कर्म, सदुपासना, सद्वासना, सत्कर्म, स्वधर्म, सत्संग नित्यनेम आणि 'सद्‌गुरूवचनी विश्वास पूर्ण' या तेरा गोष्टी जुळून आल्या तरच काही शुद्धज्ञान लाभून या नरजन्माचे हित घडणार. यातहि 'सद्‌गुरूवचनी विश्वास पूर्ण' असल्याशिवाय सच्छिष्य या पदवीला शिष्य काही पात्र ठरणार नाही.**

**आधी काय विचार करायचा तो करून ज्या काय परीक्षा, कसोट्या लावायच्या असतील त्या लावून एकदा सद्‌गुरू म्हणून अनन्य शरणागती पत्करल्यावर मात्र अगदी ब्रह्मांड कोसळून पडले तरी भावार्थाला यत्किंचितही धक्का लागता कामा नये.**

**हा मुख्य गाभा ठेवून अगदी सुगम शद्बात, शिष्याची, सच्छिष्याची, असच्छिष्याची लक्षणे या समासात अगदी सांगोपांग विशद केली आहेत.**

**अवगुणांचा त्याग करून प्रयत्नपूर्वक उत्तम लक्षणांचा अंगिकार करणारे भाग्यवंत शिष्य स्वानंदाची मजा भोगतात. त्यांचे कल्याण होते. ते समर्थच होतात.**

।। श्रीरामसमर्थ ।।
।। श्रीराम ।।
मागां सद्‌गुरूचें लक्षण । विशद केलें निरूपण ।
आतां सच्छिष्याची वोळखण । सावध ऐका ।।१ ।।
सद्‌गुरुविण सच्छिष्य । तो वायां जाय निशेष ।
कां सच्छिष्येंविण विशेष। सद्‌गुरू सिणे ।।२ ।।
उत्तम भूमि शोधिली शुध्द। तेथें बीज पेरिलें किडखाद ।
कां तें उत्तम बीज परी समंध। खडकेंसि पडिला ।।३ ।।
तैसा सच्छिष्य तें सत्पात्र। परंतु गुरू सांगे मंत्र तंत्र।
तेथें अरत्र ना परत्र। कांहीच नाहीं ।।४ ।।
अथवा गुरू पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनाधिकारी ।
भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा ।।५ ।।
तैसें येकाविण येक । होत असे निरार्थक ।
परलोकींचे सार्थक । ते दुऱ्हावे ।।६ ।।
ह्मणौनि सद्‌गुरू आणी सच्छिष्य । तेथे न लगती सायास ।
त्यां उभयतांचा हव्यास । पुरे येकसरा ।।७ ।।
सुभूमि आणी उत्तम कण । उगवेना प्रजन्येंविण ।
तैसें अध्यात्मनिरुपण । नस्तां होये ।।८ ।।
सेत पेरिलें आणी उगवलें । परंतु निगेविण गेलें ।
साधनेंविण तैसें जालें । साधकांसी ।।९ ।।
जंवरी पीक आपणास भोगे । तंवरी अवघेचि करणें लागे ।
पीक आलियांहि, उगे । राहोंचि नये ।।१० ।।
तैसें आत्मज्ञान जालें । परी साधन पाहिजे केलें ।
येक वेळ उदंड जेविलें । तऱ्ही सामग्री पाहिजे ।।११ ।।
ह्मणौन साधन अभ्यास आणी सद्गुरू । सच्छिष्य आणी सच्छास्त्रविचारू।
सत्कर्म सद्वासना, पारू। पाववी भवाचा ।।१२ ।।
सदुपासना सत्कर्म। सत्क्रिया आणी स्वधर्म।
सत्संग आणी नित्य नेम। निरंतर ।।१३ ।।
ऐसें हें अवघेचि मिळे। तरीच विमळ ज्ञान निवळे।

लक्षून विष्टेचा गोळा । हंस ह्मणवी ।।६४।।
तैसे सज्जनाचे संगती । विषई सज्जन ह्मणविती ।
विषय आमेद्य चितीं । गोळा लक्षिला ।।६५।।
काखे घेऊनियां दारा । ह्मणे मज संन्यासी करा ।
तैसा विषई सैरावैरा । ज्ञान बडबडी ।।६६।।
असो ऐसे पढतमूर्ख । ते काय जाणती अद्वैतसुख ।
नारकी प्राणी नर्क । भोगिती स्वइछा ।।६७।।
वैषेची करील सेवा । तो कैसा मंत्री म्हणावा ।
तैसा विषयदास मानावा । भक्तराज केवी ।।६८।।
तैसे विषई बापुडे । त्यांस ज्ञान कोणीकडे ।
वाचाळ शाद्बिक बडबडे । वरपडे जाले ।।६९।।
ऐसे शिष्य परमनष्ट । कनिष्ठांमधें कनिष्ठ ।
हीन अविवेकी आणी दृष्ट । खळ खोटे दुर्जन ।।७०।।
ऐसे जे पापरूप । दीर्घदोषी वज्रलेप ।
तयांस प्राश्चीत, अनुताप । उद्धवतां आहे ।।७१।।
तेंहि पुन्हां शरण जावें। सद्‌गुरूस संतोषवावें।
कृपादृष्टी जालियां व्हावें। पुन्हा शुध्द।।७२।।
स्वामीद्रोह जया घडे । तो यावश्चंद्र नरकीं पडे।
तयास उपावचि न घडे। स्वामी तुष्टल्यावांचुनी।।७३।।
स्मशानवैराग्य आलें। ह्मणोन लोटांगण घातलें।
तेणें गुणें उपतिष्ठलें। नाहीं ज्ञान।।७४।।
भाव आणिला जायाचा। मंत्र घेतला गुरूचा।
शिष्य जाला दो दिसांचा। मंत्राकारणें।।७५।।
ऐसे केले गुरू उदंड। शब्द सिकला पाषांड।
जाला तोंडाळ तर्मुंड। माहापाषांडी।।७६।।
घडी येक रडे आणी पडे। घडी येक वैराग्य चढे।
घडी येक अहंभाव जडे। ज्ञातेपणाचा।।७७।।
घडी येक विस्वास धरी। सवेंच घडी येक गुर्गुरी।
ऐसे नाना छंद करी। पिसाट जैसा।।७८।।
काम क्रोध मद मत्सर। लोभ मोह नाना विकार।
अभिमान कापट्य तिरस्कार। ह्रदईं नांदती।।७९।।
अहंकार आणी देहपांग। अनाचार आणी विषयसंग।
संसार प्रपंच उद्वेग। अंतरीं वसे।।८०।।
दीर्घसूत्री कृतघ्न पापी। कुकर्मी कुतर्की विकल्पी।
अभक्त अभाव सीघ्रकोपी। निष्ठुर परघातक।।८१।।
ह्रदयेंसुन्य आणी आळसी। अविवेकी आणि अविस्वासी।
अधीर अविचार, संदेहासी। दृढ धर्ता।।८२।।
आशा ममता तृष्णा कल्पना। कुबुद्धी दुर्वृत्ति दुर्वासना।
अल्पबुद्धि विषयकामना। ह्रदई वसे।।८३।।
ईषणा असूया तिरस्कारें। निंदेस प्रवर्ते आदरें।
देहाभिमानें हुंबरे। जाणपणें।।८४।।
क्षुधा तृष्णा आवरेना। निद्रा सहसा धरेना।
कुटुंबचिंता वोसरेना। भ्रांति पडिली।।८५।।
शाब्दिक बोले उदंड वाचा। लेश नाहीं वैराग्याचा।
अनुताप धारिष्ट साधनाचा। मार्ग न धरी।।८६।।
भक्ति विरक्ति ना शांती। सद्‌वृत्ति लीनता ना दांती।
कृपा दया ना तृप्ती। सुबुद्धि असेजना।।८७।।
कायाक्लेसीं शेरीरहीन। धर्मविषई परम कृपण।
क्रिया पालटेना कठिण। ह्रदये जयाचें।।८८।।
आर्जव नाहीं जनासी। जो अप्रिये सज्जनासी।
जयाचे जिवीं आहिर्णेसीं। परज्यून वसे।।८९।।
सदा सर्वकाळ लटिका। बोले माईक लापणिका।
क्रिया विचार पाहतां, येका। वचनीं सत्य नाहीं।।९०।।
परपीडेविषई तत्पर। जैसे विंचु आणी विखार।
तैसा कुशब्दें जिव्हार। भेदी सकळांचें।।९१।।
आपले झांकी अवगुण। पुढिलांस बोले कठिण।
मिथ्या गुणदोषेंविण। गुणदोष लावी।।९२।।
स्वयें पापात्मा अंतरीं। पुढिलांचि कणव न करी।
जैसा हिंसक दुराचारी। परदुःखें शिणेना।।९३।।
दुःख पराव्याचें नेणती। दुर्जंन गांजिलेची गांजिती।
श्रम पावतां आनंदती। आपुले मनीं।।९४।।
स्वदुःखें झुरे अंतरीं । आणी परदुःखें हास्य करी।
तयास प्राप्त येमपुरी। राजदूत ताडिती।।९५।।
असो ऐसें मदांध बापुडें। तयांसि भगवंत कैंचा जोडे।
जयांस सुबुद्धि नावडे। पूर्वपातकेंकरूनी।।९६।।
तयास देहाचा अंतीं। गात्रें क्षीणता पावती।
जिवलगें वोसंडिती। जाणवेल तेव्हां।।९७।।
असो ऐसे गुणावेगळे। ते सच्छिष्य आगळे।
दृढभावर्थे सोहळे। भोगिती स्वानंदाचे।।९८।।
जये स्थळीं विकल्प जागे। कुळाभिमान पाठीं लागे।
ते प्राणी प्रपंचसंगें। हिंपुटी होती।।९९।।
जेणेंकरितां दुःख जालें। तेंचि मनीं दृढ धरिलें।
तेणें गुणें प्राप्त जालें। पुन्हां दुःख।।१००।।
संसारसंगें सुख जालें। ऐसें देखिलें ना ऐकिलें।
ऐसें जाणोन अनहित केलें। ते दुःखी होती स्वयें।।१०१।।
संसारी सुख मानिती। ते प्राणी मूढमती।
जाणोन डोळे झांकिती। पढतमूर्ख।।१०२।।
प्रपंच सुखें करावा। परी कांहीं परमार्थ वाढवावा।
परमार्थ अवघाचि बुडवावा। हें विहित नव्हे।।१०३।।
मागां जालें निरूपण। गुरूशिष्यांची वोळखण।
आतां उपदेशाचें लक्षण। सांगिजेल।।१०४।।
इति श्री रामदास म्हणे। ऐसी शिष्यांची लक्षणे।
सांगितली ते जाण। श्रोतीं वोळखावे।।१०५।।

***

**।।श्रीरामसमर्थ।।**
**समास सहावा**
**।।श्रीगणेशाय नमः।।**

**श्रीसद्‌गुरूंना सच्छिष्याचा आणि सच्छिष्याला श्रीसद्‌गुरूंचा लाभ घडल्यानंतर आता श्रीसमर्थ आत्मज्ञानाच्या उपदेशाची लक्षणे सांगणार आहेत. आत्मज्ञानाचा लाभ घडण्यासाठी शिष्याचे देहावरील ममत्व मंद झाले पाहिजे, तरच त्याचे मन भगवंतावर जडेल.**

**संसार मुळातच अपूर्ण आहे. असार आहे. दुःखदायक आहे. आशा, ममता, अहंकार, कामादि वृत्ती, वखवखलेली वासना यांची भ्रांत आणि मूढ जीवावर पकड असते. ज्या ज्या गोष्टी दुःखमूलक आहेत, त्यांचा तसाच अनुभव येऊनही, त्या जीवाला या संसारातून सुटण्याची इच्छाच होत नाही. डोक्यावर ओझे घेउन ‘आतां मी बुडतो, मी बुडतो, आता मी मरतो’ अशा आरोळ्या ठोकून आक्रोश करीत असतो पण हे ओझे फेकून देऊन ‘रामा,**

या नरदेहाचेनि लागवेगें। सार्थक करावें संतसंगे।
नीचयोनीं दु:ख मागें। बहुत भोगिलें ।।३८।।
कोण समयी येईल कैसा। याचा न कळे किं भर्वसा।
जैसा पक्षी दाही दिशा। उडोन जाती ।।३९।।
तैसें वैभव हें सकळ। कोण जाणे कैसी वेळ।
पुत्रकळत्रादि सकळ। विघडोन जाती ।।४०।।
पाहिली घडी नव्हे आपुली। वयसा तरी निघोन गेली।
देह पडतांच ठेविली-। आहे नीच योनी ।।४१।।
स्वान शुकरादिक नीच याती। भोगणें घडे विपत्ती।
तेथें कांहीं उत्तम गती। पाविजेत नाहीं ।।४२।।
मागां गर्भवासीं आटाटी। भोगितां जालासि रे हिंपुटी।
तेथुनियां थोरा कष्टीं। सुटलासि दैवें ।।४३।।
दु:ख भोगिलें आपुल्या जीवें। तेथें कैचिं होतीं सर्वे।
तैसेंचि पुढें येकलें जावें। लागेल बापा ।।४४।।
कैंची माता कैंचा पिता। कैंची बहिण कैचा भ्राता।
कैंची सुहृदें कैंची वनिता। पुत्रकळत्रादिक ।।४५।।
हे तूं जाण मावेचीं। आवघीं सोइरीं सुखाचीं।
हे तुझ्या सुखदु:खाचीं। सांगाती नव्हेती ।।४६।।
कैंचा प्रपंच कैचें कुळ। कासया होतोसी व्याकुळ।
धन कण लक्ष्मी सकळ। जाइजणें।।४७।।
कैंचे घर कैंचा संसार। कासया करिसी जोजार।
जन्मवरी वाहोन भार। सेखीं सांडून जासी ।।४८।।
कैचें तारूण्य कैंचें वैभव। कैंचें सोहळे हावभाव।
हें सकळहि जाण भाव। माईक माया ।।४९।।
येच क्षणीं मरोन जासी। तरी रघुनाथीं अंतरलासी।
माझें माझें ह्मणतोसी। ह्मणौनियां ।।५०।।
तुवां भोगिल्या पुनरावृत्ती। ऐसीं मायबापें किती।
स्त्री कन्या पुत्र होती। लक्षानलक्ष ।।५१।।
कर्मयोगें सकळ मिळालीं। येके स्थळीं जन्मास आलीं।
तें तुवां आपुलीं मानिलीं। कैसीं रे पढतमूर्खां ।।५२।।
तुझें तुज नव्हे शरीर। तेथें इतरांचा कोण विचार।
आतां येक भगवंत साचार। धरीं भावार्थबळें ।।५३।।
येका दुर्भरा कारणें। नाना नीचांची सेवा करणें।
नाना स्तुती आणी स्तवनें। मर्यादा धरावी ।।५४।।
जो अन्न देतो उदरासी। शेरीर विकावें लागे त्यासी।
मां जेणें घातलें जन्मासी। त्यासी कैसें विसरावें ।।५५।।
अहिर्निशी ज्या भगवंता। सकळ जिवांची लागली चिंता।
मेघ वरूषे जयाची सत्ता। सिंधु मर्यादा धरी ।।५६।।
भूमि धरिली धराधरें। प्रगट होईजे दिनकरें।
ऐसी सृष्टी सत्तामात्रें। चालवी जो कां ।।५७।।
ऐसा कृपाळु देवाधिदेव। नेणवे जयाचें लाघव।
जो सांभाळी सकळ जीव। कृपाळुपणें ।।५८।।
ऐसा सर्वात्मा श्रीराम-। सांडून, धरिती विषयकाम।
ते प्राणी दुरात्मे अद्धम। केलें पावती ।।५९।।
रामेविण जे जे आस। तितुकी जाणावी नैराश।
माझें माझें सावकाश। सीणचि उरे ।।६०।।
जयास वाटे सीण व्हावा। तेणें विषयो चिंतीत जावा।
विषयो न मिळतां जीवा। तगबग सुटे ।।६१।।
सांडून राम आनंदघन। ज्याचे मनीं विषयचिंतन।
त्यासी कैंचें समाधान। लोलंगतासी ।।६२।।
जयास वाटे सुखचि असावें। तेणें रघुनाथभजनीं लागावें।
स्वजन सकळहि त्यागावे। दु:खमूळ जे ।।६३।।
जेथें वासना झोंबोन पडे। तेणेंचि अपायें दु:ख जडे।
ह्मणौनि विषयवासना मोडे। तो येक सुखी ।।६४।।
विषयजनित जें जें सुख। तेथेंचि होतें परमदु:ख।
पूर्वी गोड अंतीं शोक। नेमस्त आहे ।।६५।।
गळ गिळितां सुख वाटे। वोढून घेतां घसा फाटे।
कां तें बापुडें मृग आपटे। चारा घेऊन पळतां ।।६६।।
तैसी विषयेसुखाची गोडी। गोड वाटे परी ते कुडी।
ह्मणौनियां आवडी। रघुनाथीं धरावी ।।६७।।
ऐकोनि बोले भाविक। कैसेनि घडे जी सार्थक
सांगा स्वामी येमलोक । चुके जेणें ।।६८।।
देवासी वास्तव्य कोठें। तो मज कैसेंनि भेटे।
दु:खमूळ संसार तुटे। कोणेपरी स्वामी ।।६९।।
धडपुडी भगवत्प्राप्ती-। होऊन, चुके अधोगती।
ऐसा उपाये कृपामूर्ती। मज दीनास करावा ।।७०।।
वक्ता म्हणे हो येकभावें। भगवद्भजन करावें।
तेणें होईल स्वभावें। समाधान ।।७१।।
कैसे करावें भगवद्भजन। कोठें ठेवावें हें मन।
भगवद्भजनाचें लक्षण। मज निरोपावें ।।७२।।
ऐसा म्लानवदनें बोले। धरिले सदृढ पाऊलें।
कंठ सद्गदित, गळाले-। अश्रुपात दु:खे ।।७३।।
देखोन शिष्याची अनन्यता। भावें वोळला सद्गुरू दाता।
स्वानंद तुंबळेल आतां। पुढिले समासीं ।।७४।।
इति श्री रामदास। सांगितले वैराग्यास।
जो घेई सावकास। तो श्रेष्ठ जाणावा ।।७५।।
***

**।।श्रीरामसमर्थ।।**

**समास सातवा**

**।।श्रीगणेशाय नम:।।**

**श्रीसद्गुरूच्या निरूपणाने परमार्थाची गोडी निर्माण होते. निरूपण ऐकता भगवंताची प्राप्ती कशी होईल अशी तळमळ लागून राहते. या प्रपंचमोहातून पार पडण्यासाठी काय करावे, ही तळमळ कशाने थांबेल, म्हणून वारंवार सद्गुरूला शरण जाऊन तो शिष्य प्रश्न विचारतो, 'हे सद्गुरूना, कोणत्या उपायाने परमात्मा भेटेल? भाव कोठे ठेवावा म्हणजे भगवंताची भेट होईल?**

**श्रीसमर्थसद्गुरू म्हणताहेत, 'सगुण भगवंताच्या ठिकाणीच श्रद्धा असावी. भाव तेथेच ठेवावा. घननीळ, सांवळा, पितांबरधारी भगवान श्रीविष्णू- शेषशायी परमात्मा. त्याचेच हे सर्व पुढील अवतार आहेत. वास्तविक श्रीविष्णू आणि त्रिनयन श्रीशंकर हे एकरूपच आहेत. हे सर्व जगडंबर म्हणजे त्यांची लीला. या लीलेचा शोध लागत नाही. ती अगाध आहे. पण लीला करणारा परमात्मा, त्याचा शोध घेतला म्हणजे त्याची कृपा होते आणि हे सर्व कोडे उलगडते. मात्र परमात्म्याच्या ठिकाणी अनन्यसाधारण दृढ भाव पाहिजे. दृढ भावनेच्या योगानेच परमात्मा साध्य करता येतो. म्हणून त्या सगुण साकार भगवंताचे नाम श्रध्दापूर्वक हृदयीं धरून त्याची मानसपूजा नित्यनेमाने केली पाहिजे. हा दृढ भाव वाढीस लागण्याकरिता नित्यनेमाने सगुणाची चरित्रे श्रवण केली पाहिजेत. त्याच्या योगानें अंतर भगवंताकडे लागून त्यातच रंगून जाते.**

अंती मति ते चि गति । स्त्रीपुत्रें आक्रंदती ।
प्रपंचलोभें यातायाती । पुन्हां जन्म ।।३४।।
ऐशा चि करी येरझारा । प्रपंचलोभें आत्महत्यारा ।
येमयातना निलाजिरा । साहिली च साहे ।।३५।।
ऐसा सृष्टीचा दंडक । लोभें वेष्टिला येकें येक ।
जाणत असतां चि कौतुक । माया खेळे खेळ हा ।।३६।।
देखतां दिवसां नागवण । ठकिले आपणासी आपण ।
होतां हि परम सीण । आनंद चि मानी ।।३७।।
माहा आवर्तीं बुडतां । दृढ केली देहेअहंता ।
देहासी येईल निउन्यता । म्हणोनि न संगे ।।३८।।
जंव होये देहावसान । तंव न सोडी अभिमान ।
ऐसिया अभिमानें जन । सर्वत्र वर्ते ।।३९।।
येवं महत्वाची आशा । महत्व नसतां हि दुराशा ।
तेणें गुणें जगदीशा । अंतरती प्राणी ।।४०।।
येथे देहाचें थोरपण । तें चि उदास नागवण ।
देहाचेनि लोभें खूण । चुके परमार्थाची ।।४१।।
देहासी थोरपण आणितां । सीण चि उरे तत्वता ।
रासभाचे अश्व होतां । परम संकट ।।४२।।
देहेमात्र तितुका निंद्य । येकें मानिला परम वंद्य ।
तरी तो वंदितां चि खेद । पावेल तेणें ।।४३।।
देह विटाळाचा पुतळा । देह अशुद्धाचा गोळा ।
देह नाना अनर्गळा । दुर्गंधीचा वोतिला ।।४४।।
देह कृमीचें कोठार । देह अस्तीचा पंजर ।
जवकिला आहे जर्जर । खंगतां भंगे ।।४५।।
विष्ठा मूत्र वांती पीत । येणें चि देह चालत ।
नाना दु:खें आदि अंत । ऐसा चि हा ।।४६।।
देहो कुश्चीळ अमंगळ । देहो अत्यंत अनर्गळ ।
देहो वोंगळांत वोंगळ । वाहाती नव नाळीं ।।४७।।
देहीं असे नाना विकार । देहो असारीं असार ।
ऐसां तो हि क्षणभंगुर । अवचिता नासे ।।४८।।
ऐसिया मोधळ्याचा अभिमान । माथां वाहाती मूढ जन ।
वस्त्रीं भूषणीं शृंघारून । मी थोर म्हणती ।।४९।।
चर्चिती नाना सुगंध । तऱ्ही तें कदा नव्हे शुद्ध ।
अवचितीं उठे दुर्गंध । उपंढर पडे ।।५०।।
माझीं माझी ऐसे म्हणतां । मरोनि गेली माता पिता ।
तें जाणत चि असतां । पुन्हां म्हणे स्त्री माझी ।।५१।।
ऐसें म्हणत म्हणतां ते हि मेली । कन्यापुत्रें राम जालीं ।
तऱ्ही दुराशा धरिली । आपुल्या शरीराची ।।५२।।
वय वेंचलें जाला उतार । म्हणे माझें पिकलें शरीर ।
भ्रांत मूर्ख अविचार । खंगला अंतीं ।।५३।।
तारुण्य वैभव निघोनि गेलें । मग मानस प्रस्तावलें ।
हातीचें रत्न गळोनि पडिलें । मग चरफडूं लागे ।।५४।।
येथें स्वहित हें चि रत्न । गेलें न करितां प्रयेत्न ।
म्हणोनि चतुरीं येत्न । केला पाहिजे ।।५५।।
तों शिष्य म्हणे जी स्वामी । सांगा कोण प्रेत्न करूं मी ।
जेणें प्रेत्नें आत्मयारामीं । पावन होईजे ।।५६।।
देहादि प्रपंच नश्वर । पूर्ण कळला हा विचार ।
तेणें करितां अंतर । चंचळ जालें ।।५७।।
वाटें सकळ हि त्यजावें । कांहीं सार्थक करावें ।
तरी मज देवाधिदेवें । मार्गी लाविजे ।।५८।।
ऐसें शिष्याचें अंतर । जाणोनि देती प्रत्योत्तर ।
पुढिलीये समासीं चतुर । परिसोत कां ।।५९।।
इति श्री रामदास । म्हणे धरुनिया विश्वास ।
साधकीं अति सावकाश । श्रवण करावें ।।६०।।
***

**।। श्रीराम समर्थ ।।**

**समास आठवा**

**।। श्रीगणेशाय नम : ।।**

**मागील समासात शिष्याला ‘देहादी प्रपंच नश्वर आहे, हा जीव वृथाच त्यात रंगून गेला आहे, त्यामुळे या सगळ्याचा त्याग करावा’, असे वाटू लागले. त्यासाठी कसा प्रयत्न करावा, कोणत्या मार्गाने जावे, अशा विचाराने त्याचे मन चंचळ झाले आणि तो श्रीसमर्थांना शरण गेला. आता श्रीसमर्थ त्याची वृत्ती शांत, स्थिर होण्यासाठी दृश्य सृष्टीतील भेद समजावून देत आहेत.**

**मूळ शुध्द संकल्पातून निर्माण झालेल्या या सृष्टीमध्यें नाना भेद दिसत असले, भेदातूनच सृष्टीचे व्यवहार चालत असले, तरी खरे पाहता या भेदाचे मूळ अभेदातच आहे. रेषा, अक्षर, शब्द, श्लोक, गद्य, प्रबंध, ग्रंथ, नाना प्रकारच्या भाषा, लिपी, नाना मते, ध्वनी, घोष, चारी वाणी, औट मात्रा आणि अशा केवळ शब्दभेदातून वाढलेला प्रचंड पसारा उदाहरण म्हणून श्रीसमर्थांनी शिष्याला सांगितला. अशी भेदनिर्मित उदाहरणे सृष्टीत उदंड आहेत. ठायीठायी त्यांची अनुभूती येतच असते.**

**पण सर्वदूर व्यापून राहिलेल्या या सर्व भेदांचे मूळ एका मूळ तत्त्वामाध्येच, शुध्द तत्त्वामध्येच आहे. त्या आदिसंकल्पामध्ये कोणताही भेद नाही. या सर्व भेदाचे कारण मूळमाया होय. एक ही माया विचाराने, विवेकाने विलयास गेली तर हा पसारा म्हणजे काहीच उरणार नाही. या मायेचा हा पसारा आणि त्या मायेचा विलय यांचा सूक्ष्म विचार शुध्द परब्रह्माकडे नेतो. हे परब्रह्म निश्चळ आहे. जे जे चंचळ आहे ते ते स्वप्नवत् आहे, नाशिवंत आहे, मिथ्या आहे. निश्चळ व शाश्वत परमात्म्याशी एकरूप होणे हे आत्मनिवेदन होय. त्या शुध्द परब्रह्माखेरीज आपणास काही वेगळेपण नाही, मीपण असे काही कोठे नाहीच, असे विवेकाने अनुमानले, त्याचा साक्षात्कार झाला म्हणजे मन शांत होते, त्याची तगमग थांबते असे श्रीसमर्थ शिष्याला सांगत आहेत.**

**।।श्रीरामसमर्थ।।**

**।। श्रीराम।।**

रेखेचें गुडाळें केलें। मात्रुकाक्षरीं शब्द जाले।
शब्द मेळऊन चाले। श्लोक गद्य प्रबंद।।१।।
वेदशास्त्रें पुराणें। नाना काव्यें निरूपणें।
ग्रंथभेद अनुवादणें। किती ह्मणोनि।।२।।
नाना ऋषी नाना मतें। पाहों जातां असंख्यातें।
भाषा लिपी जेथ तेथें। कायें उणें।।३।।
वर्ग ऋचा श्रुति स्मृति। अधे स्वर्ग स्तबक जाती।
प्रसंग मानें समास पोथी । बहुधा नामे।।४।।
नाना पदें नाना श्लोक। नाना वीर नाना कडक।
नाना साख्या दोहडे अनेक। नामाभिधानें।।५।।
डफगाणें माचिगाणे। दंडिगाणें कथागाणें।
नाना मानें नाना जसनें। नाना खेळ।।६।।
ध्वनि घोष नाद रेखा। चहुं वाचामध्यें देखा।

असे श्रीसमर्थ शिष्याला सांगत आहेत.

**समास नववा**

**।।श्रीराम।।**

वंदीन सद्गुरूचीं पाउलें। मज आपणा ऐसें केलें।
उदारें नाम तें हि दिधलें। रामदास ऐसें।।१
रामदास ऐसें नांव। तरी मज कैचा ठाव।
मीपणाचा अभाव। सहज चि जाला।।२
आतां कर्ता अकर्ता रामदास। इच्छा उद्भवली तयास।
नांव दिधले ग्रन्थास। आपण नांवरूपावेगळा।।३
वों नमो जी रघुनायेका। तुमची स्तुति करितां वाटे शंका।
श्रुति सिणल्या मज रंका। पाड काये तेथें।।४
स्तुति करूं धांवे हर्षे मोठ्या। जैसीं लेंकुरें मांडिती गारगोट्या।
परि देवपण न ये त्यांच्या वाट्या। खेळ खेळती अज्ञानें।।५
कां लेकुरें म्हणती आमुचा घरी। सूर्य सांठवला दारीं।
डोकाऊनियां घटाभीतरीं।म्हणती आहे रे आहे।।६
कां पिसाटपणें सांगे गोठी। धांवोनि घरी आकाश मुठीं।
सदृढ गिवसूनिया कंठी। म्हणे हे गे रे हे गे।।७
तैसा मी हि येक पिसाट। उगी च करितों वटवट।
स्वरूप सांगणें हे खटपट। व्यर्थ चि जाये।।८
जैसे द्रोणागिरीचा पाठारीं। औषधी आणितां रूद्रावतारी।
हात पसरोनिया पाहे तों भीतरीं। कांही च नाही।।९
तैसा आत्मा जपोन सांगणें। सांगतां जाणिवेसी आणी उणें।
बोलणें आणि बुरकावणें। हे तयासी चालेना।।१०
जरी अंधाराचा ढीग पडे। आणि आकाश जाव नेदी आडे।
तरी च स्वसुख सांगणें घडे। ज्ञातेपणें करूनि।।११
तेथें उपमा मात्र चालेना। तर्का भुली पडे उमजेना।
उमजलें तरी सांगवेना। पार तया स्वरूपाचा।।१२
म्हणाल इतुकें मी बोलिलों। तरी माझा अन्याय जाला मी चुकलों।
परि यथार्थ जाणा मुकलों। जाणिवेपासुनी।।१३
मी जें बोलतों कांही। तें माझें प्रमाण नाहीं।
मज सकळ लोकां कोण्ही हि। न मानिजेती ज्ञातृत्वें।।१४
म्हणोनिया मी ब्रह्मपिसा। बडबड करितों भलतैसा।
मज बरें म्हणेल तो हि पिसा। माणुसकी त्यासी नाही।।१५
माझे पोटी होती हाव। जें जाणोनि घ्यावें वस्तूचें नांव।
तव विचारितां शब्दउपाय। खुंटोनि गेला।।१६
म्हणोनि हे मज बोलवेना। न बोलतां सुख वाटेना।
स्वानुभवउद्गार आवरेना। त्यासि मी काय करूं।।१७
मी मी बोलणें हा चि अभिमान। सदा सर्वदा मीपणीं निमग्न।
ते मीपण असतां संलग्न। सर्व हि बाधी।।१८
तव शिष्यें विनविलें। म्हणे स्वामी न वचे हें टाकिलें।
हें ऐकतां मनी संक्रमलें। आशंकेचें बिढार।।१९
टाकावेसें माझिये मनी। परि हें ढळेना जवळुनी।
तरी यासी काये करावें मजलागुनी। सांगिजो जी स्वामी।।२०
ऐक गा शिष्यराया। सावध होईं प्राणसखया।
तुझा सर्व संदेह विलया। दवडूं आतां।।२१
अरे तूं भावार्थाचा मेरू। प्रेमळ शांतीचा सागरू।
यथार्थ सर्वस्वें उदारू। जळधरासारिखा।।२२
तरी मी मागतों तें मज द्यावें। कृपणपणें निष्ठुर न व्हावें।
चित्त देऊनि ऐकावें। मी काये मागतों हें।।२३
मागणें इतुकें चि आतां। श्रवणी बैसों नको दुचीता।
समयो टळोनि गेला तो मागुता। येणार नाहीं। २४
आतां सांगतों येक करी। श्रवण होतां मन हें आवरीं।
वणवण करीत दारोदारीं। हिंडों देवं नको।।२५
श्रवणविषईं आळस नसावा। बहु बोलणियाचा वीट न मानावा।
यावा क्रोधाचा आवरावा। विवेकबळेंकरूनी।।२६
मी जें सांगतों कांही। येथें कुतर्क घेतां बरें नाही।
आव्हाटा विचारूनि पाही। ज्या दुःखदायेका।।२७
म्हणसी कुतर्क काये घेतो। तरी ऐक तें हि सांगतो।
आणिक येक मागतों। शांतीसी अंतरूं नको।।२८
शांति म्हणों नये सुल्लभ। अरे हे ब्रह्मादिकासी दुल्लभ।
शांति सारिखा लाभ। आणीक कांही च नाही।।२९
शांति आड विघ्नें आहेती। ते मी सांगतों तुजप्रती।
शांति केलिया आंगावरी येती। लाहान थोर जन।।३०
तितुकें हि जरि साहिलें। तरी म्हणती मोठे वाया गेले।
बोलतां बोलतां पट जाले। यासि लाज चि नाहीं।।३१
तितुकी हि जरी शांति केली। तरी म्हणती कानकोंडें घोण घाली।
ते समई यत्नें केली। पाहिजे शांति।।३२
आतां कुतर्काचीं लक्षणें। ते तूं जाण आधार घेणें।
सकळ ईश्वर कोणें । मन हें आवरावें।।३३
सकळ इंद्रियें चाळक। तो हा ईश्वर येक।
मी काये बापुडें रंक। मन आवरूं जाणे।।३४
ऐसा ग्रंथाचा आधार घेसी। आणि मना आलें तें चि करिसी।
तरि पुन्हा मागुतें दुःख भोगिसी। मी कांही नेणें।।३५
ईश्वर इंद्रियेसुख देता। आणि तोचि करी परम वेथा।
इतुकें हि करूनि अकर्ता। अलिप्तपणें।।३६
कां ईश्वर चोरी करवितो। आणि मागुता तो चि सुळीं देववितो।
परि जो दुःखें आक्रंदतो। तो ईश्वर म्हणों नये।।३७
तें दुःख प्राणियातें। अगत्य भोगणें लागतें।
मग दुःखे दुखवतें। बापुडे अविवेकी।।३८
ईश्वरें केले सुख। आणि तेणें चि निर्मिले दुःख।
परि दुःख होता शोक। करी तो ईश्वर नव्हे।।३९
तरी साधन कासया करावें। येमपुरीचें सुख म्हणावें।
जाऊनि रवरवीं पचावें। ईश्वर कर्ता म्हणोनि।।४०
आतां असो हें बोलणें। लालुच करूनि आधार घेणें।
तें आपुलें चि मन काय नेणें। परि डोळेझांकी करावी।।४१
ऐसा कुतर्के आधार। तूं घेसील हो साचार।
आळकेपणाचा विचार। करूं नको सर्वथा।।४२
श्रवणविषई सादर असावें। अभिमानत्रिपुटीवेगळें व्हावें।
सत्पुरूषासी शरण जावें। भावार्थबळेंकरूनी।।४३
म्हणसी अभिमानत्रिपुटी कैसी। तरी ऐक आहे सांगतो ऐसी।
सकळ पृथ्वीमध्यें आपणासी । तुळे ऐसा ज्ञाता नाहीं।।४४
मी येक ज्ञाता मोठा। ऐसा अभिमान खोटा।
संतासी पुसेन तरी तोटा। येईल माझिया ज्ञानासी।।४५
मजपासी काय उणें। म्यां आणि दुसऱ्यासी पुसणें।
संतमंडळीत लाजिरवाणें। नव्हें हे मज।।४६
कां हे आमुचे ओळीचे ज्ञान। वरकड सकळ हि अज्ञान।
ऐसें बोलतां सामाधान। सहसा नव्हे तुज।।४७
थोर वोळी ते आमुची। बहुत लांब पाहातां मुळीची।
वरकड हे आखुडें वोळीची। आधांतरी जालीं।।४८
कां आमुचे ओळीचा समुदाव। बहुत आहे आणि वैभव।

तरी तो आतां तुजला। सांगों सावधान होई।।२०।।
परी जें तुज मागितलें। त्याचें उत्तर नाही आलें।
तरी तुज मागतां कैसे वाटलें। ते यथार्थ चि सांग आतां।।२१।।
देववैल कीं देववेना। किंवा लालुची वाटतें मना।
ऐसें यथार्थ चि सांगेना। त्यासी बापाच्याणें।।२२।।
जरी तूं भिडेनें दाटसी। आणि तोंडप्रचीती हो म्हणसी।
तरी उभये अर्थी नाडसी। मग माझें हि कांही चालेना।।२३।।
इतुका आग्रह या चि कारणें। जें तूं वैराग्यें आंगें उणें।
आणि तुज मुक्त करणें। हे प्रतिज्ञा आपुली।।२४।।
येथें श्रोते आशंका घेती। बद्धता चि नाही तेथें कैची मुक्ती।
ऐसें जरी आक्षेपिती। तरी ऐक सांगतों।।२५।।
अज्ञान बापुडे काई त्याची वार्ता हि येथें नाही।
परि जे शब्दज्ञानें विदही। त्यांची देहबुद्धि निंदु।।२६।।
विदेही म्हणिजे देहातीत। तैसे चि ते जीवन्मुक्त।
देहासी युक्त आणि अयुक्त। द्वंदीं सहिष्णता जयासी।।२७।।
आपणासी विदेही म्हणावें। म्हणोनी दांती करूनि सोसावें।
ऐसें नव्हेती ते स्वभावें। गुण त्यांचे।।२८।।
आतां दांती होणार नाही। मां शांती कैसी असेल देही।
ऐसें ऐकोनियां तुवां हि। तैसें चि न व्हावें।।२९।।
शब्दीं देहातीत म्हणावें। आणि अपमान होतां चिणचिणावें।
प्रतिष्ठेकारणें झुरावें। दुराशा धरूनी।।३०।।
जो या देहाचा पांगिला। आणि देहेबुद्धीचा आंखिला।
तो बापुडा च्यवला। समाधानापासुनी।।३१।।
वेद शास्त्र सकळ पाहिले। मन विभवीं मग्न जालें।
शब्दज्ञान पारंगत आलें। करतळामळ।।३२।।
प्रपंच लटिका म्हणावा। आणि हव्यास वाटे देखोनि वैभवा।
म्हणावे हा प्रारब्धठेवा। आम्हांसी सोडीना।।३३।।
नाना कुशळतेचीं वचनें। सांगोनि लुलु प्रतिपादणें।
तयावरी घातलें घालणें। विभवें पुढें।।३४।।
पंडित आणि ब्रह्मज्ञानी। विभव आणि सकळ मानी।
थोर थोर शिष्य जनीं। ते हि वैभवाचे।।३५।।
ऐसें वैभवें भुलले। आणि आधार घेव लागले।
तयांप्रती कांही न चले। ब्रह्मादिकांचें हि।।३६।।
जैसा मैंदांचा मेळा। बाह्य ब्रह्मवर्चस्वाची कळा।
अंतरी परहिंसेचा जिव्हाळा। उदरभरालांगी।।३७।।
परी आपुलें नेणती च अध:पतन। देहलोभें नागविलें पूर्ण।
दुष्कर कर्म अति कठिण। त्याचें त्यासी च न कळे।।३८।।
ब्रह्मादिकांचें न चले जेथें। सज्जनी काये करावें तेथे।
आपआपणा जाले हंते । त्यांसी कोणे पां निवारावें।।३९।।
काव्य कुशळतेचें केलें। आणि मन वैभवी गुंतलें।
तयासी प्रतक्ष चाळविलें। ज्ञान देऊनि ईश्वरें।।४०।।
जंवरी विषयासक्त मन। तंवरी रामीं अनुसंधान।
न घडे सर्वथा जाण। म्हणोनि ईश्वरें वेचिलें।।४१।।
जैसें षडरस अन्न पचविलें। आणि क्षुधिस्तासी जेऊं घातलें।
आपण शब्दी च भोजन केलें। तेणें काये तृप्ति घडे।।४२।।
काय पंडितें आंधार पाडिला। आणि शब्दीं दीपामागें दीप आणिला।
परी किंचित तऱ्ही जाला। उजेड तेणें।।४३।।
तैसे शब्दज्ञाते लटिके चि धाले। परी मूर्ख नेणती च चुकले।
आधार घेव लागले। म्हणोनियां।।४४।।
आधार घेतां बरें वाटे। परी अंती दु:खें प्राण फुटे।
धोका येऊनि आदटे। क्रिया केली तयेचा।।४५।।
मग तो धोका आवरेना। परता केला तऱ्ही होयेना।
तेव्हां कांही च चालेना। प्राणी भांबावों लागे।।४६।।
ते काळी प्रस्तावा घडे। आपुलें च मन फिरोनि पडे।
समाधान समूळ उडे। नव्हतें चि जैसें।।४७।।
या कारणें माहानुभावी। पूर्वी च लालूची न करावी।
विवेकबळें तोडावी। आधारबेडी।।४८।।
श्रोतीं सावध ऐकावें। मजला अभिमानी म्हणावें।
परी आपुले करूनि घ्यावें। समाधान तुम्ही।।४९।।
राज्यपदवी टाकिली। आणि भिकेची लालुची केली।
तेणें राज्यपदवी गेली। झोळी धरितां चि करीं।।५०।।
जणें राज्य सोडूनि झोळी घ्यावी। तेणें घरोघरीं फेरी करावी।
तैसें स्वसुख सांडूनि धरावी। लालुची विषयांची।।५१।।
तैसा शब्द प्रवृत्तीचा। राजे म्हणती सकळ वाचा।
विचार पाहातां तों तयाचा। तो भिक्षेसी च समंधु।।५२।।
का कुबेर नांव ठेविलें। बापुडें मोळ्या वाहात चि मेलें।
विचारितां तें नागवलें। व्यर्थ चि नाही।।५३।।
का लक्ष्मीच्या नांवाचा सोहोळा। मायेबापासी लोभाचा कळवळा।
भीक मागती वेळोवेळा। ते अवकळा नव्हे।।५४।।
तैसें विदेही म्हणावें। आणि वैभवाकारणें हळहळावें।
राजहंसें शेण खावें। हे विटंबणा नव्हे।।५५।।
अमर म्हणवी त्यासी मरणें। सकळकळा वोंनामा नेणें।
बत्तीस लक्षणें लाजिरवाणें। नाकेंविण नव्हे।।५६।।
आचार्या नावे जयासी। आच्मन करितां न ये त्यासी।
सुंदर म्हणवी तयेसी। असे कपाळी कुष्टता।।५७।।
ईश्वर अभिधानाचें गौरव। ज्ञान विचारितां शून्य स्वमेव।
तैसा विदेही म्हणवी त्यासी हांव दृढ देहेबुद्धीची।।५८।।
व्याघ्र नामाचा आळ आला। आणि तो पीपलीकेनें भक्षिला।
तैसा विदेही म्हणवी तयाला। देहेबुद्धीनें मारिलें।।५९।।
तैसे मुक्ती आणि बध । हें बोलणें चि अबध।
परि जे कोणी स्वयेंसिध। तयांसी च साजे।।६०।।
साजे परी बोलों नेणती। बोलणेयाची कोण्ही येक वित्पत्ति।
आरे नाहीं म्हणावें कींचिती। समजों नये।।६१।।
आतां असो हें बोलणें। आहे आशंका सांगणें।
यदर्थी तुवां चित्त देणें। शिष्यराया।।६२।।
इति श्री रामदास म्हणे। पुढें सारि होऊनि परिसणें।
अर्थ जीवीं घेतलियां होणें। संदेहावेगळे।।६३।।

***

**।।श्रीरासमर्थ।।**

**समास अकरावा**

**।।श्रीगणेशाय नम:।।**

**श्रीसमर्थांना शिष्यांच्या उध्दाराची तळमळ असल्यामुळे मातेप्रमाणे अत्यंत मृदु शब्दांनी त्यांनी शिष्यांना समजावून सांगितले आहे. समजावून सांगण्याच्या पलिकडेहि काही शिष्यांचे अवगुण दृष्टोप्सत्तीस आले म्हणजे ते अत्यंत कठोरपणेही सांगत असत. पण त्या कठोरपणातही शिष्यांचा कळवळा दडलेला असे. शिष्य हा सच्छिष्यत्वाला प्राप्त झाला पाहिजे हीच त्यांची तळमळ असे. प्रसंगानुरूप काही गोड, काही कठोर बोलल्याशिवाय शिष्य अंतर्मुख होत नाहीत. आणि अंतर्मुख झाल्याखेरीज स्वत:चे गुणदोष उमगत**

पुढें याहिहुनी होईल जालें । नाही च अद्यापि ।।३४ ।।
इतुके सांगणे या चि कामा । जें तुवां उलंघावी आधारसीमा ।
आणि आपुलिया निजधामा । मार्गस्त व्हावें ।।३५ ।।
आहे विष आणि अमृत । आहे सीतळ आणि संतप्त ।
आहे मोक्ष आणि बंधत्व । अज्ञान जें ।।३६ ।।
आहे मूर्खत्व आणि विवेक । आहे स्वर्ग आणि नर्क ।
राज्यपदवी आणि रंक । उंच नीच जें ।।३७ ।।
आहे पाषाण आणि पेटे । आहेती मनुष्यें आणि रानटें ।
स्वापदें जे अति उद्धटें । जे भक्षिती तात्काळ ।।३८ ।।
आहे वाट आणि अव्हाट । आहे वैराग्य आणि विषयचट ।
आहे समाधान आणि खटपट । पाषांडमत जें ।।३९ ।।
आहे महा तीव्र ज्वाळ । आहे चंदन सुसीतळ ।
आहे पवित्र आणि अमंगळ । अनाचार जो ।।४० ।।
आहेती सुपती आणि सरांटे । आहेती रंभाफळें आणि गोटे ।
आहे वस्त्र आणि शस्त्र तुटे । आंग जेणें ।।४१ ।।
असो ऐसें उदंड आहे । येक साहे येक न साहे ।
हे तूं विचारूनि पाहे । शिष्यराया ।।४२ ।।
क्षीरनीरा निवाडा करी । राजहंस जीवन अव्हेरी ।
चुंचुवा दुग्धाची भरी । चातुर्यनिधी जो ।।४३ ।।
कां परीक्षवते परीक्षावे । खरें घेऊनी खोटे टाकावें ।
कां कवटे त्यजुनी खावे । नारीकेळ जैसे ।।४४ ।।
का युक्षदंड भक्षावा । रस तितुका शोषूनि घ्यावा ।
वाकस टाकुनी द्यावा । अप्रयोजनीक जो ।।४५ ।।
कांबाहाडहाती सीध होतें । तयाची त्वचा काहाडितां भातें ।
लोभे कां तया पावकाते । सेऊं नये जैसे ।।४६ ।।
पावकेंवीण कार्य चालेना । मग्न होतां देहे वांचेना ।
पतंगासी जैशा यातना । दीपसंघटणी होती ।।४७ ।।
ऐसें हें किती सांगावें । परी घेवं ये तें चि घ्यावें ।
हे काये आपुलिया जीवें । जाणिजेत नाही ।।४८ ।।
येथें मोठा आधार  तो प्रारब्धाचा । हा चि थारा प्राणीमात्राचा ।
धरूनियां प्रेत्नाचा । आळस चि केला ।।४९ ।।
प्रपंची प्रेत्न करावा । आणि परमार्थी आधार घ्यावा ।
तरमुंडपणें चि प्रेत्न न करावा । हें काये बरें ।।५० ।।
प्रारब्धयोगें उत्तम भोग । प्रारब्धें चिं जडला रोग ।
परी रोग जडलिया औषधप्रयोग । करणें  लगें ।।५१ ।।
वेथेसी देखोनि कुसमुस वाटे । प्रयेत्ना कारणें प्राण फुटे ।
तेव्हां जरी प्रेत्न करणें सुटे । तरी च आधार घ्यावा ।।५२ ।।
कां परचक्र आले गाढें । सकळ राहाळेचें जालें गुढें ।
तेव्हां लगबगेनें त्याहीपुढें । कां पां जावें ।।५३ ।।
कां गृहासी आगी लागली । देखोनी कां बोंब केली ।
लोकांची मांदी मेळविली । आगी विझवावया कारणें ।।५४ ।।
तैसी परमार्थी हि बोंब मारावी । कांही तऱ्ही काढाकाढी करावी ।
हळुंहळुं सोडवावी । मिठी प्रपंचाची ।।५५ ।।
प्रपंच धडका पेटला । मध्यें परमार्थ जळों लागला ।
ऐसें देखोनियां तुम्हांला । कैसें बरें वाटतें ।।५६ ।।
मुक्ताफळें आणि दिव्यांबरें । नाना वस्तूंची भांडरें ।
भस्म करूनियां वैश्वानरें । विझोनि जाईजे जेवीं ।।५७ ।।
तैसा प्रपंच हा परमार्थासी । जाळोनि भोगूं नेदी आपणांसी ।
आयुष्य गेलियां प्राणियांसी । विन्मुख होये ।।५८ ।।
जरी   प्रपंच शाश्वत जाणतों । तरी तुम्ही आम्ही यासी च धरितों ।
हा अशाश्वत म्हणोनि रडतो । तुम्हा भोंवता ।।५९ ।।
तुम्ही कैसे रे परमार्थी । परघातकी आणि आपस्वार्थी ।
डोळे झांकूनि दोही अर्थी । नागवलेती कीं रे ।।६० ।।
परमार्थाचा आळ आला । आणि प्रपंच गळां पडिला ।
बोसपडा कोठें जाला । जनक विदेही ।।६१ ।।
क्रिया असो भलतैसी । आड करिता तयासी ।
क्रिया नसतां मानसी  । कांही शंका धरा ।।६२ ।।
विदेहाचा आधार घ्यावा । आणि देहे आपुला मानावा ।
स्तुति बरी वाटे जीवा । देहाची होतां ।।६३ ।।
स्तुति होतां आनंदले । तो निंदा होतां रडेल ।
या दोहीमध्यें न संपडेल । तो चि धन्य जगीं ।।६४ ।।
प्रपंच अवघा करावा । परी क्रोध तऱ्ही आवरावा ।
क्रोधाचा नावरे यावा । तरी मी काये सांगों ।।६५ ।।
माझ्या देहासी मान व्हावा । मज अवधी च नमस्कार करावा ।
नमस्कार न करितां यावा । क्रोधाचा आवरेना ।।६६ ।।
कासया सांगता परमार्थगोठी । व्यर्थ चि करिता कपाळकुटी ।
इंद्रावना सारिखें पोटी । काळकूट भरलें ।।६७ ।।
पूर्वी संतसमुदाये होता । त्याची क्रिया हि ऐकता ।
परी कांही तऱ्हीं वर्तता । तया सारिखे तुम्ही ।।६८ ।।
अरे बा परमार्थी आणि घालमेली । बरें वाटे जरी स्तुति केली ।
निंदा करितां हाणी आली । आपुलिये महंतीसी ।।६९ ।।
येरयेरांची स्तुति करावी । आणि बळे चि आंगावरी वोढूनि घ्यावी ।
जैसी विष्ठेसी लावावी । उटी चंदनाची ।।७० ।।
देहाची स्तुति खरी कीं । तरी तुम्ही देहेधारक प्राणी व्हा की ।
लटिके चि परमार्थी लोकिकीं । महत्वाकारणें ।।७१ ।।
जरी देहो हा निंदिला । तरी काये परमार्थ बुडाला ।
जवळुनि विवेकाला । देशधडी केलें ।।७२ ।।
तुम्ही शिष्य न व्हा रे परमार्थ बुडवणें । झुरता प्रतिष्ठेकारणें ।
शेवटी प्रतिष्ठा टाकूनि जाणें । न घडे नेणों तुम्हांसी ।।७३ ।।
आतां कांही सार्थक करावें । देहेबुद्धीपासूनि सुटावें ।
देहेबुद्धि न जातां व्हावें । परमार्थी कानकोंडे ।।७४ ।।
कठिण ऐकतां चिणचिणिला । तयावरी लंगडा जुलुम जाला ।
काये करूं मी तयाला । कांही च न चले ।।७५ ।।
बोलणें कठिण ऐकिलें । किंचित वाईट लागलें ।
मुखश्रीचें चिन्ह पालटलें । ते देहेबुद्धि नव्हे ।।७६ ।।
बोलत असिलों अदखणेंपणें । तरी हे आत्माराम जाणे ।
मानवी उत्तरें कठिणें । तितुकीं च जाणती ।।७७ ।।
हित सांगतां दुख वाटे । तयाचें जाणावें प्रारब्ध खोटे ।
कांही केल्यां न तुटें । देहेबुद्धिवेडी ।।७८ ।।
तूं तरी चौदेहावेगळा । तरी कां रे स्थूळाचा कळवळा ।
धांवोनि येतो वेळोवेळां । मैंद मांउसी सारिखा ।।७९ ।।
मागें पदार्थ जाला तो बरा । परी आतां तऱ्हीं विचार धरा ।
येदर्थी तडवला तो चि खरा । रामी रामदास ।।८० ।।
डगमगिले तेही उठोनि जावें । उरलें तेही सावध ऐकावें ।
आतां येथूनि लुटावें । मोक्षाचें भांडार ।।८१ ।।
इति श्री रामदास आतां । सांगेल आशंका श्रोतां ।
येकचित्त होऊनि ऐकतां । सुखदुखावेगळें व्हावें ।।८२ ।।

***

**।।श्रीरामसमर्थ ।।**

आपुलें नव्हे आणि लालुची केली। तरी पारब्धे नव्हती पालटिलीं।
ऐसें हि जाणोनि स्थूळाशा धरिली। ते पढतमूर्ख जाणावें ।।२७।।
स्थूळाचे पांगिले नसावें। होईल तैसें कौतुक पाहावें।
आपण निंदेसी हि न प्रवर्तावें। आदरें करूनी ।।२८।।
अरे शिष्या परमार्थ बुडाला। परमार्थवेशें प्रपंच जाला।
स्थूळ देहो निंदितां बहुताला। विषाद येतो ।।२९।।
विषाद अभिमानाचें मूळ। विषाद अविवेकाचें स्थळ।
विषाद येतो तें चि केवळ। अज्ञान जाणावें ।।३०।।
विषाद आला रावणाला। म्हणोनी सहपरिवारें निमाला।
विषादें तया कौरवाला। वेढा लाउनीं मारिले ।।३१।।
विषाद प्राणी आवरू नेणती। विपादें चि देशधडी होती।
विषादें जीवें चि मारिजेती। परस्परें जिवलग ।।३२।।
विषाद परमार्थबुडवणा। विषाद अडताळा निरूपणा।
विषादें संवादीच्या खुणा। हिरोनि नेल्या ।।३३।।
शिष्या देहे हे लटिकें वाटतें। परी हे बहु रे वेढां लावितें।
आणि अंती नासोनि जाते। रांडेचें अमंगळ ।।३४।।
तूं जरी विवेकी होसी। तरी देहेपांगीहूनि सुटसी।
जरी विवेक दुऱ्हाविसी। तरी नाटोपे देहेपांग ।।३५।।
जैसें अंकुशेंवीण दंती। कां प्रधानेवीण भूपती।
तैसी विवेकेवीण शांती। होणार नाही ।।३६।।
ज्याचा क्रोध अति लाडिका। तेथें उरी नाहीं विवेका।
जैसें बकवायेसाउलुका-। मध्यें हंस येकट ।।३७।।
तैसे काम क्रोध मद मत्सर। अभिमान आणि तिरस्कार।
ऐसी अमंगळ मिळतां अपार। विवेकस्थान भ्रष्ट होये ।।३८।।
जेणें हा देहो निंदावा। तो आपुला आप्त जाणावा।
तो निंदक म्हणावा। अविवेकबळें करूनी ।।३९।।
आम्ही देहासी निंदितो। आणि आम्हांसि जो साह्ये होतो।
आपणांसी जो उपेगा येतो। तो आपुला परम सखा नव्हे ।।४०।।
विवेकें सांगतां तुज मानलें। परी तैसें चि पाहिजे वर्तलें।
आपुलिया गुणदोषा जाणितलें। पाहिजे तुवां ।।४१।।
गुण देखोनी अंगीकारावें। अवगुण देखोनी आपुले त्यजावे।
अध्यात्मग्रंथ श्रवण करावे। आदरें करूनी ।।४२।।
ग्रंथ ऐकतां ऐकतां। निश्चयो पाविजे तत्वता।
हे हि येक साधन आतां। सांगतों तुजलागीं ।।४३।।
श्रवणीं बैसतां दिवसेंदिवस। परमार्थी उपजे हव्यास।
परी श्रवणमननी निजध्यास। केला तरी हो ।।४४।।
देखोवेखी नित्य कर्म। करूनि निरूपण चुकसी वर्म।
प्रतिदिनी आमुचा नेम । जें निरूपण करावें ।।४५।।
तें कर्म जाण दुणावलें। ईश्वरें वोझें घातलें।
कां ते शब्दज्ञान आलें। वाचाळपण करावया ।।४६।।
श्रवण केलिया क्रिया पालटे। दिवसेंदिवस देहेबुद्धि सुटे।
तरीच हा भवमळ तुटे। अनंत जन्मांतरीचा ।।४७।।
भक्ति वैराग्य आणि ज्ञान। तें चि ग्रंथी समाधान।
श्रृंघारिक ऐकतां चि मन। घालूं नको सर्वथा ।।४८।।
श्रृघारिक ऐकतां कांही। समाधान होणार नाही।
हें तूं विचारूनि पाही। खरें की खोटें ।।४९।।
श्रृंघारिक श्रवण करावें। तेथें साधकें काये घ्यावें।
सीधे समाधानापासूनि च्यवावे। रसवृत्ति लोधलिया ।।५०।।
जन्ममृत्यूची यातना। परम दुःख भोगवेना।
म्हणोनी शरण रिघावें सज्जना। सार्थक करावया ।।५१।।
तेथें हि श्रृंघारिकाचे आर्त पोटी। कां वादविषई कपाळकुटी।
जैसी दिव्यांवरासी वोरांटी। वरवडूनि गोवी ।।५२।।
तैसा परमार्थ पोटासी आला। उपाये तो चि अपाये जाला।
तैसें तया साधकाला। रसवृत्तीनें केलें ।।५३।।
आतां तुझा प्रश्न जें क्षुद्रें दिसती। तरी क्षुद्रें आभासीं झोंबोनि पडती।
आभास निराभास दोहींचा अंती। क्षुद्रासी ठाव चि नाहीं ।।५४।।
क्षुद्रें ऐकतां दुश्चीत मन। तेथें कैचें समाधान।
प्रतिष्ठा वैभव आणि मान। तेथें चि वृत्ति गुंतली ।।५५।।
सकळ सृष्टीची सोसणीं। कासया करावी बैसोनी।
परी हे इतुकें तुज लागुनी। बोलणें घडलें ।।५६।।
इति श्री रामी रामदास। हाका मारितो उदास।
विवेकी असती तेही त्रास। सहसा मानूं नये ।।५७।।

***

**।।श्रीरामसमर्थ।।**

**समास तेरावा**

**।।श्रीगणेशाय नमः।।**

**या जगातील सर्वच जीव स्वतःला मी, मी म्हणून संबोधित असतात. पण तो 'मी' म्हणजे कोण आहे? त्याचे मूळ शोधल्याशिवाय कोणालाही समाधान मिळणार नाही, असे श्रीसमर्थ सांगत आहेत. सर्व विश्वाच्या उत्पत्तीपूर्वीही हे जे 'मी' आहे ते होते व हेच 'मी' सर्व विश्वामध्यें व्यापून राहिले आहे. त्यामुळे ह्या विश्वाचे मूळच हे 'मी' आहे. विश्वाच्या आदिअंती असणारे हे 'मी' पण उत्पन्न झालेल्यातही आहे. 'मी' हा परमात्म्याचा मूळ संकल्प होय. परमात्मा ज्ञानस्वरूप असल्यामुळे त्याचा संकल्प ज्ञानरूप आहे म्हणून हे 'मी' ज्ञानरूपच आहे.**

**पुढे प्रकृती निर्माण झाल्यावर, त्या प्रकृतिमध्येही हे 'मी' व्यापून असल्यामुळे; प्रकृतीने जे जे निर्माण केले त्यामध्येही 'मी' व्यापून आहे. प्रकृती जड म्हणजे स्थूळ आहे. म्हणजे तिला जाणीव नाही. जाणीव आणि प्रकृती मिळूनच हे स्थूळ निर्माण होते. ही जाणीव हळुहळू स्थुळापर्यंत म्हणजे देहाकारापर्यंत पोहचल्यानंतर त्या मूळ 'मी' चा म्हणजे जाणीवेचा विसर, या प्रकृतीच्या सहाय्याने पडला. त्यामुळे ह्या स्थुळालाच 'मी' म्हणून हा जी मानू लागला. खऱ्या 'मीपणाचा विसर पडून या 'मी' पणाचा आरोप स्थुळावर झाला व हे स्थूळ म्हणजे हा देहच- 'मी' मानू लागला. स्थूळालाच मी म्हणून मानल्यामुळें जीव पुनः पुन्हा जन्ममरणाच्याफेऱ्यात सापडला. पण हे स्थूळ नाशिवंत असल्यामुळें या सर्व नाशिवंत विश्वाला जाणणारे हे 'मी' पण विश्वाच्या आदिअंती अखंडरूपाने भरलेलेच आहे. जोपर्यंत या 'मी' पणाचे मूळ शोधले नाही तोपर्यंत जन्ममरणाची परंपरा सुटणार नाही. ज्या ज्ञानाने हे जाणता येते किंवा ज्ञानाने जे जाणले जाते ते ज्ञानाहून वेगेळेच असते. ते स्थूळ होय. ज्याच्या योगाने जाणले ते ज्ञान होय. हे ज्ञान म्हणजे खरा 'मी' पणा होय. हा भगवंताचा मूळ संकल्प. तो ज्ञानस्वरूप असल्यामुळे त्यामुळं 'मी' पणाचे लक्ष्य परमात्माच असतो. म्हणून 'मी कोण' असे विचारल्याबरोबर त्याचे लक्ष्य परमात्माच होते. पण हा 'मी' पणा स्थूळामध्ये विकारी झाल्यामुळे त्या 'मी' पणाचे लक्ष्य देह म्हणूनच राहिले आणि ही दुःखपरंपरा सुरू झाली. शुध्द 'मी' पण हे तुझ्यातही आहे आणि माझ्यातही आहे. हे 'मी' म्हणजे तूच व 'तू' म्हणजे 'मी' च असे हे दोन्ही एकरूप होते तेथे**

हे कुबुधी तुज कां आठवली । टाकीं परती ।।४३ ।।
तुज आठवलें तैसें बोलावें । तुवा संकोचीत न व्हावें ।
जरी येथें हि बोलतां भ्यावें । तरी समाधान कैचें पावसी ।।४४ ।।
आतां असो हें बोलणें जालें । मीपण पाहिजे उडविलें ।
या मीपणासी च येकलें । ठेउनी कोण काज ।।४५ ।।
उडविलें बुडविलें या तों वित्पत्ती । परी निरसली पाहिजे तुझी भ्रांती ।
यालागी बोलतों चीतीं । सावध होई ।।४६ ।।
तुंवा जाणसी त्या वेगळे असिजे । ऐसें बोलिलें आम्ही सहजें ।
परी हें चि तुज पाहिजे । परिच्छिन्न कळलें ।।४७ ।।
च्याऱ्ही देहे च्यारी वाचा । पंचभूतें त्रिगुणांचा ।
इंद्रियेचाळक तया मनाचा । जाणता तूं होसी कीं ।।४८ ।।
च्याऱ्ही अवस्ता पांचवी उन्मनी । वृत्ती निवृत्ती यालागुनी ।
यासी हि जाणसोसी की झणी । लटिकें बोलसी ।।४९ ।।
आतां बरें मन घालुनी पाहीं । मीपणासी हि जाणतोसी कीं नाही ।
जांटिल्यासी हि जांणतोसी राहीं । उगा चि आतां ।।५० ।।
जांटिल्यासी हि जांणितलें । ऐसें जरी तुज कळलें ।
तरी कळल्यावेगळें राहिलें । तें चि स्वरूप तुझें ।।५१ ।।
आतां सांग रे अनुभव कैसा । स्वामी नाही सांगिजे ऐसा ।
ऐसें बोलतोसी कैसा । फट पढतमूर्खा ।।५२ ।।
नाही सांगिजेसा हें तुज कळलें । तरी मी बोलिलों हे व्यर्थ चि गेलें ।
अरे वेड्या तुज जें अनुभवां आलें । त्या हि वेगळा तो तूं ।।५३ ।।
आतां सांग पाहों बा रें । उगा चि राहिलासी कां रे ।
मान हालवितो घ्या रे । जीवें चि यासी ।।५४ ।।
जीवीत्व अवघें लोपलें । पाहा हो कैसें जालें ।
नाम घ्याव्यासी उरलें । नाही कोण्हीं ।।५५ ।।
अरे शिष्या सावध होई । तुज आणीख सांगतों कांही ।
मीपण पाहातां नाही । भेव नको ।।५६ ।।
इति श्री रामदास म्हणे । ऐका वंध्यापुत्राचें बोलणें ।
चक्षुश्रवा असेल तेणें । सावध व्हावें ।।५७ ।।

***

**।।श्रीरामसमर्थ ।।**

**समास चवदावा**

**।।श्री गणेशाय नम: ।।**

**मागील समासामध्ये श्रीसमर्थांनी मीपणाविरहीत असणाऱ्या स्वरूपाच्या ठिकाणीं शिष्याची वृत्ती स्थिर केली. ती स्वरूपस्थिती काही काळ अनुभवल्यानंतर देहप्रारब्धावशात् पुन्हा मीपणाचे भान होऊ लागले. वृत्ती पुन्हा भांबावून जाऊ लागली. स्वरूपाकार स्थितीच नेहमी असावी असे वाटले तरी पुन्हा वृत्तीवर यावे लागते. हा मायेचा प्रभावच आहे.**

**श्रीसमर्थांनी मायेच्या विस्ताराचे वर्णन वंध्यापुत्र या शब्दाने केले आहे. वंध्येला कधी पुत्रच होत नाही तर त्याचे बारसे, सर्व सोहळा, कुठून असणार? म्हणून हे सर्व मिथ्याच आहे. मिथ्या म्हणावे तर सर्व जगाला या मायेने चक्रावून सोडले आहे. शिष्या, हे जे सर्व दिसते आहे, तो या मायेचाच पसारा आहे. नाम, रूप, आकार हा सर्व मायेचाच विस्तार आहे. हा सर्व मायेचाच नामरूपात्मक पसारा असल्यामुळे मायेखेरीज त्यात दुसरे काहीही नाही. नसून आहे असे भासविणारे, तिलाच माया असे म्हणतात. म्हणजे अनेकविधतेने ती भासमान होत असते पर ती असते एकच! असते सर्व प्रकृतीच पण ती पुरूषाच्या सानीध्यानेच नाना रूपे दाखवत असते. ती एकटीच आहे. नाना रूपे दाखविते पण सर्वही मिळून पुन्हा एक मायाच आहे. दोघाविरहीत तिसरे काहीही होऊ शकत नाही. म्हणून प्रकृती आणि पुरूष याविरहीत तिसरे काहीहि निर्माण होणार नाही. जे दिसते, ते सर्वही एक मायाच असे म्हटल्यानंतर तीच प्रकृती होय. पुरूष हा शब्दसुध्दा प्रकृतिमुळेच झाला. म्हणून हा प्रकृतिचा पुत्रच होय, असे म्हणावे लागते. प्रकृतिने निर्माण केलेले कन्या आणि पुत्र म्हटले तरी मायेवेगळे त्यांना अस्तित्व नाही म्हणून सर्वही मिळून, पुन्हा एक मायाच आहे. ज्याप्रमाणे पृथ्वी ही एकच असताना मेरूमांदार, गडकोट, पुरेपट्टणे. हे नाना प्रकार व आकार दिसत असले तरी ते सर्वही मिळून एक पृथ्वीच आहे. या पृथ्वीविरहित त्यात दुसरे काय आहे? अग्नीच्या अनेकविध ठिणग्या, नाना तऱ्हेचे दिवे निर्माण झाले तरी सर्वही मिळून एक अग्नीच आहे. त्याचप्रमाणे हे सर्वही नामरूपात्मक एक मायाच आहे.**

**ही सर्व एक मायाच असली तरी हे सर्व नामरूपात्मक एकटीने कसे निर्माण केले? पुरूषच नाही तर निर्मिती कशी होणार? अशी शंका शिष्याच्या मनात उद्भवली. शिष्याच्या मनात संदेह निर्माण झाला. आता या संदेहाचे निवारण श्रीसमर्थ करीत आहेत. हे शिष्या, हे सर्व कन्या आणि पुत्र म्हणजेच वंध्यापुत्राचा विस्तार म्हणावा लागतो. जर पुत्रच नाही तर कन्या कुठल्या? कन्यापुत्रच नाहीत तर विस्तार कुठला? आणि विस्तारच नाही तर माया तरी कुठली?**

**ही माया मुळातच गोंधळात टाकणारी आहे. पण, तूं गोंधळून जाऊ नकोस. तू या सगळ्या गोंधळाविरहीत आहेस. एकाग्र चित्ताने मी जे सांगतो ते, ऐक. म्हणजे तुझी शंका निरसन होईल.**

**अरे, मायेचा हा भास म्हणजेच तुझी कल्पना होय. आणि ही कल्पना देहबुध्दी असल्यामुळेच निर्माण होते. देहबुध्दीवर आलास की चित्त डळमळते व नाना कल्पना निर्माण होतात. म्हणून देहबुध्दी दूर ठेऊन हे सर्व तू ऐक, म्हणजे तुला नीट कळेल. आधी 'देह मी' म्हणजेच देहबुध्दी टाकल्याविना म्हणजेच नाहीशी केल्याविना देहातील परमात्म्याचे तुला दर्शन होणार नाही. तुला वाटते, ही माया सर्व नाहीशी व्हावी आणि श्रीरामाचे दर्शन व्हावे. तरीसुध्दां हे 'वाटणे' ही देहबुध्दीच आहे. तो श्रीराम त्याच्याही पलिकडेच आहे.**

**विवेकाने या स्थूळाचा निरास झाला म्हणजे आपोआपच सर्व ब्रह्मांडाचाही निरास होतो. हे सर्व नाशिवंत आहे आणि परमात्मा त्यावेगळा, अविनाशी आहे. तुझे मन नाशिवंतामध्येच म्हणजे या देहबुध्दीमध्येच अडकून पडले तर, तुला देहातीत असणाऱ्या परमात्म्याची ओळख कशी होणार? हा सर्वही मायेचाच अभास आहे आणि परमात्मा भासातीत आहे. म्हणून सर्व भास, सर्व कल्पना मिथ्याच आहेत. सर्वही माया मिथ्या म्हणावी आणि आपली कल्पनाच जतन करावी – ते कसे चालेल? ही तुझी कल्पना म्हणजेच जर माया तर ती अगोदर नाहीशी कर. मगच तू त्या भगवंताकडे जाण्यास अधिकारी होशील. तू चारी देहावेगळा असल्यामुळे तुला या मायेचा स्पर्श तरी कसा होईल? म्हणून तुला स्वहित करावयाचेच असेल तर तू या कल्पनेपासून मुक्त हो. सर्व कल्पना, भय हे सर्व स्थुळातच होते. हे चारी देह या स्थुळामध्येच मोडतात. आणि या सर्वांच्या अतीत असा तू असल्यानें या स्थुळाचा या मायेचा–तुझ्याशी कोणताच संबंध नाही.**

**अरे, तू तर माझेच रूप आहेस. ही माया तुला काय**

कां कुल्लाळें साळेसी पात्रें केली। नाना व्यक्ती निर्माण जाली।
भिन्नभिन्नें नामें हि ठेविली। निर्माण जालिया नंतरें।।२६।।
ऐसी विस्तारें वाढली। पाहों जातां धरा येकली।
तैसी माया हि विस्तारली। परी विचारितां आपण चि असे।।२७।।
कां जैसा अग्नी प्रसवला। आपणासी आपण जाला।
पाहों जातां येकला। येकट चि असे ।।२८।।
फुंकुनी दीप लाविला। पुत्रपणे हिलाल जाला।
हवाया चंद्रज्योति पावल्या। कन्यारूप नामें।।२९।।
ऐसिया नाना व्यक्ती । परी येक अग्नी आदिअंती ।
कां बावंन मातृकां प्रती । आकार सोडीना ।।३०।।
ऐसी सर्व ही बोलतां माया । स्तब्धता जाली शिष्यराया ।
म्हणे न पुसतां चित्ता माझ्या । समाधान न घडे ।।३१।।
विचार करितां माया सर्व । परी पुरुषाचा दिसतो अभाव ।
तेणें माझा अंतर्भाव । डगमगिला कीं स्वामी ।।३२।।
अरे शिष्या माया कैची । हे कन्या वंध्यापुत्राची ।
पुत्र चि नाहीं मा त्या कन्येची । वार्ता कोठें ।।३३।।
अरे ऐक घाविरा कां जालासी । अंतरूं नको विवेकासी ।
उतावळी करूं नको आम्हासी । बोलों दे क्षणभरी ।।३४।।
जरी आम्ही तुझे जीवीचें । जाणोनि सांगितलें अंतरींचे ।
तरी मग तुझ्या बोलाव्याचें । कोण काज आहे ।।३५।।
किंचित धीरत्व धरावें । तुंवा सादर होऊनी ऐकावें ।
तुझी आशंका स्वभावें । निरसोनि जाईल ।।३६।।
माया माईक आभासे । तुझिये कल्पनेसी च दिसे ।
देहीं देहबुद्धी वसे । म्हणोनियां ।।३७।।
तुज जें कांहीं सांगितलें । तें तुज इतुकें च कळलें ।
क्षणामध्यें डगमगिलें । चीत तुझें ।।३८।।
अरे आधीं आपणासी जाळावें । मग रघुनाथीं मिळावें ।
आपणासी राखतां जीवें । राम कैचा जोडे ।।३९।।
तुझी वासना जे माया उठोनि जावी । म्यां आपुल्या डोळां पाहावी ।
तरी तुझी देहेबुद्धी माया दवडावी । नलगे रे तुज ।।४०।।
येके या स्थूळासी निंदिलें । तें अवघीया विश्वावरी आलें ।
आणि त्याचें काय राहिलें । निराळें अनसुट चि ।।४१।।
तैसी तां माया निंदावी । आणि कल्पना जतन करावी ।
गुप्त करूनि लपवावी । आपुली म्हणोनि काये ।।४२।।
तुझी कल्पना हे चि माया । ते आधीं धाडी विलया ।
मग हें स्वसुख पाववया । अधिकारी होसी ।।४३।।
तूं तरी चौ देहां परतां । तरी कां भोवसी स्थूळाभोवता ।
तुझें तुज स्वरुप पावतां । माया कैंची रे तेथें ।।४४।।
जरी तुज स्वहित करणें आहे । तरी तूं कल्पनातीत होऊनी राहे ।
कल्पना हे सर्वथा न साहे । तुझा स्वरुपीं ।।४५।।
अंध आणि डोळस कोण्ही येक । मार्गे जातां भयानक ।
तें देखोनिया साशंक । डोळस सळोनी पडे ।।४६।।
अंधासीं तें ठाऊकें चि नाहीं । त्यासी भयानक न दिसे कांहीं ।
तयासी देहे असतां चि कांहीं । बाधूं न शके सर्वथा ।।४७।।
तैसे संकल्प विकल्प तुझे डोळे । क्षण येक ठेवी पां निराळे ।
मग हे कैसी आडळे । भयान्नक माया ।।४८।।
मोठे भय या स्थूळासी । तरी तूं काये स्थूळ होसी ।
क्षणक्षणा भ्रांत होतोसी । अविवेकसंगती ।।४९।।
तुज कैचें रे लिंगदेहे । मा तें विघडोनि नव जाये ।
हें तूं विचारूनियां पाहे। खरें किंवा खोटें ।।५०।।
संग न साहे जेथें । मन बापुडें कैचें तेथें ।
तुज पाहावया काळातें । शक्ती कैची रे ।।५१।।
तूं मज सिंहाचें पीलुं । काळ काये रे बापुडी भालु ।
मशक मेरूसी पाहे तोलूं । थडक हाणोनी ।।५२।।
थील्लर बाळकासी बुडवी खेळतां । आकाशमार्गे उडों जातां ।
तें केवी बाधूं शके रामदूता । तया हनुमंतासी ।।५३।।
पीपलीकेचेनि पक्षवातें । कैसें पडले ब्रह्मांड पालयें ।
कां दर्दुर उडेल गगनपंथें । सूर्य ग्रासावया केवी ।।५४।।
कां बलाढ्य म्हणे मी तरवार वोढीन । धांवोनि जातां आकाश तोडीन ।
झोंबी घेउनी वोढुनी पाडीन । बळें चि पृथ्वीवरी ।।५५।।
तेंवरी नडव्यानें डरांवें । जंव त्या पंचाननें न यावें ।
कां पतंगें धांवोनी भक्षावें । होळीसी जैसे ।।५६।।
कां जैसा नवनीताचा गोळा । युध्यालागी उताविळा ।
म्हणे मी या वडवानळा । ग्रासीन सगळें ।।५७।।
कां जैसा औदुंबरांतील पक्षी । म्हणे मी गळीन ब्रह्मांडासी ।
तैसा तुझीया स्वरुपासी । काळाचा आवाका ।।५८।।
अरे तूं नि: संग आणि निर्मळ । तेथें काये रे बापुडें काळ ।
प्रळयानळासी मृगजळ । केवी बाधूं शके ।।५९।।
काळ मायेचें अंगभूत । आणि तुझें स्वरुप मायातीत ।
तुझ्या स्वरुपीं रोहिणीजळवत । ते हि माया नाहीं ।।६०।।
कर्पुराचे रासीतुनी । येक खडा गेला निवडोनी ।
अग्निसंगें भस्म होउनी । गेला नव्हता चि जैसा ।।६१।।
तैसा तूं ये मायेतुनी । स्वरुपीं जातोसी निवडोनी ।
तेथें तुझी देहेबुद्धी भस्मोनी । गेली नाहीं रे ।।६२।।
जातोसी येतोसी हें बोलणें न घडे । परी तुज स्वहित कैसे घडे ।
म्हणोनीहें अघटित घडे । बोलणें आम्हासी स्वरुप ।।६३।।
स्वरुप बोलणें न घडे कैसें । येदर्थी मन घाली आमासें ।
हें तु प्रकृतीया विश्वासें । भाषण करी नं आम्हासी ।।६४।।
स्वरुप आहे स्वरुपापरतें। झाडुनी टाकिती मातृकातें ।
तरी मातृकावेगळें तयातें । मातृकीं कैसें बोलता स्वामी ।।६५।।
स्वरुप संकल्पाचा प्रांत । ऐसें जाणावें निभ्रांत ।
या स्वरुपाचा अंत । संकल्पासी हि ठाकेना ।।६६।।
स्वामी संकल्पापरता । ऐसें शद्वीं कां बोलता ।
उरतो शद्व सर्वथा । बोलों चि नये ।।६७।।
माझें बोलणें चि अबोलणें । हें तूं विचारुनिया पाहाणें ।
या शद्वासी होणें जाणें । संकल्पीं च आहे।
माझा उद्गार जो निघाला। तो संकल्पी च निमाला।
परी आत्माराम संचला राहिला । संकल्पातीत कीं ।।६९।।
मी जें बोलिलों तें संकल्पजनित । आणि आत्मा सांगितला संकल्पातीत
बोलतां चि अबोलणें त्याची मात । ऐसी असे ।।७०।।
जरी स्वरुप संकल्पापरतें । तरी तुमचें बोलणें व्यर्थ चि जातें ।
तुमच्या चि बोलें आरतें । जालें अनयासें ।।७१।।
तुम्ही संकल्पें बोलिले। तें संकल्पातीत राहिलें ।
येवं बोलणें तितुकें गेलें । व्यर्थ चि कीं ।।७२।।
अरे शद्व संकल्पीं आटला । परी अर्थ वेगळा राहिला ।
स्वामी अर्थ शद्वें प्रगटला । म्हणोनी तो हि संकल्प ।।७३।।
प्रगट जाला परी नाथिला । परी तैसें चि सांगणें स्वरुपाला ।
अर्थाच्या हि अर्थाला । सांगणें न घडे ।।७४।।
बोलोनि राहिले निवांत । विचार घेतां शद्वासी अंत ।
जाला संवाद भेदरहित । उभयेता येक चि जाले ।।७५।।

आपाद रूळे वैजयंती। ज्ञानमुद्रा सव्य हस्तीं।
बाहुभूपणें शोभा देती। त्यावरी कीर्तिमुखें।।८।।
रत्नजडित दशांगुळें। आजानु बाहु कर सरळे।
वीरकंकणें तेजाळें। चंचळ विद्युल्लता ऐंसी।।९।।
दीर्घ वक्षस्थळ अति सुंदर। जें की सिंधुजेचें मंदिर।
शोभा वर्णिता उदर। जेथें श्रुती थोटावल्या।।१०।।
नाभीसरोज निर्मळ। जें कीं ब्रह्मयाचें जन्ममूळ।
कटीप्रदेश देखोनी तात्काळ। सिंही हिमाद्रि सेविला।।११।।
रत्नजडित मेखळा कंठी। क्षुद्र घंटांचा झणत्कार उठी।
सानुज माज देखोनी उफराटी। सिंहीमुखें केली।।१२।।
जैसे कर्दळीचे स्तंभ। तैसे उरद्वय स्वयंभ।
जानुयुगुळ सप्रभ। पोटरिया मीनाकृती।।१३।।
साजिरी घोटीं वर्तुळें। जैसें मणीमये जालें नीळें।
सुरंग टांचाचीं कवळें। अरूणप्रमेसारिखीं।।१४।।
सपोस पातळें दोन्ही पाउलें। जेथें मुनिजन रंगले।
साधक हि तें चि चिंतूं लागले। स्वहिताकारणें।।१५।।
वामभागीं शोभे जनकनंदिनी। सन्निध शरासन ठेउनी।
दक्षिणे लक्ष्मण उभा कर जोडुनी । सन्मुख मारुतात्मजु ।।१६।।
पुष्टिभागीं कैकयीनंदन । भरथ आणि शत्रुघ्न ।
छत्रेचामरेंसी दोघे जण । आदरें सेविती श्रीरामा ।।१७।।
चरणीं वांकी तोडर गर्जती । पाउल मांडीवरी येक क्षितीं ।
तेथें रामदासाची वस्ती । कदा वियोग न साहे ।।१८।।
राम सर्वांगें सुंदरू । राम करुणेचा सागरु ।
दीन अनाथाचा उद्धारू । येक श्रीराम कर्ता ।।१९।।
वैभव प्रपंचीं वेचावें । आणि अंतीं रामासी स्मरावें ।
रामें तयासी सांभाळावें । कृपाळुपणें ।।२०।।
प्राणी क्षीण जाला देहीं । वेढिला येमदूतीं तेहीं ।
तेव्हां सोडविता नाहीं । येका श्रीरामा वांचुनी ।।२१।।
जेधवा वैभवहीण व्हावें । जिवलगीं वोसंडावे ।
ते समयी आपंगावे । कृपाळुवें राघवें ।।२२।।
रामासी कोण्ही च स्मरेना । परी राम माझा विसंभेना ।
गुण दोष विचारीना । मायेबाप विश्वाचा ।।२३।।
राम जीवींचा जिव्हाळा । राम मनींचा कोवळा ।
राम जाणे अंतर्कळा । निजदासांची ।।२४।।
राम पुण्यपरायेण । राम लोकत्रयाचा प्राण ।
रामें दास बिभीषण । ---- अक्षई केला ।।२५।।
वैभवे रावण माजले । तेणें सकळ देव गांजिले ।
ऐसें जाणोनी धांवणें केलें । वैकुंठीहुनी रामें ।।२६।।
वानरें मिळालीं रामाभोवती । राम वानरांचा सांगाती ।
धांवधांवों जवळी येती । कोण भाग्य तयांचें ।।२७।।
रामपायीं अहिल्या शिळा । दिव्यरुप जाली बाळा ।
रामें गणिकेसी सोहळा । विमानाचा दाखविला ।।२८।।
राम खाये भिल्लटीचीं बोरें । रामप्रतापें वानरेश्वरें ।
राज्य केलें सहोदरें । गांजिला होता जो ।।२९।।
राम सुरवरां कोवसा । राम मंडण सूर्यवंशा ।
राम जप भवानीशा । सप्रचीत राम नाम ।।३०।।
नामें तारिले पाषाण । नामें पतित जाले पावन ।
नामें मुक्त विश्वजन । शिवउपदेशेंकरूनी ।।३१।।
नाम जिव्हा जपे जयाची । तेथें प्राप्ती काये काळाची ।
आदिकरूनी विरंची । विपरीत करू न शके ।।३२।।
जे कोण्ही मुक्त जाले । आणिकीं चीतवृतीनें सीवतले ।
क्रियमाणें डगमगिले । धोका आदळला तेणें ।।३३।।
तेहीं श्रीरामचिंतन । करावें भावार्थेकरून ।
तयासी धोकियापासून । सोडवील स्वामी माझा ।।३४।।
राम माझा चि नाहीं नेमिला । जे जे शरण गेले त्यांचा चि जाला ।
परी रामासारिखा स्वामी फावला । ते चि धन्य जगीं ।।३५।।
राम सकळ प्राणीमात्राचा । आणि कैवारी ऋषेश्वरांचा ।
सारथी आडलियांचा । समईं आपंगी ।।३६।।
आतां हि जयासी वाटे भेटावें । रामें मज सांभाळीत जावें ।
ऐसें दृढ घेतलें जीवें । तरी ऐका मी सांगेन ।।३७।।
श्री राम जय राम जय जय राम ।
ऐसा कांहीं येक धरूनि नेम ।
जप कीजे तेणें आत्माराम । जोडेल नेमें ।।३८।।
परी कोण्हासी कळों नेदावा । जप अंतरीं च करावा ।
जैसा कृपणासी धनठेवा । सांपडला येकांतीं ।।३९।।
राम जपत्याचें चीत पाहातो । जप करितां आळस येतो ।
विकल्प अंतरी प्रवेशतो । ढळेना मेरू जैसा ।।४०।।
कां प्रपंचीं होती थोर आघात । तेणें चीत होये दुश्चीत ।
देहासी आपदा होती अत्यंत । तऱ्ही रामासी विसंभों नये ।।४१।।
जप नेमिला तो चुकों नेदावा । त्या वेगळा सर्वदा स्मरावा ।
मळत्यागीं हि न विसंभावा । कर्मठपणेंकरूनी ।।४२।।
ऐसें अखंड नाम स्मरावें । परी दुसऱ्यासी कळों नेदावें ।
ऐसा निजध्यास जालिया राघवें । पाविजे तात्काळ ।।४३।।
वैरें निजध्यास रावणें केला । त्याचा संकल्प त्यासी फळला ।
मां जेणें दास्यत्वें उपासिला । तो राम कैसा नव्हे ।।४४।।
कांहीं साक्षात्कार जाला । तो सांगों नये दुसऱ्याला ।
जरी आळकेपणें सांगितला । तरी पुन्हां होणार नाहीं ।।४५।।
पुन्हां साक्षात्कार कैंचा । जाला तरी वरपंगाचा ।
हा मी आपुले जीवींचा । अनुभव सांगतों ।।४६।।
अरे द्रव्यठेवणें सांपडलें । तें जरी प्रगट जालें ।
तरी तात्काळ हिरोनी नेलें । नाहीं राजदूतीं ।।४७।।
म्हणोनी अनंत कोटी ब्रह्मांडनायेक । तेथे द्रव्य तें केवढें वापुडें रंक ।
म्हणोनी साक्षात्कार अलोलिक । प्रगट सहसा करूं नये ।।४८।।
लोकांपासी सांगावें । कां जें लोकीं वरें म्हणावें ।
अल्पासाठी आपुले करावें । अनहित कैसें ।।४९।।
जयासी राम चि व्हावा । तेणें लोकिक सोडावा ।
राम कैवारी करावा । जो संकटीं नुपेक्षी ।।५०।।
जयासी उपासना जैसी । तेणें स्मरावें आपुल्या देवासी ।
निजध्यास जालियां नेमेंसी । साक्षात्कार होये ।।५१।।
शिष्या सांगतों तुज नेम । तो चि रे तुझा स्वधर्म ।
ज्ञातेपणें हि माझा राम । विसंभों नको ।।५२।।
राम स्वामी जाण माझा । तरी --- तुज होये आजा ।
तुझें लडिवाळपण वोजा । चालवील आत्मारामु ।।५३।।
राम दासासी भिन्नत्व नाहीं । तरी राम होये मी हि ।
तूं त्याचा दास तरी तूं हि । राम चि होसी ।।५४।।
शिष्या शद्बज्ञान सोडी । श्रीरामा ऐसी धुर जोडी ।
मग राम चि हा तडातोडी । करील तुझिया भेदाची ।।५५।।
समर्थे ज्याचा अंगिकार केला । कोण बोलों शके तयाला ।
माझ्या रामासी जो शरण गेला । तो कळीकाळासी वंद्य ।।५६।।
शद्बज्ञान उदंड बोलती । परी क्रिया कोण्ही च न करिती ।

राम स्वरूपाची प्रभा। कोंदाटली सबाह्य ।।१२।।
रामें आपणासारिखें केलें। दास दासपणा मुकले।
रामासी गिळुनी येक चि जाले। येकपणा हि वेगळष ।।१३।।
स्वामी सेवक आनंदले। हर्षे करूनी उचंबळले।
परस्परें गिळुनीं ठेले। लोभ आला म्हणोनी ।।१४।।
ऐसें देवाभक्तांचे साजणें। जीव घेणें जीव देणें।
पुन्हां मागुतें ये जाणें । न घडे कदा ।।१५।।
नवविधा भक्ति या चि कारणें। जें आपण स्वयें राम होणें।
सवें चि रामपण हि टाकणें। स्वानुभवेंकरूनि ।।१६।।
नवामध्यें मुख्य नायेका। ते येक चि पदवी राव आणि रंका।
ते जरी घडे तरी आशंका। मात्र तुटोनी जाती ।।१७।।
तेथें सोवीळे होउनी जाती। देहेबुधी वोवीळी टाकिती।
भेदरहीत येकांती। रामाचें रूपडें आहे ।।१८।।
तेथें जे जे पवाडले। ते ते अवघे राम चि जाले।
आपुली शरीरें पाहों गेले। तों तें पालटोनी गेली ।।१९।।
पालट जाला देवांभक्तरंसी। पालट जाला अनुभवासी।
पालट जाला पालटासी। भेदा अभेदा पालट ।।२०।।
नवां खणांची उर्परी। राम तयेच्या मस्तकावरी।
आठ खण बोलांडिल्या उपरी। नवमा खण चढवा ।।२१।।
जो आठांसी सांडुनी नवमीस गेला। आणि नवमीचा हि मस्तकी चढला।
तयासी च आत्माराम भेटला। येर ते भोवते भोवती ।।२२।।
म्हणोनी शिष्या अभेद भजन । तुवां करावें आत्मनिवेदन।
भिन्नत्व अर्पुनी अभिन्न। होउनी असावें ।।२३।।
जेणें मीपण धरावें। तेणें विश्वरूपी व्हावें।
तरी विश्वरूपी तेणें जाणावें। विश्वाचें अंतर की ।।२४।।
जेणें विश्वचें अंतर जाणावें। आणि सत्तेचें वैभव हातासी यावें।
जे जें घेतलें जीवें। ते तें करूं शके ।।२५।।
एसें ऐकोनीया मना। अवस्ता लागली आवरेना।
कां जें विश्वाचें अंतर कळेना। विचारूनी पाहातां हि ।।२६।।
तरी मी विश्वरूपी शब्दें जालों। परी अंतर न कळे चि वायां गेलों।
अंतर न कळतां अंतरलों। परमार्थांसी की ।।२७।।
जैसा मी देशाधिपत्य म्हणे। आणि देशाचें हारद्र नेणे।
तैसा मी विश्वरूपीं परी न जाणे। विश्वाचें अंतर ।।२८।।
तरी स्वामी म्यां काये जी करावें। विश्वाचें अंतर कैसें जाणावें।
हारद्र न कळतां व्हावें। लटिकें चि विश्वरूपी ।।२९।।
ऐक गा ये शिष्या मंदमती। तुझी अद्यापि न फिटे भ्रांती।
नस्ता चि विकल्प चित्ती। धरिला तुंवा सदृढ ।।३०।।
विश्वाचें अंतर तुज कळलें। आणि सत्तेचे वैभव हातासी आलें।
तरी तुझें स्वरूप जालें। विचारितां संगुण की ।।३१।।
जाणीव तितुकी जाण माया। ते क्षणभंगुर जाईल विलया।
तुझें स्वरूप मायातीत वांयां। सीणसी अविवेकें ।।३२।।
शिष्या विश्वरूपी तुज म्हणावें। हें परी वाटे बोलावें।
परी तुवां विवेकेंकरूनी पाहावें। विश्वरूपी मी कैसा ।।३३।।
रूप तितुकें नासीवंत। विश्वरूपासी होईल अंत।
म्हणोनियां तूं सतंत। विश्वरूपा हि वेगळा ।।३४।।
जाणीव तितुकी विचारितां कांही। स्वरूपीं तों दिसत नाही।
जाणीव हे माया पाही। तरी तूं काये माया रे शिष्या ।।३५।।
सत्य चि जी स्वामीराया। विचारें पाहातां मी तों माया।
प्रत्यक्षासी प्रमाण कासया। करावें स्वामी ।।३६।।
माया प्रत्यक्ष चि आहे। सकळ विश्व दृष्टीसी पाहे।
नाथिली हा शब्द न साहे। प्रत्यक्षापुढें ।।३७।।
जैसा आप्त विदेशासी गेला। बहुत दिवस होतां राहिला।
अवचट भेटी जाली बैसला। सन्निध वार्ता सांगे ।।३८।।
सन्निध आहे बैसला। तों येक म्हणती तो क्रमला।
आम्ही आपुले दृष्टी देखिला। हें सत्य कैसें मानावें ।।३९।।
तैसी आम्ही आपुल्या डोळा। माया पाहातां वेळोवेळा।
आणि प्रत्यक्ष या ब्रह्मगोळा। मिथ्या कैसें म्हणावें ।।४०।।
अरे शिष्या भ्रमलासी वाया। दृश्य अदृश्य तितुकी माया।
ऐसी हे तुज पाहावया। सामर्थ्य आहे कीं ।।४१।।
तुझें स्थूळ औट हात। तें मायेचें अंगभूत।
तयासी माया वाटे शाश्वत। प्रत्यक्ष चि आता ।।४२।।
मन स्थूळाचे संगती। नाना कल्पना उठती।
त्या आपआपणा पाहाती। वेगळीक दाउनी ।।४३।।
तुझा स्वरूपीं माया नाडले। आणि मायेसी हें सर्वथा न कळे।
स्वरूप चि तेथें कळे। हे समूळ मिथ्या ।।४४।।
जितुकी कळली तितुकी माया। दुराग्रह करणें वाया।
म्हणसी प्रत्यक्षासी प्रमाण कासया। विचारेंवीण कैसा ।।४५।।
अरे मायेनें माया पाहिली। तरी तुझी काये गाठोडी गेली।
तुझी स्वरूपस्थिती आली। नाहीं अनुभवा तुज ।।४६।।
दृष्टीबंधन खेळ खेळती। सुवर्णाच्या रासी दाखविती।
परंतु आपण भिक्षा मागती। म्हणोनी तो खेळ मिध्या जाणावा ।।४७।।
दृष्टीबंधनाचा खेळ। शाश्वत असतां चिरकाळ।
तयासी भिक्षेची हळकळ। करणें न लागती ।।४८।।
स्वरूपस्थिती अनुभवा येतां। समूळ तुटे मायेची वार्ता।
असो हा श्रमु चि सांगतां। अनुभवेंवाचुनी ।।४९।।
तें लटिकें चि सुवर्ण होतें। दृष्टीबंधनें जनांसी दिसतें।
परी समूळ मिध्या तेथे।   कांही च नाही ।।५०।।
तैसी माया हे प्रत्यक्ष दिसे। पाहातां सत्य चि भासे।
परी जागृतीस आलिया नसे। स्वप्न जैसें ।।५१।।
स्वप्न देखोनी निर्बुजला। ब्रह्मारण्यामध्यें पहला।
प्राणी मार्ग असे चुकला। आक्रंदे दुखें ।।५२।।
स्वप्न सत्य चि वाटे निद्रिस्ता। परी निशेष लटिकें जागृती येतां।
जागृतीस स्वप्नभयेवार्ता। बोलों चि नये ।।५३।।
तैसा संसार हा दीर्घ स्वप्न। मध्यें माया दिसे माहा विघ्न।
स्वरूपजागृती आलियां निर्विघ्न। मुळी च आहे ।।५४ ।।
तेथें संसारदुख आटेल। स्वयें आनंद प्रगटेल।
आनंदाचें हि मूळ तुटेल। नव्हतें चि जैसें ।।५५।।
तेथें दृश्य अदृश्य नुरे कांही। लक्ष अलक्ष निशेष नाहीं।
स्वरूपानुभव सर्व हि । निवांत होईल ।।५६।।
तेथें नवविधा भक्तीचा अंत देवा भक्तांसी येकांत।
विश्रांती पावती संत। संत माहानुभाव जेथें ।।५७।।
तेथें रामदास रामीं राम । सोडील आपुलें नाम।
विश्रांतीचें निजधाम। होईजे स्वयें ।।५८।।
इति श्री रामदास रामाचा। विनवी म्हणे रघुनाथ  वाचा।
कुतर्क नेघावा नामाचा।   रामा शब्दें वनिता ऐसा ।।५९।।

***

**।।श्रीरामसमर्थ।।**

**समास सतरावा**

**।।श्रीगणेशाय नमः।।**

न्याहाळितां जरी दृष्टीसी पडिलें। आणि पुन्हां पाहातां पर्ण आडळलें।
तरी पर्ण न पाहातां गेलें। लक्ष तये कोरेवरी।।१६।।
मग डाहळी सांडुनी निराळा धांवे। देखिले तयासी हि तेथुनी फावे।
मग पुडिलासी दाखवी जीवें भावें। कुडकुडा होउनी।।१७।।
येकी बोटें दाखवितां चि देखिलें। येकांसी मिंताड आड केलें।
येकीं आपण चि देखिलें। अकस्मात चंद्ररेखेसी।।१८।।
सकळ सृष्टीसी हें ठाउकें। जाणिजेत आहे सकळ लोकें।
उभे राहाती पाहाती कौतुकें। येकापुढें येक होउनी।।१९।।
परी चंद्र दाखवावयाचा कांही। वृक्षपर्णाची नेग नाही।
ज्यासी जैसा तैसा तेहीं। दाखविला येर येरां।।२०।।
येथें चंद्रेसी कारण। डाहाळी भिंताड पुसे कोण।
तैसीं लक्षें जाणावीं निजखूण। ते लक्षाहुनी परती।।२१।।
चंद्र म्हणोनी पानं चि भावी। जाणपणें आणिखासी दाखवी।
तैसा आत्मा चुकोनियां म्हणवी। लक्षे हे चि गुरूखूण।।२२।।
जरी लक्षें ते चि ब्रह्म म्हणती। तरी नेत्र असतां चि स्वरूपप्राप्ती।
डोळे गेलियां चरफडिती। ब्रह्म न दिसे म्हणोनी।।२३।।
येवं ब्रह्म देखणें हे तरें टवाळी। साच मानिती परी बुचबंगाळी।
कल्पवृक्ष म्हणोनी भोपळी। लाविजेल जेवी।।२४।।
कोण्ही येक वाराणसीस निघाला। सीमा उलंघन करूनी गेला।
सर  नावाचा गांव राहिला। हे चि वाराणसी म्हणोनी।।२५।।
पुसे नांव काये हो गांवासी। ग्रामस्थ म्हणती हे वाराणसी।
ऐसें जाणोनियां वस्तीसी। ठांव घेतला।।२६।।
तों सांगाती मागुनी आले । ते तयासी सांडुनी पुढें गेले।
ऐसें देखोनीयां बोले। ग्रामस्थांप्रती।।२७।।
त्या गांवाचा अभिमान लोकांसी। म्हणती हे जवा आगळी कासी।
ईपुढे काये वाराणसी। ऐसें सकळ बोलती।।२८।।
त्याच्या बोलासी विश्वासला। म्हणोनी तिथें चि राहिला।
आणि श्लाघ्यता दावी यात्रकराला। म्हणे मज् तरी कासी फावली।।२९।।
म्हणे कां रे पुढें जाता। तुम्ही मूर्ख मज पाहातां।
अरे हे चि कासी आतां। ईजपरतें काये आहे।।३०।।
तैसी नाना मतें देखणी। तये भसेसी  पडिले प्राणी।
असो तयाची सोसणी। कोणें करावी।।३१।।
जें शास्त्रमुखें ऐकिलें। तें चि गुरूमुखें दृढ जालें।
आणि आपुलिया हि आलें। अनुभवासी।।३२।।
तिहीची खूण बाणली। विचारितां येक चि जाली।
तयासी च फावली। शाश्वत सद्गुरूकृपा।।३३।।
अरे ब्रह्मज्ञान  आणि झांकावें। संतापासी कानकोंडे व्हावें।
तें सत्य चि जाणावें। केवळ अज्ञान।।३४।।
अज्ञान हि भ्रष्टलें। त्याचें पाषांड मत जालें।
तें जायेना कांही केलें। संचित पूर्व पातकांचें।।३५।।
अज्ञान बापुडें जातें। सांगतां चि ज्ञान होतें।
कृपाळुपणें प्राणीयातें। अपंगिल्या सज्जनीं।।३६।।
ते सज्जन ज्यासी भ्याले। पाषांड ऐकतां वाज्य आले।
कीरर्र म्हणोनीया पळाले। मौन्यमुद्राकपाटी।।३७।।
म्हणोनी अज्ञान ते बरें। परी नायेकाची पाषांड उत्तरे।
मधलंड पाषांडी खरें। तें चि खोटें करिती।।३८।।
मधलंड आधारें बोलती। शास्त्रमतें खटपटिती।
शब्दज्ञान हि आहे परी भ्रांती। फिटली नाही।।३९।।
वादवेवादाचें लक्षण। तें तूं जाण अपूर्णपण।
अभिमानी गुंतले खूण। स्वानंदाची नेणती।।४०।।
म्हणती शास्त्रामते जेही बोलावें। त्यासी लटिकें कोणें म्हणावें।
तरी आतां हे चि स्वभावें। सांगिजेल।।४१।।
समूळ शास्त्रार्थ पाहातां। ते चि खटपटिती नाही ऐक्यता।
वेदी हि विचारूं जातां। येकविध बोलिलें नाहीं।।४२।।
तैसें चि कवित्त्व संत जन। परोपकारार्थ निरूपण।
केले करिताती परी तूं जाण। आदिअंती येक चि नाही।।४३।।
दिवसेंदिवस ज्ञान वाढे । तैसें चि निरुपण हि चढे ।
नाना अभेद शब्द गाढे । दिवसेंदिवस बोलती ।।४४।।
तरी आपण विवेकें पाहावें । अर्थांतरी मग्न व्हावें ।
स्वसुख पावलिया स्वभावें । ऐक्यता चि आहे ।।४५।।
शब्दज्ञानें ऐक्यता मोडे । तरी शब्दज्ञान काये स्वरुपीं घडे ।
वेगळेपणें रोकडें । जन्म भोगणें घडती ।।४६।।
जेथें शब्दज्ञान न साहे । तेथें ऐक्यता विघडों चि    ---- लाहे ।
सत्य किंवा मिथ्या पाहे । विवेकेंकरूनी ।।४७।।
तेथें शब्दज्ञाता कैंचा उरेल । मां तुज शब्दीं बुडालासी म्हणेल ।
बुडालासी बोलणें चि फोल । शाब्दिकांचें ।।४८।।
जनें तरलासी म्हणतां तरसी । आणि बुडलासी म्हणतां बुडसी ।
लोकाधेनाच्या समाधानासी । सर्वथा उरी नाहीं ।।४९।।
आमुचा स्वामी पुण्यपरायेण । सूर्यवंशाचें मंडण ।
लीळाविग्रही नारायेण । तयासी रजकें निंदिलें ।।५०।।
तेथें आम्ही मानव किती । मां जन आम्हांसी बोलों भिती ।
असो जनांसी शब्द ठेविती । ते चि मूर्ख जाणावे ।।५१।।
जन आणि जनार्दन । यासी नाहीं भिन्नाभिन्न ।
म्हणोनियां जनापासून । अनृत्य न घडे ।।५२।।
जन सत्य चि बोलती । जैशासी तैसें चि म्हणती ।
गुण असतां ऐकोनी चित्तीं । कां पा दुश्चीत व्हावें ।।५३।।
जरी जनीं वाष्कळता म्हणावी । नसती च करिती उठाठेवी ।
तरी मिथ्या जाणोनियां जीवीं । आपण कासया धरावी ।।५४।।
तुझां ठाईं नाहीं विश्वास । आणि जनांसी ठेविसी गुणदोष ।
वादवेवाद करूनि सावकाश । देहेबुद्धि धरिली ।।५५।।
जन बोलती या चि भावें । जे तुवां देहे मी न म्हणावें ।
निंद्य जाणोनिया जावें । आपुलिया निजभुवना ।।५६।।
आणि आमुची हि आज्ञा ऐसी । जे तुवां नातळावें देहेबुद्धीसी ।
ऐकत असतां तुझा मानसीं । नाना विकल्प उठती ।।५७।।
आतां असो हें बोलणें । जें जें देखसी देखणें ।
चित्तासी न येतां पेखणें । सर्वथा करूं नको ।।५८।।
तूं म्हणसी जें म्या सांगावें । ते काळीं सत्य चि मानावें ।
पापांड सांडुनी व्हावें । पूर्ण समाधानी ।।५९।।
तरी अनंत जन्मांतरीचीं पातकें । प्राणीयासी घडली अनेकें।
म्हणोनी तयासी विवेकें। वोसंडिले आहे।।६०।।
त्रास सांगतां सत्याचा। आणि विश्वास वाणला असत्याचा।
हा जाणावा पूर्व पातकाचा। ठेवा सोडीना।।६१।।
माया खेळते कौतुकें। प्राणी गोविले चेटकें।
भ्रांती घालूनि अविवेकें। भुलऊनि टाकिलें।।६२।।
अवघी च मुक्ति पावावी। तरी हे वाडी कोणें बसवावी।
म्हणोनी माया हे गोवी। नाना उपायेंकरूनी।।६३।।
प्राणी करूं जाये उपाये। बदलूनि करी त्याचा चि अपाये।
अंती प्राणी पाहों जाये। तंव उपायासी ठाव चि नाही।।६४।।
ऐसें ये मायेचें करणें। भल्यासी वेडा लावणें।
तेथें तुझें कोणीकडे सांगणें। व्यर्थ चि कां सिणसी।।६५।।

गुणसाम्य निमालिया अंतीं । स्वरूप चि आहे ।।६।।
ऐसें स्वरुप पाहों जावें । पाहों जातां आपण चि व्हावें ।
तेथे कोणासी कोणें म्हणावें । येकंकार म्हणोनी ।।७।।
जैसें कांहीं स्वरुप नांव । तैसा येकंकार शद्बाचा भाव ।
परी हें अवघें चि बोलणें वाव । पाऱ्हेरीया सगट ।।८।।
येकंकार यासी म्हणावें । परी आपण स्वयें अनुभवावें ।
अनुभव जालियां स्वभावें । समाधान आहे ।।९।।
याचे चि नांव भेद तुटला । अभेद शद्ब तो हि निमाला ।
भेदाअभेदातीत संचला । आत्मा असत चि आहे ।।१०।।
स्वरुपीं तों भेद नाहीं । माया मिथ्या म्हणतां सर्व हि ।
तरी कांहीं क्रिया केली ते देहीं । बाधूं न शके कीं मज ।।११।।
अभेदी आणि क्रिया करणें । हें बोलणें चि लाजिरवाणें ।
भेद चि नाहीं तेथें कोणें । क्रिया करावी ।।१२।।
मी चौ देहापरता । मज कळलें जी तत्वता ।
परी विचारें पाहातां । स्थूळ तों धरिलें कीं ।।१३।।
स्थूळ काये तां धरिलें । हें सकळ मायेनें केलें ।
केलें तें हि विचारितां जालें । मायेचें चि आंग ।।१४।।
तूं मायेहूनि वेगळा । बध्धता मुक्तता मायेच्या कळा ।
ऐसें जाणोनि वेळोवेळां । स्थूळधारी कां म्हणसी ।।१५।।
स्वामी बोलिलेती वरवें । परी स्थूळ आहे तों कैसें वर्तावें ।
हें स्वामीनें मज सांगावें । कृपा करूनि ।।१६।।
ऐक शिष्या साराचें हि सार । जेणें पाविजे पैलपार ।
सांगतों ये वचनीं आधार । किंचित हि नाहीं ।।१७।।
अरे जयासी परमार्थ व्हावा । तेणें प्रपंच हा त्यजावा ।
प्रपंचीं परमार्थ करावा । तो ठाकेना सर्वथा ।।१८।।
करितां प्रपंचाच्या वृत्ती । संसारीचे झोके आदळती ।
दुखशोकें पडे भ्रांती । मग परमार्थ कैंचा ।।१९।।
संसारीं असोनि अलिप्त म्हणे । त्याचें फटकाळ बोलणें ।
आधार धरी टाकावा कोणें । प्रपंच म्हणोनि ।।२०।।
प्रपंच म्हणिजे उदास नागवणा । आणि परमार्थ म्हणिजे प्रपंचबुडवणा ।
परस्परें या दोघां जणां । सर्वथा न पडे ।।२१।।
परमार्थ हा नव्हे सोपा । ज्ञानगोष्टी व्यर्थ  बापां ।
जरी होईल ईश्वरकृपा । तरी च हा प्रपंच सुटे ।।२२।।
अरे शिष्या आम्ही सांगणें । परी तुज लागे क्रिया करणें ।
परमार्थ जोडला आणि डगमगणें । केवळ अज्ञान ।।२३।।
जयासी वाटे वैराग्य करावें । तेणें कांहीं च न विचारावें ।
उठोनी वाटा चि लागावें । दिगांतराप्रती ।।२४।।
आपण आपणिया वोळखिलें । कोण्ही कोण्हाचें नव्हेंसे कळलें ।
आणि प्रपंच करितां चि मेले । ते पढतमूर्ख जाणावे ।।२५।।
परमार्थ सदृढ जडे । मोहोजाळ समूळ उडे ।
हें प्रपंचीं सहसा न घडे । वैराग्यें वांचुनी ।।२६।।
तया वैराग्या आड विवसी । आहे ते सांगतों तुजपासी ।
सावधान होउनी मानसीं । विचार करावा ।।२७।।
उपजत चि वैराग्य जोडे । ऐसे परमार्थी थोडे ।
असो मग हि अंतर पडे । किं निमित्य तें ऐका ।।२८।।
येकासी पत्नी सांपडली । वृत्ती तयेपासी गुंतली ।
असो तेथुनी मोकळीक केली । तरी जन म्हणे त्यजूं नये ।।२९।।
तितुका चि आधार पाहिला । प्राणी प्रपंचीं गुंतोनि राहिला ।
वैराग्याचा नाश केला । होये कीं प्रपंचें ।।३०।।
जरी म्हणावें वेद गोवी । तरी त्याची हि आज्ञा ऐकावी ।
पुत्र जाल्या नंतरें त्यजावी । प्रपंचेसी भार्या ।।३१।।
येकीं प्रपंचाची लालुची केली । येकां कुळाभिमानें लाज लाविली ।
म्हणती वृत्ती भूमी बुडाली । तरी नांव जाईल वडिलांचे ।।३२।।
येक ते लौकिक राखती । ना रे बा निघोनी गेला म्हणती ।
येक ते आधार घेती । जनकादिकांचा ।।३३।।
येक म्हणती कासयासी जावें । वैराग्य गृहीं च करावें ।
आल्या अतितासी अन्न द्यावें । सेवटीं ते हि ठाकेना ।।३४।।
येक म्हणती जीव कां नेदावा । दुसऱ्यासी आणि हात पसरावा ।
दु: काळ आला तरी यावा । तो हि सावरेना ।।३५।।
येकांसी देहाची लालुची मोठी । परी हे जाणावी परम खोटी ।
प्रारब्ध चुकेना सेवटीं । अंतरे वैराग्य ।।३६।।
येक म्हणती विवेक असावा । नाहीं च तो कोठुनी आणावा ।
अविवेकें प्रपंच करावा । तैसा चि परमार्थ हि ।।३७।।
विवेक नाहीं म्हणोनि डोळे । झाकुनीया अविवेकें बळें ।
विवेक साधी तों काळें । आयुष्य नेलें ।।३८।।
म्हणोनी हें कांहीं च नसतां । प्रपंच सांडुनी उदास होतां ।
मग तया साधकाची चिंता । ईश्वरासी आहे ।।३९।।
येक म्हणती वैराग्याचे दिवस । येती मग व्हावें उदास ।
तंवरी हा सावकाश । प्रपंच भोगावा ।।४०।।
प्रपंच महत्वाची वेडी । गळा पडतां चि बांधोनि पाडी ।
मग साधकें बापुडीं । गुंतोनि पडती ।।४१।।
सकळ सृष्टी प्रपंची गोवी । ऐसा थोडा जो उगवी ।
ज्ञान सांगोनियां दावी । वाट वैराग्याची ।।४२।।
जेथें विवेकेंसी वैराग्य जागे । तेथें समाधान पाठी लागे ।
प्रतिष्ठेसी म्हणे उगें । वैस परतें ।।४३।।
प्रतिष्ठा जालिया लालुची न करी । ते चि जाणावी वैराग्यसामग्री ।
आणि स्वधर्माचा सांभाळ करी । तो विवेक जाणावा ।।४४।।
परमार्थ तो चि जो वैराग्य । वैराग्यापरतें नाहीं भाग्य ।
वैराग्य नाहीं ते अभाग्य । लुलु दारिद्री ।।४५।।
म्हणोनी तुवां वैराग्य करावें । लोकीक भये सोडुनी द्यावें ।
तारुण्य गेलिया खंगावें । लागेल पुढें ।।४६।।
आतां जरी वैराग्य ठाकेना । आणि प्रपंच हा सुटेना ।
तरी प्रपंचीं असोनि वासना । परमार्थाकडे वोढावी ।।४७।।
सोडुनी प्रपंचसोहोळा । परमार्थ दाखवावा आगळा ।
दीन देखोनी कळवळा । आला पाहिजे ।।४८।।
भक्ती श्रेष्ठ हे हरिकथा । नेमस्त मेळवी परमार्था ।
ते तूं टाकूं नको सर्वथा । प्रतिदिनीं ।।४९।।
जेणें प्रपंची असावें । तेणें दों विषयां वेगळें व्हावें ।
काये म्हणाल तरी चित्त द्यावें । कनक आणि कांता ।।५०।।
म्हणसी प्रपंच म्हणिजे कनककांता । हे मी कैसे टाकूं आतां ।
तरी ईश्वरें दिधली ते वनिता । सकळासी ठाउकी ।।५१।।
तैसें चि कनक पुढिलांचें । अभिळाषुनी आपुलें सांचे ।
ऐसें केलें तरी कैचें । समाधान पावसी ।।५२।।
अरे आहे तैसें नाहीं । गेल्या दु:ख न वटे देहीं ।
आलियाचा कांहीं । संतोष न मनी ।।५३।।
ऐसें विचारावें तुवा । ठाकेल तरी प्रपंच करावा ।
नाहीं तरी नेमस्त त्यजावा । हे चि आज्ञा पोटस्ते ।।५४।।
अरे शिष्या संसारीं सुख वाटे । परी तुज न कळे दुख मोठें ।
जयासी न नळे त्याचे खोटें । अदृष्ट जाणावें ।।५५।।
ऐसे हें विश्वासी कळतें । परी कळोन क्रिया घडे जेथें ।

**लोकांनी तुला चांगला शहाणा, मोठा सत्पुरुष म्हणून म्हणावे हाच एक मोठा देहाभिमानाचा रोग तुला जडलेला आहे. तो पूर्णपणे नाहीसा झाला पाहिजे. सत्संगतीनेच, त्यांच्या सेवेनच हा अभिमान गलीत होतो. समाधान मिळू लागते.**

**आपल्याला समाधान मिळाले आहे की नाही याला आपले मनच साक्षी आहे. त्याला दुसऱ्याने सांगण्याची गरज नाही. तुला पूर्ण समाधान पाहिजे असेल तर समाधानीच झाले पाहिजे. केवळ लोकांनी बरे म्हणावे, सत्पुरुष म्हणावे, मोठा लौकिक मिळावा, प्रतिष्ठा मिळावी असे वाटत असेल तर त्याने खुशाल पुस्तकी ज्ञान शिकावे. आत्मज्ञानाला या कशाचीही जरुरी नाही. म्हणून हे बाकीचे सर्व सोडल्याखेरीज आत्मज्ञान होणार नाही. म्हणून हे आत्मज्ञान सोपे नव्हे. त्याच्या आड खूप विघ्ने आहेत.**

**ही सर्वही विघ्ने नाहीशी करण्याचे सामर्थ्य श्रीसद्गुरुच्या ठिकाणी असते. त्यांना पूर्ण शरण गेले पाहिजे. तरच आत्मज्ञान अंगी बाणते व समाधान मिळते.**

समास येकुणिसांवा

।।श्रीराम ।।

संतसंग भाग्या लागला । संतसंग कैचा अभाग्याला ।
जयासी संतसंग जोडला । ते संत चि होती स्वयें ।।१।।
जे जे संगतीसी लागावें । ते ते गुण लागती स्वभावें ।
प्रयेत्नासी न लगे जावें । आदरें करूनि ।।२।।
प्राणी असती जये संगती । तैसे चि गुण आंगीं वाणती ।
पाहाणें हि न लगे प्रगट दिसती । जयाचे तया सारिखे ।।३।।
जैसा कागद येक चि आहे । परी जे वस्तूची संगती लाहे ।
ते वस्तूची सारिखा पाहे । परिमळ तया कागदासी ।।४।।
हा हि दृष्टांत गौण जाला । विचार पाहातां अनुभवासी आला ।
संतसंगती जो लागला । तो वेगळेपणें उरेना ।।५।।
कागदासी परिमळ लागला । नव जाये जऱ्हीं झडोन गेला ।
परी तयाच्या कागदपणाला । तोटा न ये कीं ।।६।।
तैसे नव्हेती ते सज्जन । कृपा जालियां प्राणी अभिन्न ।
होती जैसें तें कांचन । लोहाचें होये ।।७।।
परीस लोहाचें कांचन करी । परी आपणां ऐसें न करी ।
म्हणोनी देवं न ये सरी । परीसाची सज्जना ।।८।।
नां तरी चंदन असे । तो वृक्षासी करी आपणां ऐसें ।
तेथें पाहातां भेद नसे । तैसे हे सज्जन ।।९।।
परी तेथें हि भेद आहे। हें तूं विचारूनिया पाहे ।
मुख्य चंदनपण न लाहे । तया वृक्षाचे आंगीं ।।१०।।
आपण अनयासें आगळा । त्यासी म्हणती वोरी बाबळा ।
तैसा नव्हे संगसोहोळा । सत्संगतीचा ।।११।।
जैसी भिंगोरीनें आळी नेली । ते स्वयें भिंगोरी च जाली ।
परी वेगळेपणें मिर्वली । दुसरी भिंगोरी ।।१२।।
आणि तयेसी भये हि वाटलें । मागुती पुढें हि आहे ठेविलें ।
तैसें सज्जनीं नाहीं केलें । शरणांगतासी ।।१३।।
सुखी सुखाचा सुकाळ । नाहीं दुखाचा विटाळ ।
सकळ आवाळगोवाळ । आपण चि होणें ।।१४।।
पाईं ठेवितां चि सद्भाव । आनंदें भरती ब्रह्मकटाव ।
संसारभये सकळ हि वाव । होउनी जाती येकसरी ।।१५।।
देखोनी संतकृपेचा यावा । विवेकें भेटोनी कौल मागावा ।
अंकित होउनीयां घालावा । गोदोळ भक्तीपेठेसी ।।१६।।
विवेकाचा फड पडला । शांतीसी थोर आधार जाला ।
अभिमान पळोनी गेला । देहेबुद्धी घेउनी ।।१७।।
अहंकार वाटपाड्या मैंद । धरूनि केला शिरछेद ।
मोहो भ्रांती फासे दग्ध । केले वैराग्यवळें ।।१८।।
भावार्थाचा उदीम जाला । अज्ञानदारिद्रा वेगळा जाला ।
प्राणी मोक्षलक्ष्मीनें आपंगिला । ऐसी कृपा सज्जनांची ।।१९।।
प्रपंचाची तिरडफांकी जाली । परमार्थाची गुढी उभविली ।
कौल देखोनियां आली । दया आणि सद्वृत्ती ।।२०।।
मैंदावें तितुकें बुडालें । मीपण चोरटें पळोनि गेलें ।
मछरतिरस्कारासी केलें । देशघडी विवेकें ।।२१।।
क्रोध उचल्या सांपडला । विवेकासी न कळतां शांतीला ।
नेयाकारणें होता आला । त्यासी कोंडिलें अंतरीं ।।२२।।
ऐसीं अंमगळें तितुकीं पळालीं । आणि निर्मळें तितुकीं मिळालीं ।
आनंदें उचंबळलीं । आचारब्रह्मवृंदें ।।२३।।
याकारणें सत्संगती । धरितां प्राणी मुक्त होती ।
ज्ञानामृत हे सेविती । जणें चुके जन्ममृत्य ।।२४।।
आतां असो हें बोलणें । संतवचनीं भाव धरणें ।
सांगितलें ते मूर्खपणें । असत्य मानूं नये ।।२५।।
ऐक गा भावार्थाची खूण । जेणें चित्ताची वणवण ।
तुटोनि जाईल पूर्ण । समाधान पाविजे ।।२६।।
म्हणसी मी भाव धरूं कैसा । तरी ऐक सांगतो रे शिष्या ।
भाव तो चि जो विश्वासा । सदृढ धरावें ।।२७।।
जो प्राणी संसारें गांजला । तया आंगीं विश्वास वाणला ।
जो देखोवेखी शरण गेला । तेथें विश्वास कैंचा ।।२८।।
अविश्वासें माया गोवी। गोउनी मागुता जन्म दावी।
मोहोजाळें वेढा लावी। उमजों चि नेदी।।२९।।
अविश्वासी तो ठकला प्राणी। अविश्वासा ऐसी नाही हाणी।
जेथें अविश्वासें तो जाचणीं। वरपडा होईल।।३०।।
जेथें अविश्वासें विढार घेतलें। तेथें ये मायेचें ठाणें आलें।
प्राणी नेउनीयां गोविलें। गर्भाचिये बंदिशाळे।।३१।।
म्हणोनी आधी च विचारावें। युक्त अयुक्त शोधुनी पाहावें।
आपणासी न कळे तरी पुसावें। संतसंज्जनांसी।।३२।।
विचारेंवीण कार्य कांही। प्रपंची तें हि चालत नाही
मां परमार्थी तरी सर्व हि। विचारिलें पाहिजे।।३३।।
मानलें तरी अनन्य भावें। सत्पुरूषासी शरण जावें।
शरण गेलियां त्यजावें। दुरी अविश्वासा।।३४।।
जे जें स्वामीनें सांगितलें। तें तें पाहिजे ऐकिलें।
ऐकोनी काय वर्तले। पाहिजे तैसें चि।।३५।।
तूं स्थूळ नव्हेसी म्हणतां चि । लुलु धरूं नये तयाची।
वार्ता असों दे चौ देहाची। वायेकोळ खटपट।।३६।।
शिष्या जाणिवेनें बुडविलें। चौं देहाचें विवरण केलें।
आणि वाचाळपणें सांगितलें। सर्व हि पंचीकर्ण।।३७।।
जे कांही पृच्छा केली। ते तत्काळ सांगितली।
परी ते तितुकी हि व्यर्थ चि गेली। तैसें चि वर्तल्यां वांचुनी।।३८।।
तुज सांगतो या कारणें। तुंवां व्यर्थ वाचाळ न होणें।
स्थूळापासुनी वेगळे होणें। शब्दीं नको रे।।३९।।
तूं म्हणसी मी चौं देहा परता। परी आम्हांसी तुझ्या स्थूळाची चिंता।
कां जे तुझी स्थूळाशा सुटता। दिसत नाही।।४०।।
जैसा रायेविनोदाचा परिवार। तैसा तुझ्या ज्ञानाचा विचार।
परी येणे कांही पैलपार। पाविजेत नाही।।४१।।
मजपरीस तूं जाणता। तरी मी काये सांगों आतां।

मुक्तपणें कर्म येक । टाकितां होती बाधक ।
कानकोंडी धुकधुक । अंतरीं वसे ।।१४।।
येक ते कर्मठपणें बध । कर्म न घडे येथाविध ।
ते चि क्षणीं परम खेद । होये जयांसी ।।१५।।
जे कर्मखेदें खेदले । ते धोका वाहात चि मेले ।
येक ते आदरें जाले । परम अनर्गळ ।।१६।।
आदरें केली अनर्गळता । ते बाधील हे तत्त्वता ।
कर्मसंशये हृदई धरितां । तो हि बाधील नेमस्त ।।१७।।
स्वधर्मकर्म उडवणें । या नांव परमार्थ बुडवणें ।
म्हणोनी स्वधर्म करणें । अगत्य आधीं ।।१८।।
कर्म करी येथाविध । अंतर पडतां नुपजे खेद ।
तरी सोनें आणि सुगंध । निश्चयेंसी ।।१९।।
आधारें कर्म टाकणें । हें काये आपुलें मन नेणें ।
ज्याचा जो स्वधर्म तेणें । त्यागूं नये सर्वथा ।।२०।।
आदरें भोगावा भोग । आणि स्वधर्माचा कीजे त्याग ।
या नांव शरीरपांग । केवळ विषई ।।२१।।
आतां असो हें बोलणें । स्वधर्म चळला ज्ञातेपणें।
तें पाषांड कोटीगुणें । विषयासक्त ।।२२।।
नाना मतांचे अडताळे । शद्बज्ञानें क्रिया चळे ।
तेणें शुधज्ञान मावळे । उठे मतांतर ।।२३।।
जाणते चि पुरुष अविचार । धरूनि घेती मतांतर ।
तेणें संगे इतर । भाविक चळती ।।२४।।
ऐसें निरुपण ऐकिलें । अंतरीं जेणें तुछ्च केलें ।
ते प्राणी नागवले । मी काये करूं ।।२५।।
परद्वारी कां तस्कर । सांगितला न मने विचार ।
परी त्या जाणवेल अविचार । कर्ण नासीक छेदितां ।।२६।।
असो शुध क्रियेवीण । परमार्थी तरला कोण ।
देहेपांगें नागवण । नेमस्त आहे ।।२७।।
सत्क्रिया नस्तां परमार्थ । शद्बज्ञान सांगणें व्यर्थ ।
असत्क्रियेनें अनर्थ । वोढवेल पुढें ।।२८।।
येवं शुध क्रिया ते प्रमाण । नसतां सर्व हि अप्रमाण ।
जैसें युध्य केलियांवीण । शूरत्व नाहीं ।।२९।।
असो जयाची तुटली देहाशा । परमार्थ शोभे त्या पुरुषा ।
देहेपांग ते दुर्दशा । परम हीण ।।३०।।
नृपतीनें भीक मागणें । हें निपट चि लाजिरवाणें ।
तैसा समाधानी तेणें । दुराशा -- धरावी ।।३१।।
येके दुराशेचे पदरीं । विघ्नें आहेती कोटीवरी ।
येवं दुराशा वसतां अंतरीं । समाधान कैचें ।।३२।।
अभिमान महत्त्वाची आशा । तया अभिमानाची दशा ।
अैक तुज सांगतों शिष्या । पुन्हा प्रगट करूनी ।।३३।।
मी बलाढ्य तरुण सुंदर । मी विद्यावंत जाणता चतुर ।
मी लक्ष्मीवंत माहा थोर । सकळाहुनी ।।३४।।
मी सर्व प्रकारें मोठा । ऐसा देहीं भरला ताठा ।
ऐसा हा परम वोखटा । या नांव देहाभिमान ।।३५।।
माझी माता आणि पिता । सर्व भूमंडळ शोधितां ।
ऐसी नसतील सर्वथा । कोण्हीं हि कोठें ।।३६।।
माझे पुत्र अति शाहाणे । त्यांचा महिमा कोण जाणे ।
माझा बंधु होता तेणें । सृष्टी वेढा लाविलां ।।३७।।
कुळेंसी थोर माझी कांता । कन्येसी वर्णी जामाता ।
मी माझा जो चुलत चुलता । थोर होता परी मेला ।।३८।।
ऐसा जितामेल्यांचा अभिमान । या नांव कुळाभिमान ।
आपुल्या कुळाचे नीउन्य । असतां हि पडों नेदी ।।३९।।
कुळाभिमानाचा असो विचार । म्हणे माझा साहेब थोर ।
साहेबाचा परिवार । त्याची स्तुती करी ।।४०।।
माझे जन्मभूमीचा गांव । त्या सारिखा नाहीं ठाव ।
तेथें पाटिलासी उपाव । बहुत आहे ।।४१।।
असो सांगतां वाढेल गाथा । सकळ अभिमान वाहे माथा ।
बापुडे अज्ञान याची वार्ता । असो येकीकडे ।।४२।।
आतां जे कां ज्ञाते पुरुष । म्हणती आम्हांसी उदंड शिष्य ।
त्यां तितुक्यांचा हि ईश । तो मी गोसावी ।।४३।।
सर्वा श्रेष्ठ माझा गुरु। थोर त्याचा चमत्कारु ।
उभाउभी साक्षात्कार। ब्रह्म दावी डोळा ।।४४।।
तैसा चि माझा गुरुबध । बहुतांसी केला विवाद ।
थोर ज्ञाता क्रोध । बहुत असे ।।४५।।
तैसा चि माझा पटाचा शिष्य । बहुत केला विद्याअभ्यास ।
थोर थोर मानिती त्यास । झोटिंग प्रसन्न ।।४६।।
माझा होता आजा गुरु । करामती पुरुष थोरू ।
सभामोहोनाचा विचारू । तयासी ठाउका ।।४७।।
थोर थोर गोविले तेणें । तयासी मुख्य अविध जाणे ।
नटसंगाचोनि गुणें । गप होत अस ।।४८।।
आमुचे समुदाईं । भेद अनुमात्र नाहीं ।
अभेद क्रिया सर्व हि । मुक्त असे ।।४९।।
ऐसा घेउनी साभिमान । आव्हासव्हा बोलती ज्ञान ।
सत्क्रियेच्या नांवे शून्य । साधन तरी असे चि ना ।।५०।।
ब्रह्मज्ञाना आड विघ्न । जो साधका करी भग्न ।
तो हा देहाभिमान । सर्वविषईं ।।५१।।
जे स्थळीं अभिमान जागे । जन्ममृत्य पाठी लागे ।
शद्बज्ञानें वोरंगे । निश्चितार्थ ।।५२।।
दृढ आहे सर्वाभिमान । म्हणोनी उपेदश ब्रह्मज्ञान ।
ब्रह्मज्ञानें निराभिमान । विवेकें व्हावें ।।५३।।
ऐसे हे नाना अडताळे । तेणें शुध ज्ञान मावळे ।
देहाभिमान आदळे । सदृढ आंगीं ।।५४।।
म्हणोनी शिष्या सावधान । दृढ धरीं सद्गुरुभजन ।
तेणें तुझे समाधान । होईल अप्रयासें ।।५५।।
इति श्री रामदास खूण । कोणे समासीं काये निरुपण ।
पुढिलीये समासीं श्रवण । करावें श्रोतीं ।।
***

**।।श्रीराम समर्थ।।**

**समास एकविसावा**

**।। श्री गणेशाय नम: ।।**

**श्रीसमर्थांच्या एकवीससमासी ग्रंथातील हा शेवटचा समास अत्यंत महत्वाचा आहे. श्रीसमर्थांनी यात सर्व जीवमात्रांचे एक – 'विसाव्या' चे म्हणजे विश्रांतीचे व समाधानाचे स्थान शिष्याच्या निमित्ताने सर्वांना दाखवून दिले आहे. म्हणून हा 'एक विसावा' समास अत्यंत महत्वाचा व परिपूर्ण अवस्थेचा आहे. विश्रांतीचे मूळ म्हणजे आत्मस्थितीचे वर्णन करून श्रीसमर्थांनी त्याचे रहस्य सर्वांना उलगडून दाखविले.**

**श्रीसमर्थ म्हणत आहेत, शिष्या, जे जे काही या ग्रंथामध्ये सांगितले आहे त्यायोगे केवळ मार्गाचेच दर्शन केले गेले आहे.**

आणीक प्रेत्न प्रतिष्ठिला। स्वधर्मेसी ।।१२।।
संत स्तविले द्वादशीं । फेडिले शिष्याचे आशंकेसी।
निवडुनियां देहेबुधीसी। पुढें प्रवर्तला ।।१३।।
तेरावे समासीं निरूपण। निर्मूळ केले मीपण।
चौदावे समासीं पूर्ण। समाधान असे ।।१४।।
पंधरावे समासीं उत्तम। रघुनाथचरित्र परम।
वर्णुनिया नित्य नेम। जपाचा असे ।।१५।।
सोळावे समासीं बोध। आहे गुरूशिष्याचा संवाद।
सत्रावे समासीं उछेद। दृश्य देखण्याचा ।।१६।।
अठरावे समासीं विचार। निरसिला आहे येकांकार।
येकुणिसांवे समासीं सार। सत्संगमहिमा ।।१७।।
विसावे समासीं अडताळे। तेणें शुध ज्ञान झांकोळे।
तयाचें स्वरूप निराळें। करूनी दाविलें ।।१८।।
येकविसांवा समास आतां। निरोपिली समूळ कथा।
पुढें निरूपणी श्रोता। अवघान द्यावें ।।१९।।
मागा निरोपिलें कथन। तया कथनाचें जें मंथन।
तें चि आतां सावधान। ये चि क्षणीं परिसावें ।।२०।।
शिष्या ऐक निवांत राहे। समाधान तें वेगळें चि आहे।
विवेकें जीवीं विचारूनि पाहे। बुझसी खुणें ।।२१।।
जें जें कांही ग्रंथ बोलिला। येणें मार्ग चि दाविला।
येणें प्रमाणें साक्षपें गेला। पाहिजे प्राणी ।।२२।।
समाधानाचा अनुभव। शब्दीं सांगेन हें वाव।
घालुनियां जीवीं जीव। अंतर घ्यावें ।।२३।।
विवेक घेतां सुखी जाला। आपेंआप चि निवाला।
तो चि समाधान पावला। चळेना ऐसें ।।२४।।
मार्ग सांगतां यात्रा घडे। हें तों सर्वथा न घडे।
तेणें प्रमाणें जातां जोडे। फळ यात्रेचें ।।२५।।
तैसें आपण आपुलिया जीवें। निरूपणी विचारावें।
मग समाधान पुसावें। नलगे सर्वथा ।।२६।।
भेद भेदल्यावीण कळे। वृत्ती वळल्यावीण वळे।
समाधान शब्दी आकळे। हें तों घडेना ।।२७।।
समाधानाची निजखूण। पुसावी आपणासी आपण।
तरी च घडे श्रवण। साक्षेपाचें ।।२८।।
साक्षपाचेनि श्रवणें। निजरूप आंगी बाणे।
समाधान पुसणें। हें आठवे चि ना ।।२९।।
वाराणसीमध्यें गेला। मार्ग पुसणें नलगे त्याला।
तैसा समाधान पावला। त्यासी संशयो नाही ।।३०।।
ज्याचे हृदई संदेहे वसे। तेथें समाधान कदा नसे।
तया संदेहाचें पिसें। फिटे निवरतां ।।३१।।
आपुले मूळ बरें शोधितां। समूळ आपली माईक वार्ता।
ऐसें हे पाहिलें चि पाहातां। समाधान बाणे ।।३२।।
पदार्थज्ञान जेव्हां सरे। द्रष्टा द्रष्टेपणें नुरे।
ते समई उतरे। फुंज मीपणाचा ।।३३।।
जेथें मुरालें मीपण। ते चि अनुभवाची खूण।
खूण पाहाव्या आपण। डोकाऊं लागे ।।३४।।
म्हणोनी समाधान तें वेगळें। अनुभवीं त्रिपुटी मावळे।
हा चि शब्द जया विवळे। समाधान तेथें ।।३५।।
अत्यंत विचाराचे बोल। तऱ्ही ते माईक फोल।
शब्द सवाह्य सखोल। अर्थ चि अवघा ।।३६।।
शब्द बोलोनि राहे। तें शब्दापूर्वी च आहे।
शब्द मौन्य दोन्ही खाये। आपणासहित ।।३७।।
जेथें गाळुनी सांडिलें नभा। जो अनुभवाचा गाभा।
ऐसा तो हि उभा। कल्पिता केला ।।३८।।
मिथ्या कल्पनेपासुनी जाला। खरेपणा कैचें असेल त्याला।
म्हणोनीं तेथें अनुभवाला। ठाव चि नाहीं ।।३९।।
दिवसरजनीचें परमित्य। करावया मूळ आदित्य।
तो चि निमालीयां उर्वरित। त्यासी काये म्हणावें ।।४०।।
शब्दमौन्याचा विचार। व्हावया मूळ बोंकार।
तो वोंकार नस्तां विचार। कैसा बोलावा ।।४१।।
तर्क अनुभव अनुभविता। सकळ ये माये चि करितां।
ते माया मुळी च नस्ता। काये म्हणों मी ।।४२।।
आत्मा साधावया जात। तों साधकाचा चि होये घात।
तेणें गुणें निवांत। निशब्द राहे ।।४३।।
व्हावया वस्तूची प्राप्ती। साधक साधनें करिती।
तंव ते वस्तु आहुती। साधकाची मागे ।।४४।।
जेही विवेकें आपुली। वस्तुसी आहुती दिधली।
तयासी च वस्तु लाधली। येरां अप्राप्त ।।४५।।
येथीचा विपरीत विचार। करितां आपुला संव्हार।
तेणें अक्षई अपार। सुख लाभे ।।४६।।
जेणें जीवावरी उठावें। तेणें चि आनंदासी लुटावें।
आनंद भोगुनी असावें। कल्पकोटी ।।४७।।
जो कां आपुली कुर्वडी। वोवाळुनी परती सांडी।
तयासी च वस्तूची जोडी। इतरां न घडे ।।४८।।
येथें मोठा लाभ होतो। आपुले सांठी राम मिळतो।
साटी केलिंया मग तो। राम चि होये ।।४९।।
जो रामरूपीं झगटे। तो उभये अंगें पालटे।
आशंका मात्र तुटे। सस्वरूपी ।।५०।।
जो रामरूपीं मिळाला । तो परतोनि नाही आला।
जैसा लोहो परीसें पालटिला। तो लोखंड नव्हे ।।५१।।
आत्मनिवेदनाचा अंती। जे कां घडली अभेद भक्ती।
या नांव सायोज्य मुक्ती। जाण शिष्या नेमस्त ।।५२।।
जो सद्गुरूसी शरण गेला। अद्वैतनिरूपणें बोधला।
मग जरी तो वेगळा केला। तरी तो होणार नाही ।।५३।।
वेगळेपणाची माता। ते लटिके वंध्येची सुता।
म्हणोनिया अभिन्नता। मुळीं च आहे ।।५४।।
अजन्मा होता निजेला। तेणें स्वप्नी स्वप्न देखिला।
सद्गुरूसी शरण गेला। संसारदुखें ।।५५।।
सद्गुरूचे कृपेस्तव। जाला संसार वाव।
ज्ञान होऊनियां ठाव। फिटे अज्ञानाचा ।।५६।।
आहे तितुकें नाही जालें। नाही नाहीपणें निमालें।
आहे नाही जाउनी उरलें। नसोनि कांही ।।५७।।
शून्यत्वातीत शुध ज्ञान। तेणें जालें समाधान।
ऐक्यरूपें अभिन्न। सहजस्थिती ।।५८।।
अद्वैतनिरुपण होतां। निमाली द्वैताची वार्ता।
ज्ञानचर्चा बोलो जातां। जागृती आली ।।५९।।
श्रोती व्हावें सावधान। अत्यंत कठीण निरूपण।
खुणेसी पावता समाधान। समाधानी विरे ।।६०।।
तेणें तितुकें ज्ञान कथिलें। तितुकें स्वप्नावारी गेले।
अनुर्वाच्य सुख उरलें। शब्दातीत ।।६१।।
तेथें शब्देवीण ऐक्यता। अनुभव ना अनुभविता।
ऐसा निवांत तो मागुता। जागृती आला ।।६२
स्वप्नी स्वप्न देखिला । जागा होउनी जागृती आला ।